वृषाली जोशी

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा

संग्रह ३

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा- भाग ३

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा भाग ३


## अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१९७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २० नोव्हेंबर २०२३



©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा भाग ३

## चार अमेरिकन लेखक

मेलव्हील डॅव्हीसन पोस्ट हा पश्चिम व्हर्जिनियामध्ये जन्मला व रानटी डोंगरांमध्ये वाढला. अमेरिकन गुप्तहेरकथा लिहिणारा तो खूप यशस्वी लेखकांपैकी एक होता. तो त्याच्या रहस्यमय लिखाण असलेल्या गोष्टीतील गूढ व त्याची सोडवणूक एकाच वेळी भन्नाट वेगाने करत असे. त्याच्या 'डूमडॉर्फचे गूढ' या गोष्टीतील रँडॉल्फ मेसन हा अप्रामाणिक वकील आहे. तो कायदेशीर पळवाटांमधून गुन्हेगार शोधून काढतो. तर ॲबनेर हा पापभीरू, नीतिमान व बायबलमधील वचने उधृत करणारा दाखवला आहे.

दक्षिणेकडील लेखक, थॉमस सिगिसमंड स्ट्रिबलींग हा टेनेसी व फ्लॉरेन्स या लहान गावांमध्ये राहीला. तो शिक्षक आणि वकील असूनही, त्याने लेखनासाठी वेळ काढला. १९३३ मध्ये त्याला पुलित्झर पारितोषिक मिळाले. त्याच्या 'दिवसाढवळ्या केलेले साहस' या व इतर अनेक गोष्टींमधील गुप्तहेर हेन्री पोगीओली हा त्याच्या तपासकामात मानसशास्त्राचा उपयोग करतांना दाखवला आहे.

क्लिंटन स्टॅग या फार न जगलेल्या लेखकाने, त्याच्या 'शांततेचा कीबोर्ड' या गोष्टींमध्ये थॉर्नले कोल्टन हा आंधळा गुप्तहेर दाखवला आहे. तो दयनीय न दाखवता, स्तुती करण्यायोग्य दाखवला आहे. त्याची ऐकण्याची शक्ती, स्पर्शज्ञान व मानसिकता वरचढ असल्याने, तो निरनिराळे पुरावे शोधून काढण्यात यशस्वी ठरतो. शारीरिक दुर्बलतेवर बुद्धिमत्तेने मात करता येते, असे क्लिंटन स्टॅगने दाखवून दिले आहे.

एरी स्टॅनले गार्डनर याने वयाच्या चौतिसाव्या वर्षी लिहायला सुरवात केली. वयाच्या एक्याएन्शीव्यावर्षी तो कॅलिफोर्नियामध्ये वारला तेव्हा एकशे एक्केचाळीस पुस्तके त्याचा नावावर होती आणि पाच प्रकाशनाच्या वाटेवर होती. एकोणीसशे श्याहेन्शीपर्यंत त्याची निरनिराळ्या सदतीस भाषांमधील बत्तीस कोटी पुस्तके विकली गेली होती. पेरी मेसन ही त्याची प्रसिद्ध पुस्तकमालिका आहे. ‘लेगमन’ ही कायद्याच्या क्षेत्रातील व्यक्तिरेखा आहे.

## कथानुक्रम

१ डूमडॉर्फचे गूढ


२ दिवसाढवळ्या केलेले साहस

३ शांततेचा कीबोर्ड

४ लेगमन

# डूमडॉर्फचे गूढ

## मेलव्हील डॅव्हीसन पोस्ट




व्हर्जिनियामधील मोठ्या डोंगरांमधील एकच माणूस संस्थापक नव्हता, लढाईनंतर बाहेरची माणसेही इथे रहायला आली. साहसी बोटीतून आलेले परदेशी सैन्य येथील लोकांमध्ये मिसळून गेले. त्यात ब्रॅडॉक आणि ला सॅलेही होते. उत्तरेला मेक्सिकोमध्ये ते चाल करून गेले आणि तेथील अनेक सम्राटांना यमसदनास पाठवले.

तिथे मला वाटते, डूमड्रॉफने वाफेवर चालणाऱ्या जलद बोटीने समुद्र पार केले आणि तो कमनशिबी साहसवीर एका भिंतीला धडकून परत आला. पण त्याच्या अंगात दक्षिणेकडील रक्त नव्हते. तो कुठल्यातरी लांबच्या रानटी युरोपियन वंशातून आला होता. त्यासंबंधी सर्व पुरावे होते. तो अवाढव्य असून त्याची रुंद, काळी, टोकेरी दाढी होती. हात जाड आणि बोटे चौकोनी/चपटी होती.

क्राउन्स ग्रँट व डॅनिएल डॅव्हीसन यामध्ये पाचर असल्यासारखी असणारी वॉशिन्टन जमीन त्याला मिळाली. ती न झाकलेली त्रिकोणी जमीन शेती करण्यायोग्य नसल्यामुळे, निःसंशय पडून होती. तो नदीचा पाया असलेला मोठा खडक होता. त्यावरील डोंगराचे शिखर उत्तरेला गेले होते.

डूमड्रॉफने खडक तासला. घोड्यावर रपेट मारून त्याने सोन्याचा पट्टा आणला असावा, कारण त्याने म्हाताऱ्या रॉबर्टचे नोकर भाड्याने आणले व त्या सपाट खडकावर दगडी घर बांधले. त्याने चेसपिकमधील लढाऊ जहाजावरून, फर्निचर, पडदे आणि काही शोभेचे सामान आणले. आणि मग त्याच्या घरामागील डोंगरावर मुळे रुजायला जेवढी लागते, तेवढ्या मूठभर मातीत, पिचची झाडे लावली. ते सोने उगवले. ती राक्षसी माती सुपीक होती. वारेमाप झाडे उगवली. डूमड्रॉफने एक लाकडाचा ओंडका तयार केला आणि त्याच्या बागेतील झाडाच्या पहील्या फळाचे इस्त्राएलमधील ज्यू लोकांच्या हिब्रू भाषेतील अक्षर बनवले. दुष्ट आणि आळशी लोक त्यांची दगडी पाण्याची भांडी घेऊन आले. खूप खूनखराबा आणि दंगली झाल्या.

व्हर्जिनीयाचे सरकार लांब असून, त्यांचे हात लहान व अशक्त होते. पण डोंगराच्या पश्चिमेला जी माणसे जॉर्जच्या आधिपत्याखाली व रानटी माणसांविरुद्ध रहात, ती नंतर जोर दाखवून व स्वाऱ्या करून, जॉर्जच्या जमिनी देखील बळकावून बसली. त्यांच्याकडे खूप धीर होता पण तो जेव्हा संपला, तेव्हा ते देवाच्या चाबकाने हाकलल्यासारखे त्यांच्या शेतजमिनीतून सर्व सामान घेऊन बाहेर पडले. असा एक दिवस आला, जेव्हा माझे काका अबनेर आणि रँडॉल्फ, डूमडॉर्फच्या त्रासातून मुक्त होण्यासाठी, डोंगरांच्या फटींमधून कूच करत निघाले. एडनचा वास असलेले पेय करायचे काम आणि त्यावरील राक्षसाचा प्रभाव आता सहन करायच्या पलीकडे

गेले. प्यायलेल्या निग्रोंनी डंकनच्या गुरांची कत्तल केली. त्यांचे गवताचे भारे जाळले आणि जमीन पिके लावण्यायोग्य केली.

ते एकटे दौडत गेले. पण ते लहान माणसांच्या सैन्याबरोबरचे होते. रँडॉल्फ फोपशा होता आणि फुकटची बडबड करत होता. पण तो सभ्य माणूस होता. त्याची भीती परदेशी आणि विचित्र होती. ॲबनेर जमिनीचा उजवा हात होता.

तो उन्हाळ्यातील सुरवातीचा दिवस होता. सूर्य तळपत होता. त्यांनी तुटका डोंगर ओलांडला व नदीच्या कडेने चेस्टनटच्या झाडांच्या सावलीतून चालू लागले. रस्ता म्हणजे नुसती पाऊलवाट होती आणि घोडे एकामागून एक असे चालले होते. जेव्हा डोंगरातील चढ सुरु झाला आणि नदी मागे पडली. पिचच्या झाडांच्या बागांमधून वळणावळणांचा रस्ता सुरु झाला व नंतर डोंगराच्या कडेच्या घराशी ते पोचले. रँडॉल्फ व ॲबनेर घोड्यावरून उतरले. त्यांना मोकळे करून, चरायला सोडले व ते डूमड्रॉफला भेटण्यासाठी गेले. ते काम तासाभरात आटपणारे नव्हते. मग ते चढाचा रस्ता चढले व घराजवळ आले.

एक मनुष्य घराच्या दारासमोरील फरशीच्या अंगणात लाल कापड घातलेल्या मोठ्या घोड्यावर बसलेला होता. तो वयामुळे वाकलेला व आजारी दिसत होता. त्याच्या डोक्यावर काही नव्हते. त्याचे हात घोड्याच्या खोगीरावर होते. त्याची हनुवटी काळ्या सामानात बुडालेली होती. त्याचा चेहरा भूतकाळाचे परीक्षण करत होता. त्याचे लांब, पांढरे केस, हळूवार वारा हलवत होता. त्याचा मोठा घोडा दगडी घोड्यासारखा पाय फाकवून उभा होता.

सर्वत्र शांत होते. घराचे दार बंद होते. सूर्यप्रकाशात कीटक उडत होते. न

हलणाऱ्या आकृतीची सावली हलत होती आणि पिवळ्या फुलपाखरांचे थवे सैन्यातील लोकांसारखी कसरत करत उडत होते.

रँडॉल्फ आणि ॲबनेर थांबले. त्याना दुःखी आकृती माहिती होती --- जसे काही व्हर्जिनियाचे सरकार हे देवासारख्या राजाचे भीतीदायक, बायबल मानणारे सरकार होते. आणि तो, राजाला व स्वतःला त्रासदायक अशा आक्रमक पद्धतीने, ध्वनीक्षेपक घेऊन राजकीय पुढाऱ्याच्या थाटात, शिवराळ भाषेत येशूची शिकवण देणारा, टेकड्यांवर गोलगोल फिरणारा स्वार होता.

घोडा घामाने निथळत होता. त्यावरील मनुष्य धूळ उडवून, स्वतःच्या प्रवासाचे पुरावे देत होता.

ॲबनेर म्हणाला, "ब्रॉन्सन, डूमड्रॉफ कुठे आहे?"

म्हाताऱ्याने त्याचे डोके उचलले आणि खोगीरावर स्वार झालेल्या ॲबनेरकडे पाहीले.

तो म्हणाला, "सांगतो, त्याने त्याचे पाय उन्हाळी खोलीत गुंडाळले आहेत."

ॲबनेर पुढे गेला व बंद दारावर टकटक केले. एका घाबरलेल्या, गोऱ्या बाईचा परदेशी, रुंद चेहरा दाराआडून त्याच्याकडे बघू लागला. ती छान केसांची, लहानशी, अशक्त बाई होती. पण सभ्य खानदानी असल्याचा पुरावा तिचा नाजुकपणा देत होता.

ॲबनेरने परत तोच प्रश्न विचारला. "डूमड्रॉफ कुठे आहे?"

शब्दोच्चारात विचित्र फरक असलेल्या तिने उत्तर दिले, "ओहो सर, तो त्याच्या सवयीप्रमाणे, दुपारच्या जेवणानंतर, दक्षिण खोलीत आराम करायला गेला आणि मी बागेत काही फळे पिकली असल्यास, गोळा करायला गेले." ती हो नाही

करत, कुजबुजत म्हणाली, “तो बाहेर आलेला नाही आणि मी त्याला उठवू शकत नाही.”

ती दोन माणसे तिच्यामागोमाग हॉलमधून जिन्याने दारापर्यंत गेली. ती म्हणाली, “तो झोपायला जातो, तेव्हा दार नेहमी बंद असते.” तिने बोटांच्या टोकाने, ते हळूच वाजवले.

काही उत्तर मिळाले नाही. रँडॉल्फने दाराचा गट्टू फिरवला. तो मोठ्याने म्हणाला, “डूमड्रॉफ, बाहेर ये.” तिथे शांतता होती आणि शब्दांचा प्रतिध्वनी ऐकू येत होता. रँडॉल्फने त्याच्या खांद्याने जोर लावून, दार उघडले. ते आत गेले. दक्षिणेकडील उंच खिडकीतून सूर्यप्रकाश येऊन, खोली उजळून गेली होती.

डूमड्रॉफ खोलीच्या कडेला कोचावर पहुडला होता. त्याच्या छातीवर एक शेंदरी डाग होता. आणि जमिनीवर पण रक्त सांडले होते. क्षणभर ती बाई त्याला निरखत उभी राहिली आणि मग ओरडली, “शेवटी मी त्याला ठार मारले.” एवढे बोलून, ती भित्र्या सशासारखी पळून गेली. दोन माणसे दार लावून कोचाकडे गेली. गोळी लागून डूमड्रॉफचे मरण ओढवले होते. त्याच्या कोटाला एक मोठे भोक पडले होते. हे कृत्य कुठल्या हत्याराने केले गेले, हे ते इकडेतिकडे बघून शोधू लागले. क्षणभरात त्यांना ते सापडले --- भिंतीजवळ डॉगवूड झाडापासून बनवलेल्या दोन चिमट्यामध्ये ते पिस्तुल पडले होते. आताच त्यातून गोळी चालवली गेली होती. हातोड्याखाली त्याचे कागदी आवरण पडले होते.

खोलीत अजून अगदी थोडेच काही होते --- मागावर विणलेला गालीचा जमिनीवर होता. खिडकीची लाकडी दारे लोंबत होती. ओकच्या लाकडाच्या टेबलावर, गोल, मोठी काचेची दारू भरलेली बाटली होती. झऱ्याच्या पाण्याइतकी पारदर्शक अशी ती दिसत होती. पण तिच्या उग्र वासामुळे तिला डूमड्रॉफच्या

दारूऐवजी, देवाचे पेय समजले गेले असते. त्यावर व भिंतीवर सूर्यकिरणे पडली होती. त्या तिथेच मृत माणसाचे आयुष्य संपवणारे हत्यार पडले होते.

रँडॉल्फ म्हणाला, “अॅबनेर, हा खून आहे. डूमड्रॉफ झोपला असतांना त्या बाईने भिंतीवरील पिस्तूल घेऊन, त्याला ठार मारले.”

अॅबनेर टेबलाशी उभा होता. त्याची बोटे त्याच्या हनुवटीपाशी होती.

तो उत्तरला, “रँडॉल्फ, ब्रॉन्सन इथे कसा काय आला?”

रँडॉल्फ म्हणाला, “ आपल्याला ज्या रागाने इथे आणले, त्यामुळेच. वेडा, म्हातारा गोल फिरणारा स्वार डूमड्रॉफच्या विरुद्ध डोंगरात दूरवर लढाईचे वातावरण तापवत होता.”

हनुवटीवरील बोटे न काढता, अॅबनेर बोलला, “तुला असे वाटते का, की या बाईने डूमड्रॉफला मारले? ठीक आहे. आपण जाऊन ब्रॉन्सनला विचारू, की त्याला कुणी मारले.”

त्यांनी मेलेल्या माणसाला कोचावर ठेऊन, दार लावले आणि कोर्टात गेले.

वेड्या, म्हाताऱ्या स्वाराने आपला घोडा बाजूला ठेऊन, एक कुदळ घेतली होती. त्याने कोट काढून त्याच्या शर्टाच्या बाह्या कोपरापर्यंत वर सरकवल्या होत्या. तो अजूनही दारूची पिंपे नष्ट करायच्या मागे होता. दोन माणसे आली, तेव्हा तो थांबला. अॅबनेरने त्याला हाक मारली.

तो म्हणाला, “ब्रॉन्सन, डूमड्रॉफला कुणी मारले?”

“मी मारले.” म्हातारा म्हणाला आणि परत कामाला लागला.

रँडॉल्फने श्वास घेत शपथ घेतली, “देवदयेने एकाच माणसाला, प्रत्येकजण मारू शकत नाही!”

अॅबनेर उत्तरला, “यात कितीजणांचा हात होता, हे मला कोण सांगू शकेल? दोघांनी तर कबुली दिली आहे.”

रँडॉल्फ ओरडला, “दोघांनी तर कबुली दिली आहे. कदाचित अजून तिसराही कुणी होता का? अॅबनेर, तू त्याला मारलेस का? आणि मी सुद्धा? अरे, ही गोष्ट अशक्य आहे.”

अॅबनेर म्हणाला, “अशक्य गोष्ट खरी दिसते आहे. रँडॉल्फ, माझ्याबरोबर ये. मी तुला याहून अशक्य गोष्ट दाखवतो.”

ते घरातून जिना चढून खोलीत गेले. अॅबनेरने त्याच्यामागे दार लावले. तो म्हणाला, “या कडीकडे बघ. ती आतमध्ये आहे आणि कुलुपाला चिकटलेली नाही. ज्या कोणी डूमड्रॉफला मारले, तो खोलीत कसा शिरला? दाराला तर आतून कडी होती.

रँडॉल्फ उत्तरला, “खिडकीतून.”

तिथे दोन खिडक्या होत्या. त्या दक्षिणेकडील खिडक्यांमधून सूर्यप्रकाश येत होता. अॅबनेर रँडॉल्फला घेऊन तिकडे गेला. तो म्हणाला, “बघ, घराची भिंत म्हणजे फक्त खडक आहे. नदी शंभर फुटांवर आहे आणि खडक काचेसारखा गुळगुळीत आहे. पण एवढेच नाही. या खिडकीच्या काचांकडे बघ. त्या लाकडात सिमेंटने बसवल्या आहेत. तिथे धूळ आणि कोळष्टकेही आहेत. या खिडक्या उघडल्या गेल्या नाहीत. त्यातून खुनी कसा शिरेल?”

अॅबनेर उत्तरला, “उत्तर अगदी सहज मिळणारे आहे. ज्या कोणी डूमड्रॉफला मारले, तो त्याला झोप लागेपर्यंत खोलीतच होता. मग त्याने गोळी मारली व बाहेर गेला.”

अ‍ॅबनेर रँडॉल्फ म्हणाला, “एका गोष्टीसाठी स्पष्टीकरण उत्तम आहे. पण खुनी बाहेर गेल्यावर त्याने दाराला आतून कडी कशी काय लावली?”

रँडॉल्फने निराशा दाखवत, हवेत हात उडवले. तो म्हणाला, “कुणाला माहीत? कदाचित डूमड्रॉफला त्याने स्वतःनेच मारले.

अ‍ॅबनेर हसला. “थोड्या गोळ्या स्वतःवर झाडून, मग त्याने काळजीपूर्वक भिंतीत दोन चिमटे बसवले!”

रँडॉल्फ ओरडला, “छान, अजून एक गूढाकडे नेणारा रस्ता आहे. ब्रॉन्सन आणि ती बाई म्हणते, की त्यांनी डूमड्रॉफला मारले आणि जर त्यांनी मारले असेल, तर त्याना त्यांनी हे कसे केले, ते नक्कीच माहिती असेल. चल. आपण जाऊन त्यांना विचारू.”

अ‍ॅबनेर म्हणाला, “कायद्याच्या कोर्टात, ते कृत्य चांगले भानावर असतांना केले गेले, असे समजले जाईल. पण आपण देवाच्या कोर्टात आहोत. आणि तिथे गोष्टी काहीशा विचित्र पद्धतीने व्यवस्थापित केल्या जातात. आपण जाण्यापूर्वी, शक्य असेल तर, हे शोधून काढू की बरोबर कुठल्या वेळी डूमड्रॉफ मेला.”

तो गेला आणि मृत माणसाच्या खिशातील मोठे चांदीचे घड्याळ घेऊन आला. ते गोळीच्या फटक्याने मोडले होते. त्याचे काटे दुपारी एकची वेळ दाखवत होते. क्षणभर तो त्याच्या हनुवटीवर बोट ठेऊन उभा राहिला. तो बोलला, “एक वाजता, मला वाटते, ब्रॉन्सन या ठिकाणी यायला निघाला होता आणि ती बाई डोंगरावर पीचच्या झाडांमध्ये होती.”

रँडॉल्फने त्याचे खांदे मागे केले. तो म्हणाला, “अ‍ॅबनेर, उगीच तर्क करण्यात आपला वेळ फुकट का घालवायचा?

आपल्याला हे माहिती आहे, की कुणी हे केले. आपण त्यांच्याकडे जाऊन, त्यांच्या तोंडूनच ही हकीगत ऐकूया. ब्रॉन्सन किंवा ती बाई या दोघांपैकीच कुणीतरी डूमड्रॉफला ठार केले.''

अॅबनेर म्हणाला, ''मी यावर विश्वास ठेवेन, पण ते फक्त या विशिष्ट भीतीदायक अशा कायद्याला धरूनच.''

रँडॉल्फ बोलला, ''कसला कायदा? हा व्हर्जिनियातील कायदेमंडळाने पास केलेला कायदा आहे का?''

अॅबनेर म्हणाला, ''हो. हा मोठ्या अधिकारी मंडळींनी तयार केलेला कायदा आहे. त्याची भाषा बघ. 'ज्याने तलवारीने ठार केले, त्याला तलवारीनेच ठार करायला हवे.''' त्याने जवळ येऊन रँडॉल्फच्या दंडाला धरले.

''च चा प्रयोग तू पाहिलास का, रँडॉल्फ? तलवारीनेच असे म्हटले आहे. हा अटळ असा कायदा आहे. त्यात काही पळवाट नाही. त्यात दैववशात सुटका होण्याची काही संधी नाही. जगात कुठेही नाही. अशा तऱ्हेने आपण जे पेरतो, तेच उगवते, दुसरे काही नाही. आपण जे देतो, तेच आपल्याला मिळते. हे आपल्या हातातील शस्त्र आहे आणि ते शेवटी आपला विनाश करते. तू आता त्याचा शोध घेतो आहेस.''

तो वळला आणि टेबल, शस्त्र आणि मृत मनुष्य त्याच्यासमोर आले. 'ज्याने तलवारीने ठार केले, त्याला तलवारीनेच ठार करायला हवे.''' तो म्हणाला,

''आणि आता आपण कायद्याच्या कोर्टातील पद्धत वापरून बघू. तुमचा विश्वास त्यांच्या शहाणणाच्या पद्धतीत आहे.''

त्याना वेडा म्हातारा स्वार अजून काम करत असलेला सापडला. तो ओकचे लाकूड कुऱ्हाडीने तोडत होता व डूमड्रॉफची दारूची पिंपे फोडून नष्ट करत होता.

रँडॉल्फ बोलला, “ब्रॉन्सन, तू डूमड्रॉफला कसे ठार केलेस?”

तो म्हातारा थांबला आणि त्याच्या कुऱ्हाडीवर वाकून उभा राहिला. तो म्हणाला, “जसे इलीझीहाने अहाझीहच्या कॅप्टनला व त्याच्या पन्नास लोकांना ठार केले, तसे मी डूमड्रॉफला ठार केले. पण मानवी हाताने नव्हे. मी देवाजवळ प्रार्थना केली, की त्याने डूमड्रॉफला ठार करावे.”

तो उभा राहिला व त्याचे हात पसरले. तो म्हणाला, “त्याचे हात रक्ताने भरले होते. सृजनाच्या देवाच्या बागा त्याने उबग येईल अशा करून, लोकांना रागाला आणले होते. लोकांना खूनखराबा करायला व वादाचे टोक गाठायला लावले होते. विधवा व अनाथ मुले त्याच्या कृत्यांमुळे रडून, देवाकडे गाऱ्हाणे गात होती. पवित्र पुस्तकात लिहिले आहे, की मी नक्की त्यांचे गाऱ्हाणे ऐकेन. भूप्रदेश त्याच्या त्रासाला कंटाळला होता. म्हणून मी जसे देवाने गोमोराहला त्याच्या राजवाड्यात नष्ट केले होते, तसे याला नष्ट करण्यासाठी मी प्रार्थना केली.”

रँडॉल्फने मनातून अशक्य काढून टाकायचे हावभाव केले. मात्र अॅबनेरचा चेहरा खोलवर विचित्र दिसत होता.

तो स्वतःशीच परत सावकाश बोलला, “स्वर्गातील अग्नीने” पुढे तो म्हणाला, “थोड्या वेळापूर्वी आपण आलो तेव्हा मी विचारले की डूमड्रॉफ कुठे आहे आणि तू मला जज्जच्या पुस्तकातील तिसऱ्या धड्यातील भाषेत उत्तर

दिलेस. ब्रॉन्सन, तू मला असे उत्तर का दिलेस? --- ‘उन्हाळी खोलीत नक्कीच तो त्याचे पाय उघडे करत असेल.”

“म्हातारा उत्तरला, “ती बाई मला म्हणाली, की तो ज्या खोलीत झोपायला गेला होता, तिथून तो बाहेर आला नाही. आणि खोलीचे दार कुलुपबंद होते. मला माहिती आहे की तो बैलासारखा, अमेरिकेने बनवलेल्या भल्या मोठ्या बॉम्बसारखा, त्याच्या उन्हाळी खोलीत मेला.”

त्याने त्याचा हात दक्षिण दिशेला हलवला. तो म्हणाला, “मी मोठ्या दरीतून, सृजनदेवतेच्या बागा उध्वस्त करुन, उबग आणण्यासाठी आलो. पण मला हे माहिती नव्हते, की माझी प्रार्थना देवाने ऐकली व तो आला.”

डोंगरामधून डूमड्रॉफच्या दाराशी येईपर्यंत, त्याचा राग मला माहिती नव्हता. जेव्हा ती बाई बोलली, तेव्हा मला तो माहिती झाला. मग तो त्याच्या घोड्याकडे गेला. त्याची कुऱ्हाड त्याने बेकार, मोडक्या सामानात ठेवली.

रँडॉल्फ मध्येच बोलला, “ॲबनेर, ये. हा वेळ फुकट चालला आहे. ब्रॉन्सनने डूमड्रॉफला मारले नाही.”

ॲबनेरने त्याच्या खोल आवाजात, सावकाश म्हटले, “रँडॉल्फ, तुला जाणवले का, की डूमड्रॉफ कसा मेला?”

रँडॉल्फ बोलला, “स्वर्गातील अग्नीने नक्कीच नाही.”

ॲबनेर म्हणाला, “तुझी खात्री आहे?” रँडॉल्फ ओरडला, “तू विनोदाने बोलून हसतो आहेस. पण मला गंभीरपणे ताण आला आहे. इथे राज्याविरुद्ध गुन्हा घडला आहे. मी न्यायप्रिय आहे. शक्य झाल्यास, मी खुन्याला शोधून काढणार आहे.”

तो घराकडे निघून गेला. त्याच्यामागोमाग ॲबनेर गेला. त्याचे हात पाठीमागे बांधलेले होते आणि मोठे खांदे सैलसरपणे पुढे झुकले होते. तोंडावर गंभीर हास्य होते.

रँडॉल्फ बोलला, "त्या म्हाताऱ्या धर्मोपदेकाशी बोलून काही उपयोग नाही. त्याला दारू नाहीशी करून, निघून जाऊ दे. मी त्याच्याविरुद्ध काही फतवा काढणार नाही. ॲबनेरसाठी प्रार्थना कदाचित खून करण्यासाठी सहजसाध्य उपाय असेल पण ते काही व्हर्जिनीयाचे कायदेशीर, भयानक शस्त्र नाही.

म्हातारा ब्रॉन्सन, जेव्हा त्याच्या बायबलसंबंधीचे कठीण शब्द उच्चारत आला, तेव्हा डूमड्रॉफ मेला. या बाईने डूमड्रॉफला मारले. मी तिची चौकशी करायला भाग पाडेन."

ॲबनेर उत्तरला, "जशी तुझी मर्जी. कायद्याच्या कोर्टातील पद्धतींवर तुझा विश्वास आहे."

रँडॉल्फ बोलला, "तुला याहून कुठली चांगली पद्धत माहिती आहे का?"

ॲबनेर उत्तरला, "कदाचित जेव्हा तुम्ही संपता."

दरीवर रात्र झाली. ती दोन माणसे घरात गेली आणि शवाच्या दफनाची तयारी करू लागले. त्यांनी मेणबत्त्या आणल्या. कॉफिन तयार केले व त्यात डूमड्रॉफला ठेवले. त्याचे पाय सरळ केले. हात दुमडून गोळी लागलेल्या छातीवर ठेवले. मग त्यांनी ते कॉफिन हॉलमधील बाकांवर ठेवले. त्यांनी जेवायच्या खोलीत अग्नी पेटवला आणि त्यासमोर बसून, मृत माणसाच्या अरुंद, अमर घराचे दार उघडे ठेवले. त्या बाईने थोडे थंड मास, सोनेरी चीज आणि पावाचा तुकडा टेबलावर ठेवले. त्यांनी तिच्याकडे पाहिले नाही. पण त्यांना ती घरात फिरतांना ऐकू आले. शेवटी

बाहेरील अंगणातील बारीक खडीच्या पायऱ्यांवर खिंकाळणाऱ्या घोड्याशेजारी तिचा पायरव ऐकू आला. नंतर ती प्रवासाचे कपडे घालून आली. रँडॉल्फने उडी मारली.

तो म्हणाला, “तू कुठे चालली आहेस?”

ती बाई उत्तरली, “समुद्रावरील जहाजात.” आणि तिने हॉलकडे बोट दाखवले. “तो मेला आहे आणि मी आता स्वतंत्र आहे.” अचानक तिच्या तोंडावर चमक आली. रँडॉल्फने तिच्या दिशेने एक पाऊल उचलले. त्याचा आवाज मोठा व घोगरा झाला होता. तो ओरडला, “डूमड्रॉफला कुणी मारले?”

ती बाई म्हणाली, “मी मारले. ते योग्य असेच मी केले.”

“योग्य? याचा अर्थ काय?” न्यायाचा प्रतिध्वनी उमटला. बाईने खांदे हलवले व हाताने काही परदेशी हावभाव केले.

“मला एक अगदी म्हातारा माणूस व एक लहान मुलगी सूर्याच्या उन्हात भिंतीशी बसलेले दिसले. एकजण येऊन म्हाताऱ्याशी खूप वेळ बोललेला आठवले. ती लहान मुलगी पिवळी फुले तोडत होती व तिच्या केसात माळत होती. मग त्या परक्या माणसाने म्हाताऱ्याला सोन्याची साखळी दिली व मुलीला घेऊन गेला.” तिने तिचे हात पसरले. “ओहो, त्याला मी मारले ते चांगले केले.” ती विचित्र, दया येईल, असे हसू हसली.

ती बोलली, “एव्हाना म्हातारा गेला असेल. पण मला कदाचित ती सूर्याचे उन्ह असलेली भिंत व गवतातील पिवळी फुले सापडतील. आणि आता मी जाऊ का?”

हा गोष्ट सांगणाऱ्याच्या कलेचा कायदा आहे, की तो गोष्ट सांगत नाही. ऐकणारा ती सांगतो. गोष्ट सांगणारा त्याला फक्त चेतक पुरवतो .

रँडॉल्फ उठून जमिनीवर फिरला. जेव्हा ते कार्यालय समाजातील फक्त मान्यवर इंग्लिश फॅशन केलेल्या लोकांनी भरलेले होते, त्याच्यावर कायद्याचा चांगलाच पगडा होता. जर त्यातील शब्दांवर हरकत घेतली गेली, तर मग पापी आणि कमकुवत लोकांनी त्याला मान कसा दिला असता? इथे 'मी खून केला' असे कबूल करणारी बाई होती. त्याने तिला जाऊन देणे शक्य होते का?

अॅबनेर न हलता, शेकोटीशेजारी बसला होता. त्याचे कोपर खुर्चीच्या हातावर होते. त्याचा तळहात त्याचा जबडा कुरवाळत होता. त्याच्या चेहरा सुरकुत्यांमध्ये बुडाला होता. रँडॉल्फची छाती गर्वाने फुगली होती. त्याच्यातील उणेपणा असा होता, की भाव मारण्यासाठी त्याने श्रीमंतीचे ढोंग केले होते. पण त्याच्या जबाबदाऱ्या तो निभावत होता. आता तो थांबला आणि त्या अशक्त बाईकडे बघू लागला. एखाद्या कहाणीमधील कैद्यासारखी कीर्तीमान व तळघरातील तुरुंगातून पळून, प्रकाशित जगात आलेल्या बाईकडे तो बघू लागला.

हॉलमधील बाकांवरील कॉफिनच्या पेटीवर आगीच्या ज्वाळांचा उजेड पडला होत्या. अगम्य, मोठा स्वर्गाचा न्याय आत शिरला व त्याने त्याच्यावर पगडा बसवला.

तो म्हणाला, "हो, जा. पशुसारख्या माणसाला मारणाऱ्या बाईला थांबवणारा ज्युरी व्हर्जिनियात नाही." आणि त्याने त्याचा बोटे उघडलेला हात मृत माणसाकडे वळवला.

त्या बाईने थोडे वाकून आभार मानले. "सर, मी तुमची आभारी आहे. नंतर

ती पोरकटपणे हो नाही करत राहिली. पण मी त्याला पिस्तुलाची गोळी मारली नाही.”

रँडॉल्फ ओरडला, “गोळी मारली नाही? मग त्या माणसाच्य हृदयाला भोक कसे पडले?

ती एखाद्या मुलासारखे म्हणाली, “हो सर.”

“मी त्याला मारले पण पिस्तुलाच्या गोळीने नव्हे.” रँडॉल्फने त्या बाईच्या दिशेने दोन ढांगा टाकल्या. त्याने परत म्हटले, “पिस्तुलाच्या गोळीने नव्हे? मग कसे? खरे सांग, तू डूमड्रॉफला मारलेस का?” त्याचा मोठा आवाज खोलीभर घुमला.

ती म्हणाली, “सर, मी तुम्हाला दाखवते.”

ती वळली आणि घरात लांब गेली. थोड्या वेळाने कापडी टॉवेलमध्ये काही गुंडाळून घेऊन, परतून आली. तिने ते पिवळया चीज व पावाच्या तुकड्याच्या मध्ये टेबलावर ठेवले. रँडॉल्फ टेबलाशी उभा राहीला आणि बाईच्या चपळ बोटांनी टॉवेलची गुंडाळी सोडवली. मग ती वस्तू उघडी झाली.

ती एका माणसाची फारशी सुबक नसलेली मेणातील आकृती होती. त्याच्या छातीत सुई घुसवलेली होती. रँडॉल्फने श्वास रोधून धरला. “जादू! अविनाशी जादू!”

बाईने मुलासारख्या आवाजात व पद्धतीने स्पष्टीकरण दिले, “हो सर, मी त्याला मारण्याचा खूप वेळा प्रयत्न केला --- ओहो, खूपच वेळा. कुठल्या शब्दांनी, तेही मला आठवते आहे, पण नेहमीच तो असफल राहीला. मग शेवटी,

मी त्याचा मेणाचा बाहुला तयार केला आणि त्या बाहुल्याच्या छातीत सुई खुपसली. मी त्याला असे झटपट मारले.”

आता ते रँडॉल्फला पूर्णपणे स्पष्ट झाले, की ती बाई निरपराध होती. तिची छोटीशी बिनत्रासाची जादू म्हणजे राक्षसाला मारायचा पोरकट दयनीय प्रयत्न होता. बोलण्यापूर्वी त्याने थोडे हो नाही केले. आणि मग तो सभ्य माणूस असल्याने, त्याने ठरवले, की जर पोरकट श्रद्धा अशी असेल, की जादूच्या काडीने राक्षस मेला, तर तिला तसा विश्वास ठेवू दे.

"सर, आता मी जाऊ का?"

रँडॉल्फने त्या बाईकडे थोडे आश्चर्याने पाहिले. तो म्हणाला, "तुम्हाला रात्रीची, डोंगरांची आणि लांबलचक रस्त्याची भीती वाटत नाही का?

ती साधेपणाने उत्तरली, "ओहो, नाही सर. चांगला देव सर्वत्र आहे."

मेलेल्या माणसावरची ही मते भयानक होती. या अर्धवट मुलासारख्या बाईचा असा विश्वास होता, की जगातील सर्व पाप आता तो मेल्यामुळे, त्याच्याबरोबर गेले आहे. स्वर्गातील सूर्याचा उजेड आता जगातील प्रत्येक कोपऱ्यात आणि फटीत पोचेल.

दोन माणसांपैकी कुणाचीच तुकडे होण्यावर श्रद्धा नव्हती. त्यांनी तिला जाऊ दिले. आता दिवसाचा उजेड होता आणि डोंगरातील चेस्पिकपर्यंतचा रस्ता खुला होता.

तिला घोड्यावर बसायला मदत केल्यावर, रँडॉल्फ आगीपाशी आला व बसला. त्याने आळशीपणे काही वेळ लोखंडी बारने तेथील गरम जमिनीवर टकटक केले आणि मग बोलला, "ही आतापर्यंतची सर्वात विचित्र गोष्ट घडलेली आहे. इलीझीहा तिसबाईटसारखे, स्वर्गातील अग्नीने त्याने डूमड्रॉफला मारले, असे येथील म्हाताऱ्या धर्मप्रचारकाला वाटते आहे. येथील मुलासारख्या असलेल्या बाईला

वाटते आहे, की तिने मध्यमवयीन जादूच्या तुकड्याने त्याला मारले --- त्याला मारणारा प्रत्येकजण माझ्याइतकाच निरागस वाटतो आहे. आणि तरीही अमरत्वाने त्या पशुला मारले आहे."

त्याने आगीशेजारील जागेवर धातूच्या काठीने, ती वर उचलून व त्याच्या बोटांच्या पोकळीत ठेऊन, आवाज केला. कोणीतरी डूमड्रॉफवर गोळी झाडली. पण कोणी? आणि त्या बंद खोलीत शिरून, तो बाहेर कसा पडला? डूमड्रॉफला मारणारा खुनी त्याला मारण्यासाठी नक्कीच खोलीत शिरला असणार. ते त्याने कसे जमवले? तो जणु स्वतःशीच बोलला, पण माझ्या काकांनी उत्तर दिले, "खिडकीतून."

रँडॉल्फने प्रतिध्वनी काढला, "खिडकीतून? कसे काय? अरे माणसा, तूच तर मला दाखवलेस, की खिडकी उघडी नव्हती आणि त्याखाली इतकी खडी चढण होती, की माशीला सुद्धा ती चढता आली नसती. आता तू मला खिडकी उघडी होती, असे सांगशील का?"

अॅबनेर म्हणाला, "नाही, ती कधीच उघडी नव्हती. रँडॉल्फ उभा राहिला. तो ओरडला, "अॅबनेर, तू असे म्हणतो आहेस का, की ज्याने डूमड्रॉफला मारले, तो उभी चढण चढून बंद खिडकीतील धुळीला व कोळीष्ट्कांना धक्का न लावता, खिडकीतून आत आला? काकांनी रँडॉल्फच्या चेहऱ्याकडे पाहीले. तो म्हणाला, "डूमड्रॉफच्या खुन्याने अजून काही केले. तो ती खडी चढण चढून बंद दारातून आत आला एवढेच नाही, तर त्याने डूमड्रॉफला मारले व परत काहीही माग न ठेवता, धूळ वा कोळीष्ट्कांना धक्का न लावता, बंद खिडकीतून बाहेर गेला.

रँडॉल्फ मोठी शपथ घेत, ओरडला, "ही गोष्ट अशक्य आहे! हल्ली व्हर्जिनियातील लोक काळ्या जादूने किंवा देवाच्या शापाने मरत नाहीत."

अॅबनेर म्हणाला, "काळया जादूने, नाही. पण देवाच्या शापाने, हो. असे होऊ शकते."

रँडॉल्फने त्याचा मूठ वळलेला उजवा हात डाव्या हाताच्या तळव्यावर आपटला. "अमरत्वाने, मला अशा तऱ्हेने खून झालेला बघायचा आहे. तो खड्ड्यातील लहान राक्षस असो किंवा स्वर्गातील देवदूत असो."

नाराज न होता अॅबनेर म्हणाला, "ठीक आहे. जेव्हा उद्या तो परत येईल, तेव्हा मी तुला ज्याने डूमड्रॉफला मारले, तो खुनी दाखवेन."

जेव्हा दिवस उजाडला, त्यांनी एक खड्डा खणला आणि मृत माणसाला डोंगरातील त्याच्या पिचच्या झाडांमध्ये पुरले. त्यांचे हे करून होईपर्यंत दुपार झाली. अॅबनेरने त्याची कुऱ्हाड टाकली व सूर्याकडे पाहीले. तो बोलला, "रँडॉल्फ, चल आपण जाऊ आणि लपून बसलेल्या खुन्यावर अचानक हल्ला करू. तो इकडे यायला निघालेला आहे."

तर त्याने असा विचित्र हल्ला केला. जेव्हा डूमड्रॉफने आतून कडी लावलेल्या खोलीशी ते परत आले व जिथे तो मेला, तिथे त्यांनी भिंतीवरील मांडणीत काळजीपूर्वक शिकार करण्यासाठी काही भक्ष्य ठेवले. मग त्याने अजून एक चौकस गोष्ट केली. मग त्याने मेलेल्या माणसाच्या अंगावरून काढलेला, रक्ताचे डाग पडलेला कोट घेतला. त्यात एक उशी ठेवली व ती डूमड्रॉफ झोपला होता, त्या कोचावर ठेवली. असे केल्यावर रँडॉल्फ आश्चर्यात बुडून गेला आणि अॅबनेर म्हणाला, "असे बघ रँडॉल्फ, आपण खुन्याला फसवू --- आणि असे करतांना त्याला पकडू."

मग तो बाहेर गेला आणि गोंधळलेल्या जज्जला दंडाला धरून आणले. तो म्हणाला, “लक्ष ठेव. भिंतीकडून खुनी येत आहे.”

पण रँडॉल्फने काही ऐकले नाही. काही पाहीले नाही. फक्त सूर्य उगवला. त्याच्या अंगावरील ॲबनेरचा हात घट्ट झाला. भिंतीकडे बोट दर्शवत, तो म्हणाला, “हा बघ, तो आला आहे.”

बोटाच्या दिशेने बघत, रँडॉल्फला, भिंतीवर भक्ष्याच्या दिशेने वरती सरकणारी छोटीशी, चमकदार प्रकाशाची थाळीसारखी तिरीप दिसली. ॲबनेरचा हात कडक झाला आणि थाळीवर आपटून, त्याचा आवाज वाजू लागला. “’ज्याने तलवारीने मारले त्यालाही तलवारीनेच मारले पाहिजे.’ ही पाण्याची बाटली डूमड्रॉफच्या दारूने भरली आहे व ती सूर्याने चकाकते आहे --- आणि बघ रँडॉल्फ, कसे ब्रॉन्सनच्या प्रार्थनेला उत्तर मिळाले.

ती तिरीप कुलुपाच्या दिशेने जाऊ लागली. “हा स्वर्गातील अग्नी आहे!”

हे शब्द भक्ष्याच्या गर्जनेवर वाजले. आणि रँडॉल्फने पाहीले, की मृत माणसाचा कोट गूढ गोळीने कोचावरून उचलला गेला. मांडणीवरील तिच्या नैसर्गिक अवस्थेत पिस्तुल खोलीच्या शेवटी ठेवलेल्या कोचावर रोखले गेले आणि पिस्तुलाचा खटका दाबला गेला. रँडॉल्फने हात उंचावून, मोठे हावभाव केले. तो बोलला, “हे जग चमत्कारिक अपघातांच्या मिलाफाने भरलेले आहे! देवाच्या गूढ अशा न्यायाने भरलेले आहे!”

# A Daylight Adventure

# दिवसाढवळ्या केलेले साहस’

## Thomas Sigismund Stribling

## थॉमस सिगिसमंड स्ट्रीबलिंग





कुठल्याही पुराव्याशिवाय झालेल्या मिसेस कॉर्डी कॅन्सीच्या नवऱ्याच्या, जेम्स कॅन्सीच्या खुनाशी संबंधित अशी ही कागदपत्रे नव्हती. त्यापेक्षा वाईट म्हणजे तिच्या कोर्टकेसच्या वेळीही ती दाखवली गेली नव्हती. पण सात की आठ महिन्यांनी जेव्हा लॅनेसबर्ग, टेनेसीचा शेरीफ मॅथनने नॅशव्हील राज्याच्या तुरुंगातून त्याच्या कैद्याला इतक्या काळानंतर सोडले, तेव्हा अर्थातच प्राध्यापक हेन्री पोगीओलीला किंवा लेखकाला त्यातील पुरावे शोधून काढण्याची किंवा बोटांचे ठसे वा गोळीने

झालेल्या जखमा शोधण्याची आणि मनोवैज्ञानिक विश्लेषण करण्याची संधी, जी सहसा कुठल्याही गुन्ह्याची रुची वाढवते, ती देण्यात आली नाही.

आमचे वाईट नशीब असे होते, की आम्ही फक्त काही मिनिटे आधी, शेरीफ मॅथन त्याच्या कैद्याबरोबर गावाच्या बाहेर होता, तेव्हा लॅनेसबर्गमधून गाडीने फिरलो आणि त्यानंतरही आम्हाला त्या प्रकरणाबद्दल काही माहिती नव्हते. आम्ही तेथील कोर्टहाऊस चौकातील मोनार्च कॅफेमध्ये फक्त जेवणासाठी थांबलो होतो. तिथे जागा मिळण्यासाठी आम्हाला काही मिनिटे थांबावे लागले. शेवटी दोन माणसांनी जागा सोडल्यामुळे, पोगीओली बसला. त्याला तिथे केचपची बाटली व पेपर रुमालांच्या मध्ये लटकवलेले जुने वर्तमानपत्र मिळाले. त्याने ते उघडून, वाचायला सुरवात केली. लगेचच तो वाचनात गुंग होऊन गेला. माझी खात्री होती की त्याला काही खुनाची गोष्ट सापडली असणार, कारण सगळे प्राध्यापक तेच वाचत असतात.

मी स्वतः खुनाच्या गोष्टीत रस घेत नाही. मी त्याना नेहमी मनोरंजन करणाऱ्या समजण्यापेक्षा, हीन दर्जाच्या समजतो. खरे तर मी प्राध्यापक हेन्री पोगीओलीच्या गुन्हेगारीच्या शोधांविषयी लिहून, माझा चरितार्थ चालवतो. मी फक्त व्यावसायिक हालअपेष्टा व संकटे समजू शकतो.

आमच्या कॅफेबाहेरील चौक लोकांची गर्दी व कलकल असलेला होता. या कोलाहलामध्ये, मला कुण्या धार्मिक सुधारणा करणाऱ्या धर्मप्रचारकाचा ध्वनीक्षेपक यंत्रावरील भगिनी कॉर्डी कॅन्सीला वाचवण्यासंबंधी देवाला विनवणी करण्याचा काही जोरदार आवाज आला. त्याने फारसा प्रचलित नसलेला वाक्प्रचार वापरला, की भगिनी कॉर्डी कॅन्सी खरे तर पापी नव्हती, तर जवळजवळ निरागस बाई होती. मंत्र्याने पापक्षालनासाठी देवाकडे माफी मागणाऱ्या तिच्या सारख्या एका बाईसाठी असे का म्हणावे --- ते अर्थात पुसटपणे कोड्यात टाकणारे होते. सहसा टेनेसी

टेकड्यांमधील धर्मप्रचारक खूप वाईट लोकांचे, ज्यांना काही डौल दाखवण्याची गरज आहे --- खरे तर ती आपल्यापैकी बहुतेकांना असते, त्यांचे धर्मपरिवर्तन करत. पण प्रार्थनेत एखाद्या बाईला, जवळजवळ निरागस असे म्हणणे, हे नेहमीपेक्षा वेगळे होते.

मला वाटते, नॅशव्हील हे नाव पोगीओलीने अर्धवट शुद्धीवर असतांना घेतले असावे, कारण त्याने इतके अचानक वर पाहीले व मला विचारले, की कॅन्सी असे नाव घेतले गेले का. मी त्याला हो म्हटले आणि मी नुकतेच ध्वनीक्षेपक यंत्रावर जे ऐकले, ते त्याला सांगितले. त्याने शांतपणे काही विचार केला व बोलला, “तसे पहाता मिसेस कॅन्सीला तिचे बाळ होते आणि शेरीफ नॅशव्हीलमध्ये तिच्यासारख्या गुन्हेगार बायकासाठी विशेष असा तुरुंग सुरु करणार होता.”

मी या प्रकरणाची चौकशी केली. पोगीओलीने कागदपत्रांवर टिचकी मारली. “मी आताच येथील लॅनेसबर्गमधील एका बाईच्या कोर्टकेसचा सात महिन्यांपूर्वीचा टंकलिखित अहवाल वाचत होतो. तिला आजन्म कारावासाची शिक्षा झालेली असते. पण तेव्हा ती गरोदर असल्याने, जज्ज तिला इथे लॅनेसबर्गच्या तुरुंगामध्ये ती बाळंत होईपर्यंत रहायची परवानगी देतो व नंतर नॅशव्हीलला तिची बदली होणार असते. मला या गोंधळावरुन लक्षात आले की बाळ जन्मले होते आणि आईची रवानगी तुरुंगात होत होती.”

माझ्या बरोबरच्या मित्राने मला हे स्पष्ट केले, तेव्हाच धर्मप्रचारकाचा आवाज शिगेला पोचला होता. “अरे देवा, भगिनी कॉर्डी कॅन्सीला वाचवण्यासाठी काही कर! शेरीफ मॅथन नॅशव्हीलमध्ये तिच्यासारख्या गुन्हेगार बायकासाठी विशेष असा तुरुंग सुरु करणार होता. ओहो! देवा, काही चमत्कार कर. ती निरपराध असल्याचे सर्वांना पटव. जेव्हा तिने तुझ्यावर पूर्ण विश्वास व भरवसा टाकला आहे,

तेव्हा तू तिला माणसांमधून उठवू शकत नाहीस. तुला चांगले माहिती आहे, की तिने लहानसा गुन्हा केला आहे. पण तो निष्पाप हृदयाने तुझ्यासाठी केला आहे. त्यामुळे तू तुझ्या सामर्थ्याने धाऊन ये आणि शेरीफला थांबवून, त्या निष्पाप स्त्रीला गैर अशा शिक्षेपासून वाचव. सर्व काही कुशल/मंगल असो." मग ध्वनीक्षेपक यंत्रावरुन अजून आवाज ऐकू आला. "शेरीफ मॅथन, आम्हाला अजून पाच मिनिटे द्या. तो भगिनी कॉर्डीला पुढील पाच मिनिटात नक्की मदत पाठवेल."

आता मी स्वतः टेनेसीचा रहिवासी आहे आणि गावाकडील सुधारणावादी लोकांना, देवाकडून काही विशेष असे मागणे मागायचे असते व तेही लगेच मिळायला हवे असते. पण नॅशव्हीलमधील तुरुंगात निघालेल्या कैदी स्त्रीच्या सुटकेसाठी, मागणे लाऊन धरलेले, मी यापूर्वी कधी ऐकले नव्हते. मी पोगीओलीकडे वळून बोललो, "त्या बाईने काही लहानसा गुन्हा केला आहे, हे मंत्री मान्य करतो, तर तो काय आहे?"

तो उत्तरला, "तिने फसवाफसवी केली आहे. तिने तिच्या नवऱ्याचे मृत्युपत्र तिच्या बाजूने वळवून घेतले आहे व नंतर लेदरवूड चर्चवर नवीन छप्पर टाकायला मान्यता मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ते कोर्टाच्या नोंदपत्रात आहे."

"आणि अजून --- ती निरागस आहे असे लाऊन धरणारा काय गुन्हा आहे?"

"तिच्या नवऱ्याचा, जिम कॅन्सीचा खून. ती निरागस असल्याचा फक्त दावा करत नाही आहे, तर ती तशी आहे. कोर्टातील खटल्याच्या कागदपत्रांवरून, संशयातीतपणे ते सिद्ध झाले आहे." मला धक्का बसला. "मग जज्जने तिला दोषी --- "

न्यायाधीशाने स्वतःचे ओठ शिवले होते. कारण तिचे निरागसित्व मानसिक आहे. त्यामुळे ते ज्युरीच्या व जज्जच्या समजण्यापलीकडील होते."

मी माझ्या मित्राकडे निरखून बघू लागलो. "आता इतका काळ गेल्यावर तू तिचा निरपराधीपणा सिद्ध करू शकशील?"

"खात्रीने! जर कोर्टातील अहवाल देणाऱ्याने हा कागद बरोबर छापला, तर मी ते नक्की करू शकेन."

"ही अशी निरपराध स्त्रीला शिक्षा देण्याची केस मी प्रथमच पहातो आहे!"

"निरपराध स्त्रीला शिक्षा म्हणजे तुला काय म्हणायचे आहे?"

"अरे देवा, तुला दिसत नाही का? शेरीफ जसा निरागस स्त्रीला मदत करतो आहे, जसा धर्मप्रचारक देवाकडे तिला वाचवण्यासाठी मदत मागतो आहे. त्याचप्रमाणे तू इथे अगदी योग्य वेळी आलेला आहेस. तुला ती निरपराध असल्याचे माहिती आहे आणि तू ते सिद्ध करू शकतोस."

पोगीओलीने शास्त्रीय गोष्टींवर विश्वास असणाऱ्या माणसासारखे, एक कोरडे स्मितहास्य फेकले. "ओहो, अस्स! तुला माझे इथे येणे म्हणजे पर्वणी वाटते."

"नक्कीच. दुसरा काय विचार करणार?"

"मला तुला निराश करायला खेद होतो. पण ते तसे होणार नाही. हे असामान्य योगायोगापेक्षा अजून काही नाही --- आणि मी हे सिद्ध करू शकतो." यानंतर माझा मित्र कागदपत्रांकडे वळला.

यामुळे मी उदास झालो. मला असे वाटले, की आपल्याला त्या बाईसाठी काही करायला पाहीजे. मी आमच्याशेजारी गल्ल्यावर बसलेल्या मनुष्याकडे

पाहीले. त्याने त्याच्या बाजूला बसलेल्या पोगीओलीकडे बघून, मान डोलाविली. तो इथे जवळपास रहात नाही ना, की रहातो?"

मी म्हटले, की नाही. तो जवळपास रहात नाही.

"जर तो इथे रहात नसेल, तर इथे काय घडले, ते त्याला कसे काय माहीत?"

"तू हे ऐकले असशील, की त्याने ते वर्तमानपत्रात वाचले."

"त्याने असे काही केले नाही. मी त्याच्यावर लक्ष ठेऊन होतो. त्याने ते वाचले नाही, तर मी जशी पुस्तकातील चित्रे बघतो, तसे फक्त चाळले."

मी त्याला पोगीओलीची वाचण्याची पद्धत सांगितली. त्याला उडतउडत वाचणे म्हणतात. नुसती नजर फिरवून, त्याला ते माहिती होते.

डोंगरातील माणसाने मान हलवली. "मिस्टर, आता मला त्याहून जास्त माहिती आहे. ते वर्तमानपत्र तिथे गल्ल्यावर ठेवल्यापासून, मी शेकडो लोकांचे ते वाचतांना निरीक्षण केले आहे आणि ते सर्वात जलद गतीने वाचणाऱ्याला एक तास व बारा मिनिटे लागली आहेत."

मी मान हलवली. मला त्यात काही रुची नसल्याने, मी म्हणालो, "ते खरे असेल, असे मी म्हणू शकत नाही.

तो सावकाश पण उत्सुकतेने बोलला, "अर्थातच ते तसे आहे. मी म्हणतो, ती प्रत्येक गोष्ट तशी आहे."

मी कमी रागाने म्हणालो, "मी तुझ्या शब्दांना हरकत घेत नाही आहे. तू माझ्या शब्दांना हरकत घेतो आहेस. तू जाणतोस, की मला माझ्या मित्राची मजकूर वाचायची क्षमता माहिती आहे."

हे ऐकून, तो काही वेळ गप्प राहिला. मग गर्विष्ठपणे बोलला, “असे बघ, जर तो वाईट असेल, तर त्या कागदावर काय लिहिले आहे, हे तो जाणतो. जर कागद कॉर्डी कॅन्सीला दोषी म्हणत असेल, तर ती निरपराध कशी असेल?”

“कारण कागदावरील निर्णय पुराव्याशी मिळताजुळता नाही. माझ्या मित्राने पुरावा पाहीला आहे आणि स्वतःशी निर्णय घेतला आहे, की ती बाई फसवेगिरी केल्याबद्दल दोषी आहे, पण तिने खून केलेला नाही.”

हे ऐकून डोंगरातील माणूस क्षणभर थांबला. त्याच्या चामड्यासारख्या चेहऱ्यावर, विशिष्ट भाव आले. “तो गुप्तहेर आहे, नाही का?”

“अं --- अगदी तसेच नाही. तो ओहीयो विद्यापीठात शिक्षक होता आणि त्याने गुप्तहेरांना तपासून कसा शोध घ्यायचा हे शिकवले आहे.”

“त्याला पैसे देऊन इथे कुणी बोलावले आहे?”

मी म्हटले, “कुणी नाही. तो असाच इथे येऊन टपकला आहे.”

“टपकला आहे? आणि मी यावर विश्वास ठेऊ म्हणतोस?”

“हो, मी असेच म्हणेन.”

“ठीक आहे. हे जरा माझ्या बाजूने बघ --- त्याने इथे या मिनिटाला येणे, तिच्या मदतीसाठी प्रार्थना करणे आणि शेरीफने तिच्यासाठी नवीन तुरुंग सुरु करणे --- त्याच्या सारखा मोठा गुप्तहेर इथे फक्त कर्मधर्मसंयोगाने येणे, यावर मी विश्वास ठेवावा, अशी तुझी अपेक्षा आहे का?”

ही चर्चा फार गरम डोक्याने चालली होती आणि माझा मित्र मला या परिस्थितीला कारणीभूत ठरवत होता.

मी मित्रत्वाच्या/सुखकारक स्वरात विचारले. “ठीक आहे. तुझा कशावर

विश्वास आहे?”

त्यामुळे त्याला वाटते, त्याला कशावरही विश्वास ठेवण्याची परवानगी मिळाली. त्यात काही बळजोरी नाही.

“का, मी तेच तर म्हणालो. त्यावर विश्वास ठेवायला एवढे अवघड काय आहे?”

गुन्हेगारीशी संबंधित संशोधनासाठी, एकही पै न घेणाऱ्या पोगीओलीवरील त्याच्या संशयाने माझे मनोरंजन केले. “ठीक आहे, तो तुझा विशेष हक्क आहे. पण त्यामुळे तुझा माझ्यावरील विश्वास वाढणार असेल, तर मला माहिती आहे, त्याप्रमाणे प्राध्यापक हेन्री पोगीओलीचे लॅनेसबर्गला येणे व टेनेसीमधील मिसेस कॉर्डी कॅन्सीचे नॅशव्हीलमधील विशेष तुरुंगात जाणे, हे एकत्र जमून आले, हा योगायोगच मानावा लागेल. त्यामुळे जॉन डो, मला मदत कर.

“माझ्या मित्राची मनस्थिती सुधारेल, अशी मी आशा करतो.” असे म्हणत, तो स्टुलावरून सावकाश उठला.

“मला वाटते, देवाचे पवित्र शब्द खराब केल्याबद्दल, देव तुला क्षमा करेल.”

मी त्याला आठवण केली, “ते काही देवाचे पवित्र शब्द नाहीत. ते साक्ष देतानाचे शेरीफचे शब्द आहेत.”

“काही झाले तरी, तू त्याचे शब्द उगीचच घेतलेस.”

मी म्हणालो, “मी त्याचे नाव घेतले नाही.”

“जॉन डो.”

त्याने धोका सुचवत, हळू लांबण लावत म्हटले, “तू हळूवारपणे बोलायला पाहिजेस.”

बायबल हळू, लांबण लावत बोलायला मनाई करते ---

त्याचा पाय दाराबाहेर टाकत, माझी धूळ त्याच्या बुटाने झटकत, तो कॅफेमधून बाहेर पडला. मी त्या हळू चालणाऱ्याला पुसट आकृतीला जातांना पाहिले, तेव्हा पोगीओली कागदपत्रांमधून बाहेर पडला.

“त्याचे हावभाव कोड्यात टाकणारे होते, बरोबर?”

मी बोललो, “मला तसे वाटले नाहीत. मी इथेच डोंगरात जन्मलो आहे.”

“तू त्याला जाणलेस का?”

“मला असे वाटते.”

“तू अजून त्याच्याबद्दलची जास्त नेमकी व ठळक विरोधाभासात्मक विधाने ऐकलेली नाहीस का?”

“मी त्या माणसाबद्दलच्या काही साध्या विरोधाभासात्मक व काही सरळ गोष्टींचा विचार केला. पोगीओलीने ते दाखवल्यावर अगदी सहज वाटले. पण असे काही माझ्या मनात आले नाही. त्याने जे पाहिले, ते काम त्याने करायला घेतले .

दोन अगदी विरोधी प्रतिक्रियाः मी गुप्तहेर असल्यामुळे तो बेचैन झाला होता आणि तुमचे अधर्माच्या व अयोग्यतेच्या जवळचे वागणे!”

“तुला जे म्हणायचे आहे, तसे मला काहीच दिसत नाही.”

“मी ते सोपे करतो. तो खरे तर एका चर्चमध्ये धर्मगुरूच्या हाताखालील महत्वाचा माणूस होता.”

“तू असे का म्हणतोस?”

“कारण त्याने तुझ्या भाषेचा हलकेपणा सुधारला. बायबलमधील पवित्र

वचने भावाच्या चुका दाखवून देतात. भाषेचा हलकेपणा हे त्यापैकी एक आहे. त्यामुळे तो बहुधा चर्चमधील धर्मगुरूच्या खालील महत्वाचा माणूस होता.”

“ठीक आहे. तो होता. त्यात काय विरोधाभास आहे?”

मी गुप्तहेर असल्याने तो बिथरलेला आहे. चर्चमधील धर्मगुरूच्या खालील महत्वाचा माणूस कायदेकानून पाळणारा असावा, अशी अपेक्षा आहे.”

मी हसलो. तुला तुझ्या टेनेसी डोंगरातील चर्चमधील महत्वाची माणसे माहिती नाहीत. त्यांच्यातील विरोधाभास हा पुरातन आहे. त्यांचे पूर्वज इथे क्रांतीपूर्वी, देवाची भक्ती करायला आले. त्याना जकात भरावी न लागल्याने, ते खूष होते. ते देवासाठी व कायद्याच्या विरुद्ध होते.”

यावेळी चौकातून घाईघाईने एक मनुष्य मोनार्च कॅफेमध्ये आला. मला त्याची घाई लक्षात आली, कारण सामान्य परिस्थतीत डोंगरातील माणसे कधी घाई करत नाहीत, पावसातही नाही. त्याने गल्ल्याच्या खालीवर पाहीले व लगेच माझ्या मित्राकडे आला व हात उचलला. “भावा, मला माफ कर. पण तू धर्मप्रचारक नाहीस ना?”

माझा मित्र म्हणाला, “नाही, मी तो नाही.”

“मग तू पाठवलेला गुप्तहेर आहेस. तू माझ्याबरोबर येशील का?”

गुन्हेअन्वेषकाने विचारले, “पाठवलेला म्हणजे तुला काय म्हणायचे आहे?

त्या मनुष्याने घाईघाईने, पण प्रामाणिकपणे स्पष्ट करायला सुरवात केली. “भाऊ जॉन्सन, देवाने तुला का पाठवले? भगिनी कॉर्डी कॅन्सीचे निरपराधीत्व सिद्ध व्हावे म्हणून व तिला तुरुंगात जावे लागू नये म्हणून सगळे देवाची प्रार्थना करत होते.

जिम फिप्सने तुम्हाला सर्वांना बोलतांना ऐकले. तो घाईने आमच्याकडे येऊन आम्हाला बोलला, की इथे गुप्तहेर आहे त्यामुळे त्यानेच तुम्हाला पाठवले असणार.”

पोगीओलीने विचार केला, ‘मला खात्री आहे की मी त्या बाईला कागदावर छापलेल्या मजकुराच्या आधारे, निरपराध सिद्ध करू शकेन. पण जर कोर्टातील खटला संपून तिला आधीच शिक्षा झाली आहे, तर त्यामुळे काय चांगले होईल?’

गावातील माणूस बोलला, “अरे भावा, जर देवाने हे काम सुरु केले असेल, तर तो ते संपवेलही, असे तुला वाटत नाही का?”

मी म्हणालो, “पोगीओली, असे बघ, आपण इथे काही ना काही कारणासाठी आलो आहोत.”

मानसशास्त्रज्ञ बोलला, “हो, पण केवळ कर्मधर्मसंयोगाने/अपघाताने. आपल्या इथे येण्याचा त्या बाईशी काही संबंध नाही --- “

मी मध्येच बोललो, तेव्हा तो हसू बघत होता. “जर तुला माहिती आहे की ती निरपराध आहे, तर तुला ते तुझे कर्तव्य वाटत नाही का की --- “

मानसशास्त्रज्ञाने मला हाताने व हावभावाने थांबवले, “मी तरी समजतो, की ते माझे कर्तव्य आहे --- हो --- हो, कर्तव्य आहे. मला जे करता येईल, ते मी करेन.”

त्याच्यासाठी आलेला माणूस फार उतराई झाला होता. तसेच कॅफेमधील इतर लोकही होते, कारण त्यांनी बोलणे ऐकले होते. मी सोडून सगळे आनंदित होते. मला पोगीओलीचा स्वर किंवा चेहऱ्यावरचे हावभाव आवडले नाहीत. तो खरेच काय करणार आहे, याबद्दल मी नवल करत होतो.

तर आम्ही कॅफेबाहेर पडतो तोच, चौकातील सगळ्यांना माहिती झाले होते, की आम्ही कोण आहोत. तिथे खूप गोंधळ गडबड उडाला. धर्मप्रचारकाची मदतीसाठी केलेली प्रार्थना लगेच ऐकली गेली. हा एक चमत्कार होता.

चौकाच्या दक्षिणेला, त्या गावातील तुरुंगासमोर थांबून, मोठ्याने आवाज करत ट्रक उभा होता. ट्रकशेजारी शेरीफची मोटार उभी होती. त्यातील मागील बसायच्च्या जागेवर वर हातकड्या घातलेली स्त्री कैदी बसली होती. गाडीजवळ हातात एक छोटे बाळ घेऊन अजून एक बाई उभी होती. ते बाळ त्या कैदी स्त्रीचे असल्याचे मी समजलो. त्या बाळाची आई नॅशव्हीलमधील तुरुंगात जाणार होती आणि बाळ मात्र इथे लॅनेसबर्गमधील तुरुंगात रहाणार होते. गर्दी अर्थातच त्या बाईला सहानुभूती दाखवणारी व तिची कैवारी होती आणि आम्ही तिची लवकर सुटका करावी व तिला त्रासातून मुक्त करावे, अशी अपेक्षा आमच्याकडून ती करत होती. मी एका माणसाला असे बोलतांना ऐकले, की जसे आम्ही पुढे ढकलले जाऊ, "तो जाडा मनुष्य गुप्तहेर आहे व तो बारीक मनुष्य त्याचा मदतनीस आहे. जाडा मनुष्य जे करतो, ते हा बारीक मनुष्य लिहितो.

मोकळेपणे सांगायचे, तर मी ती परिस्थिती पाहून हेलावून गेलो. काय होईल, या विचाराने मी बेचैन होतो. मी पोगीओलीला विचारले, की त्याचा काय करायचा विचार आहे?"

आम्ही चालत असतांना त्याने माझ्याकडे नजर टाकली. "भ्रामकपणातून त्यांना वाचव/ त्यातून बाहेर काढ."

"तुम्हाला तेच म्हणायचे आहे. त्यांना --- त्यापासून परावृत्त कर."

त्याने भोवतालच्या गर्दीकडे बघून मान हलवली. "मी या लोकांना सिद्ध

करून दाखवेन, की ती बाई निरपराध आहे, पण त्याच वेळी हेदेखील दाखवेन की माझे म्हणणे तिच्यासारख्या कैद्यांसाठी फायद्याचे नाही. गर्दीला हे कळलेच पाहिजे, की देवाच्या संरक्षक/अधात्मिक शक्तीला भौतिक पदार्थाशी काही देणेघेणे नसते आणि गट म्हणून त्यांनी जास्त बुद्धिवादी व वास्तविकतेचे भान असलेले व्हायला हवे. ते माझे कर्तव्य आहे, असे मी समजतो."

त्याचा सर्व बेत मला दुष्टपणाचा वाटला. मी म्हणालो, "ठीक आहे. बरे झाले, ते तू पाच मिनिटात अंमलात आणू शकणार नाहीस आणि शेरीफ निघण्यापूर्वी त्यांना तेवढाच वेळ देऊ शकेल." पोगीओलीच्या दिखाव्याला टाळायची सर्व आशा क्षणार्धात मावळली. मी त्या लहानशा माणसाला, शेरीफला त्याच्या गाडीत उतरतांना व आवाज करणाऱ्या ट्रक ओलांडून जातांना पाहीले. त्याने मंत्र्याकडून ध्वनीक्षेपक यंत्र घेतले व मग मी त्यावर शेरीफचा आवाज ऐकला.

"स्त्रिया व पुरुषहो, मला कळते आहे की मिसेस कॉर्डी कॅन्सीसाठीची मदत येऊ घातली आहे. ती काही चमत्कार आहे, की माणसाने केलेली मदत आहे, हे मी जाणत नाही. पण काही झाले तरी, मी मिसेस कॉर्डी कॅन्सीला नॅशव्हीलमधील तुरुंगात जायला निघण्यापूर्वी, एक तासाची मुदत देतो."

हे ऐकून गर्दीतून पसंतीचा घोष उमटला. ट्रकमधील मंत्र्याने मग ध्वनीक्षेपक यंत्र घेतले व औपचारिकपणे सावकाश बोलला, "भावाबहीणींनो, या चांगल्या माणसाला कुणीतरी पाठवले असणार याबद्दल, माझ्या मनात एक औसही संशय नाही. मी तुम्हाला त्याची ओळख करून देतो. मासिकातून तुम्ही ज्याच्याबद्दल वाचले आहे तो प्रसिद्ध गुप्तहेर, हेन्री पोगीओली आहे. देवाने एक चमत्कार म्हणून भगिनी कॉर्डी कॅन्सीची त्रासातून मुक्तता करायला व ती पूर्णपणे निर्दोष असल्याचे सिद्ध करायला डॉ पोगीओलीला पाठवले आहे. ती शक्तिवान व चांगली बाई आहे.

तरीही तिने तिच्या नवऱ्याचे मृत्युपत्र कार्बन कागद घेऊन, फसवून बदलले आहे आणि त्याची काही जुनी प्रेमपत्रे कार्बनपेपरने, जशीच्या तशी नकलून काढली आहेत. तिने पाहिले की ते चुकीचे होते. पण तिने ते केले तेव्हा, ती देवाची कीर्ती वाढवत नव्हती.”

पसंतीचा आरडाओरडा --- ‘विजय असो, देवा रे, तिला वाचव. इत्यादी.’ हे चालू राहीले. “जिम कॅन्सी, तिचा नवरा मूर्खपणे ओरडून, त्याच्या वस्तू खपवणारा फेरीवाला होता. त्याने कधी देवासाठी एक पैदेखील खर्च केली नव्हती किंवा देवाच्या प्रार्थनेसाठी कधी गुडघे वाकवले नव्हते. त्यामुळे भगिनी कॉर्डी कॅन्सीने त्याचे मृत्युपत्र बदलून, त्यात काही धार्मिक बाबी घातल्या.

आता मला वाटते देवाला माहिती होते, की जिम मारला जाणार आहे. पण भगिनी कॉर्डी कॅन्सीला त्याचे काही देणेघेणे नव्हते. तो असाच मारला गेला आणि तुम्हाला सगळ्यांना माहिती आहे, की त्याच्या पैशांचे तिने काय केले --- तर चर्चच्या जुन्या चामडी व लाकडी छतावर नवीन छत घातले. अरे देवा, तिला तुरुंगवासातून वाचव!” [ इथे अजून आशेच्या व सहानुभूतीच्या गर्जना केल्या गेल्या.] “आणि बंधु व भगिनिंनो, तिच्यावर जिमच्या खुनाचा आरोप केला गेला, तरी पहा, ती कोर्टात कसे वागली. तिने वकिलावर काहीही पैसे खर्च केले नाहीत. ती म्हणाली, तिला पैसे तसे खर्च कारायचे नाही आहेत. देव तिला वाचवेल. तिचा वकील स्वर्गात असतांना तिला पृथ्वीवरील वकिलाची गरज नव्हती. ती म्हणाली, तोच तिला मदत पाठवेल. आणि आता लोक त्याच्या नावाचा उदोउदो करत असतांना, त्याने अगदी निकडीच्या वेळी मदत पाठवली आहे.” [ परत आरडाओरडा आणि टाळ्यांनी त्याच्या बोलण्यात विघ्न आणले. ] जेव्हा थोडी शांतता प्रस्थापित झाली, तेव्हा तो म्हणाला, “डॉ पोगीओली, आता तुम्ही भगिनी

कॉर्डी कॅन्सीचे तिच्या नवऱ्याला तिने न मारल्याचे, निरागिसत्व सिद्ध करून तिला मोकळे करू शकता.”

पुन्हा उठलेल्या घोषणाबाजीत, मंत्र्याने मोठ्या मानाने ध्वनीक्षेपक यंत्र जमिनीवरील पोगीओलीकडे दिले. पोगीओलीच्या घटनांनी भरलेल्या आयुष्यात, मी कधीच एवढा नाराज नव्हतो. मला असे वाटत नव्हते, की तो जे काही करू पहातो आहे, त्यामुळे खरोखर त्या रागीट, डोंगरातील गावढळ लोकांपासून तो काही धोक्यात असेल. उलट, दक्षिणेकडे तीन मिनिटात, गर्दी जमू शकत होती आणि ते काहीही करू शकले असते --- ते माणसाला गावाबाहेर रुळांवर/ डांबरी रस्त्यावर हाकलू शकले असते. ते किती चिडले आहेत, त्यावरून ते त्याला फडफड करायला लावत आहेत, की अजून काही ते ठरले असते. पोगीओली कधीही दक्षिणेकडे राहीला नव्हता. तो कुणाशी काय करतो आहे, याची त्याला कल्पना नव्हती.

त्याने सुरवात केली, “स्त्रिया व पुरुषांनो, मला थोडेच बोलायचे आहे. मी आताच मिसेस कॉर्डी कॅन्सीच्या खटल्याचा अहवाल वाचला. त्यावरून मी तिच्या नवऱ्याला तिने मारले नसल्याबद्दल खात्रीपूर्वक सांगू शकतो. पण दुर्दैवाने, ते तिच्यासाठी काही उपयोगाचे नाही.”

“का नाही? असे काय झाले आहे? तुम्ही असे का बोलत आहात?” अशा आरोळ्या उठल्या.

“मित्रांनो, कारण कायदेशीर तांत्रिकतेमुळे. जर मी नवीन पुरावा गोळा करू शकलो, तर जज्ज पुन्हा ती केस उघडू शकतात आणि तिला शिक्षेतून मुक्त करू शकतात. पण जुन्या पुराव्यांचा नवा अर्थ लावणे, हे परत नव्याने केस सुरु करायचे कायदेशीर कारण ठरू शकत नाही. मी काय करू शकतो, तर तुमच्या गावातील मूळ कागदावरील मिसेस कॉर्डी कॅन्सी दोषी असल्याचा पुरावा तुम्हाला समजावून

सांगणे. पण तरीही तिला शेरीफबरोबर नॅशव्हीलमधील विशेष तुरुंगात जावेच लागेल.”

चौकात दुःख पसरले. तिथे किंकाळ्या, शपथा व रडणे उमटले. ते धार्मिक सुधारणावादी लोक कायदा मोडायला निघाले. त्यानी ध्वनीक्षेपक यंत्र उचलून, ओरडून सांगितले, “ओहो, तुम्ही फार विश्वास नसणारे लोकहो, तुम्हाला भगिनी कॉर्डी कॅन्सीची मुक्ती हातभर अंतरावर आल्याचे दिसत नाही का? तुम्हाला असे वाटते का, की काही उपयोग नसतांना, देव इथे गुप्तहेराला पाठवेल? मी इथे विजयाच्या काठावर उभा आहे. बंधु पोगीओली, चांगल्या मनाने बोलत रहा!”

पोगीओलीने परिस्थितीवर पूर्णपणे भौतिकवादी अशी सोडवणूक शोधणे व मंत्र्याने घाईने काही चमत्कृती घडण्याची आशा धरणे, या परिस्थतीतील विरोधाभासाने, मला घायाळ केले. हे खरोखर एकमेकाच्या विरुद्ध होते. सुदैवाने, मी सोडून कोणालाच हा अंतर्गत विरोधाभास माहिती नव्हता. नाहीतर अन्यायी वागणुकीमुळे लोकांच्या रागाचा स्फोट झाला असता. शास्त्रज्ञाने त्याचा पुरावा शोधायला सुरवात केलीः

स्त्रिया व पुरुषांनो, तुमचा मंत्री तुमच्या स्मरणशक्तीला आवाहन करतो आहे. मिसेस कॉर्डी कॅन्सीने तिच्या नवऱ्याचे मृत्युपत्र कसे त्याला फसवून, त्याच्या जुन्या प्रेमपत्रांच्या फाईलमधील प्रत्येक कागदाची कार्बन नक्कल काढून बदलले, ते आठवा. पण त्याने याचा उल्लेख केला नाही, की तिने हे केल्यावर --- तिला कळले व तिने त्या पत्रांवर काट मारली व काही शब्द अधोरेखित केले. तिच्या फसवणुकीचा सरळसरळ व सहज निष्कर्ष काढण्यासारखा पुरावा म्हणजे तिने अजूनही ती प्रेमपत्रे जपून ठेवली आहेत. तिने ती नाहीशी केली नाहीत. तिने ती किल्ली हरवलेल्या ट्रंकेत

ठेवली व ट्रंक कुटुंबाच्या उठाबसायच्या खोलीत ठेवली. आता प्रत्येक बाई आणि माणूस किंवा मी म्हणेन अगदी मूलही यावरून स्पष्टपणे काय पुरावा शोधेल?"

अर्थात, यामध्ये तो चुकत होता. त्याने श्रोत्यांची बुद्धीमत्ता फार जास्त असल्याचा अंदाज केला. त्याच्याजवळ असणारे, त्याला ऐकू शकणारे, त्याला ओरडून स्पष्टीकरण मागत होते. तो मानसशास्त्रज्ञ धीर देत बोलला, "अजून स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे, जर तिला तिच्या नवऱ्याची प्रेमपत्रे ठेवण्यासाठी, नवऱ्याबद्दल पुरेसे भावनामय वाटले असते, तर तिने नक्कीच त्याच्या खुनाचा विचार केला नाही. शिवाय, तिच्या असे लक्षात आले असेल, की तिने खुणा केलेली पत्रे किरकोळ फसवणुकीचा निखळ पुरावा ठरतील. तिला हेदेखील माहिती असेल, की जर तिच्या नवऱ्याचा खून झाला, तर तिच्या घराची झडती घेतली जाईल आणि ती प्रेमपत्रे सापडतील. त्यामुळे तिने नवऱ्याचा खून तर केला नाहीच पण तिला असा संशय देखील आला नाही, की त्याचा खून होईल. ती पत्रे तिच्या उघड्या ट्रंकेत ठेवली, त्यावरून ती मुख्य खुनी किंवा खुन्याची मदतनीस असावी, हे अशक्य दिसते."

गर्दीवरून पोगीओलीच्या साध्या अवगामी पद्धतीच्या बुद्धिमत्तेच्या आश्चर्याची एक लहर दौडत गेली. प्रत्येकाला वाटले, की त्याने असा विचार करायला हवा होता.

पोगीओलीने शांततेसाठी एक हालचाल केली व दाखवले, की त्याचा पुरावा हा निष्कर्षाप्रत नेणारा नाही. शांतता पसरली आणि मानसशास्त्रज्ञाने चालू ठेवले.

"तुमचा मंत्री म्हणतो आणि मीदेखील तुमच्या गावाच्या कागदावर लिहिलेले वाचले आहे, की मिसेस कॅन्सीने तिची केस लढण्यासाठी वकील घेतला

नव्हता. तिने सगळे पैसे चर्चचे जुने चामडी व लाकडाच्या छतावरून, नवीन छप्पर घालण्यासाठी खर्च केले. ती कोर्टात बोलली, तिने हे केले कारण देवच तिला मदत करेल.

इथे आरोळ्या उठल्या. “त्याने केले! तो आता करतो आहे! त्याने तुम्हाला इथे तिला वाचवण्यासाठी पाठवले आहे!”

पोगीओलीने त्याचा हात वर करून, त्याचे डोके मनाई केल्यासारखे हलवले. चौकातील ते त्याचे पूर्ण प्रगटीकरण होते --- भौतिक दृष्टीकोनाने तो डोंगरातील लोकांचा त्रास कमी करण्याची आशा करत होता. योग्य वेळी होणाऱ्या घटनांवर भरवसा असणाऱ्या लोकांना स्वतः होऊन शास्त्रीय बैठकीवर विश्वास ठेवायला सांगणार होता. तो चढउतार असलेल्या आवाजात, सावकाश बोलू लागला.

“स्त्रीपुरुषहो, मला हे सांगायला खेद होतो, की मी इथे केवळ अपघाताने आलो आहे. का? कारण मी खूप उशीरा आलो आहे. जर सर्वशक्तिमान देवाने मला एका निरागस बाईला वाचवण्यासाठी पाठवले असेल --- आणि ती बाई निरपराध असेल --- तर मला देवाने नक्कीच योग्य वेळी पाठवले असणार. पण मी तर वेळेवर आलेलो नाही. खटला निकाली काढण्यात आलेला आहे. सगळे पुरावे सांगितले व ऐकले गेले आहेत. जुन्या पुराव्यांच्या आधारावर आपण पुन्हा तो खटला उभा करू शकणार नाही. पण जुन्या पुराव्यांचा नवा अर्थ लावणे शक्य आहे. तेच मी तुम्हाला सांगतो आहे. त्यामुळे तुरुंगात निघालेली, ही काही गुन्हा न केलेली बाई तिथे जाणारच व तिची अन्यायकारक शिक्षा भोगणारच. आज मी इथे आलो आहे, त्याचा कुणाला काही उपयोग नाही आणि ते केवळ संधीवर अवलंबून राहील.”

हे दयनीय निराशाजनक बोलणे ऐकून, चौकातील गर्दी पुन्हा एकदा ओरडू लागली. माणसे शेरीफकडे त्या स्त्रीला मोकळे सोडण्यासाठी सांगत, चालून गेली. त्याने तसे न केल्यास ती गर्दी ते करणार होती. क्रांतीकारकांना थंड डोक्यांनी मागे खेचले गेले. आवाज वाढले, "डॉ पोगीओली, खून कोणी केला? तुम्हाला सर्व माहिती आहे. खून कोणी केला?"

गुन्हा शोधणाऱ्याने नकारात्मक हात हलवला. "मला काही कल्पना नाही."

एक जाडा मनुष्य बोलला, "अरे राक्षसा, चल लवकर सांग, जिमला कोणी मारले? तुझ्यासारखाच विचार करून बोल, की त्याची बायको निरागस आहे!"

"मी ते करू शकत नाही. ते अशक्य आहे. मी गुन्ह्याच्या पुराव्याचा अभ्यास केलेला नाही. असा पुरावा की जो गुन्हा न झाल्याचे कबूल करतो --- पूर्णपणे वेगळीच गोष्ट."

पाच सहा लोक ओरडले, "विचार करत रहा. तुझे चालू दे. एवढा काळ तुला देवाने मदत केली आहे. तो तुझ्या पाठीशी असेल."

तर्काधिष्ठीत पायावर आधारित, पोगीओली करत असलेल्या, आत्मिक स्पष्टीकरणासाठी ,गर्दीला भौतिक दृष्टीकोनाकडे वळवण्यासाठी, हे वाईट पद्धतीने मनोरंजन करणारे होते. तरीही मला वाटते, पोगीओलीचे मनोरंजन झाले नसावे. त्याने त्याचे हात एकमेकात गुंतवून ठेवले होते.

"मित्रांनो, मी फक्त एक तासापूर्वी या गावात जेवणासाठी थांबलो होतो. मला कसे काय काही माहिती असेल?"

त्याच्या स्वतःच्या शेतातील मक्याच्या कणसाच्या रंगाचा एक सुकट म्हातारा म्हणाला, "कोणीतरी जिमला गोळी घातली नाही का, डॉ पोगीओली?"

"ओहो, हो. कुणीतरी त्याला गोळी घातली."

"कोणी जिम कॅन्सीला गोळी घातली, याची तुम्हाला काही कल्पना आहे का?"

"ओहो, नक्कीच. मला स्पष्ट कल्पना आहे, कुठल्या प्रकारच्या माणसाने जिम कॅन्सीला गोळी घातली."

तो म्हातारा समाधानाने म्हणाला, "मला वाटलेच होते, तुम्हाला माहिती असणार. नक्की माहिती असणार."

तो म्हातारा ऑफिसरकडे वळून म्हणाला, "देवाने माझ्या हृदयात तुम्हाला तोच प्रश्न विचारायचे घातले. शेरीफ मॅथन, त्याला तुम्हाला सांगायला वेळ मिळाला का, की भगिनी कॉर्डीने सांगितलेले तुम्ही लिहून घेण्यापूर्वी, कुठल्या प्रकारच्या माणसाने जिमचा खून केला"

ऑफिसरने त्याचा हात थांबवला. "मी भगिनी कॉर्डीसाठीची वेळ दोन तासांने वाढवत आहे --- म्हणजे तिच्याऐवजी तिच्या नवऱ्याचा खून कुणी केला, हे शोधून काढता येईल."

एका बाईचा आवाज आला, "ठीक आहे. तुम्ही बोलत रहा आणि आम्हाला सांगा, की ते कुणी केले!"

"बाईसाहेब, मी असे म्हणेन, की जिम कॅन्सीला मारणारा एक प्रकारचा वेगळा माणूस होता."

ऐकणारे खूपजण ओरडले, "ओहो, हो, ते आम्हाला सगळ्यांना माहिती आहे. बायका कुणालाच मारत नाही, असे नाही. नियमाप्रमाणे त्या ज्याला मारायचे तो माणूस फक्त ठरवतात. चला. आम्हाला तो कोण मूर्ख माणूस होता, ते सांगा."

पोगीओली मोठ्याने बोलला, “ठीक आहे, मी बघतो. आपण मागे जाऊन फसवण्यापासून सुरवात करू. मिसेस कॅन्सीने ते केले. ती ते कबूल करते. पण ती कल्पना तिची नव्हती. कारण ती अती गुन्हेगारी स्वरूपाची कल्पना आहे आणि तिला उच्च स्वरूपाच्या गुन्हेगारी मानसशास्त्राचा गंधही नाही. ती केवळ कर्तव्यपूर्ण आणि धार्मिक मानसशास्त्र जाणते. मला हेदेखील माहिती आहे, की ती जुन्या प्रेमपत्रांमधून मृत्युपत्र शोधण्याइतकी हुशार असेल, तर तिला हेदेखील माहिती असले पाहीजे, की ती बिनकुलुपाच्या उघड्या बॅगेत ठेवणे किती धोकादायक आहे. तिने ती लगेच नष्ट करून टाकायला हवी होती. त्यामुळे मला तिला मृत्युपत्रात फसवाफसवी करण्याचे सुचवणारा कोणीतरी माहिती आहे.”

जसे काही खरा गुन्हेगार सापडल्यासारख्या तिथे अजून रागीट आरोळ्या उठल्या. काही आवाजांनी इतर आवाजांना गप्प करायचा प्रयत्न केला, जेणेकरून मानसशास्त्रज्ञ पुढे बोलू शकेल.

तर मग पोगीओलीने पुढे चालू ठेवले. “ठीक आहे. फसवण्याची मूळ कल्पना मिसेस कॅन्सीची नव्हती. तिला फक्त वापरले गेले. पण ती काही कडक, पक्का इरादा असलेली बाई नव्हती. तिला तिथे शेरीफच्या गाडीत बघा आणि तुम्हाला ते समजेल. ती हळूवार व ठाम नसलेली, दुसऱ्याचे ऐकणारी बाई होती. पण तिने कुठलाही दुष्ट बेत शेवटास नेला नसता.

पण तिच्या खटल्यात, तिने सांगायला विचित्र असा एक बेत, त्याच्या कटू शेवटापर्यंत आखला होता आणि तो होता चर्चच्या जुन्या चामडी व लाकडी छतावर नवीन छत बसवणे आणि तोच जिम कॅन्सीचा खून करायचा मुख्य उद्देश होता. तो वेगळाच होता, पण मिसेस कॅन्सीने खटल्यामध्ये स्वतःसाठी वकील घायला नकार दिला. का? चर्चसाठी खर्च करायला पैसे उरावेत म्हणून. त्यामुळे ज्याने तिला

फसवायला उद्युक्त केले, त्याने तिला चर्चसाठी पैसे खर्च करायलाही विरोध केला असणार आणि देव खाली येऊन तिला खुनाच्या आरोपातून मुक्त करेल, असे सांगितले असणार.”

हे ऐकून, गर्दीचा उत्साह खूप वाढला. त्यांनी त्यांच्या टोप्या उडवल्या. ते ओरडत सुटले. आता वचन दिल्याप्रमाणे देव मिसेस कॅन्सीच्या मदतीला धाऊन आलेला आहे. शेरीफने त्याची गाडी उंच केली व ओरडला, की आता त्याने भगिनी कॅन्सीच्या तुरुंगात जाण्याची वेळ उरलेला दिवस वाढवली आहे. तो ओरडला, की ते लवकरच गुन्हेगाराला शोधून काढतील आणि त्याला गावात अटक केली जाईल.

मला दिसत होते, की पोगीओलीचा आत्मविश्वास कमी होतो आहे. तो असा का होत होता, ते माझ्यापेक्षा तो हुशार मानसशास्त्रज्ञच जास्त चांगले सांगू शकला असता. अर्थात, त्याचे दाखवणे योग्य मार्गापासून दूर चालले होते. त्याला जिथे जायचे होते, तिथे तो पोचू शकत नव्हता. त्याने त्याचे हात वर उचलले आणि गर्दीला हात जोडून विनवणी केली.

“माझ्या मित्रांनो, कृपया हे लक्षात ठेवा. मला हा मनुष्य माहिती नाही. तो कोण आहे, याची मला काही कल्पना नाही. मी फक्त तो कशा प्रकारचा असेल, हे सांगू शकतो.”

खूप लोक म्हणाले, “ठीक आहे. आम्हाला सांगा, तो कशा प्रकारचा असेल. त्यामुळे शेरीफ मॅथन त्याला कैद करू शकेल!”

गुन्हेगारशास्त्रज्ञाने स्वतःला सावरले. “त्याचा प्रकार मी सांगतो. मी मोनार्च कॅफेमध्ये थोड्या वेळापूर्वी जेवण घेतले आणि गावाच्या वर्तमानपत्रात, मी मिसेस कॅन्सीच्या खटल्याचा अहवाल वाचत होतो. वाचतांना, माझ्याशेजारील माणूस बोलला, की ते पान तिथे पडलेले आहे व परक्या लोकांना तो ते वाचतांना खूप महिने

पाहतो आहे. अशी शक्यता आहे, की त्या माणसाचा खुनाशी काही संबंध असू शकतो. किंवा तो खुनाबद्दल सहजच चौकस असू शकतो --- “

गर्दीतून समाधानाच्या आरोळ्या आल्या. “पुढे सांगा. आता तुम्हाला काही सापडते आहे!”

पोगीओलीने त्यांना थांबवले. “थांबा. थांबा. मी काही त्याला गुन्हेगार ठरवू शकत नाही. मी तुम्हाला गुन्हेगाराचा प्रत्येक पैलू किंवा पुराव्याचा तुकडा दाखवायचा प्रयत्न करतो आहे.”

“ठीक आहे डॉक्टर, जर त्याने जिमला मारले नसेल, तर मग कुणी मारले?”

पोगीओलीने त्याचा चेहरा पुसला. “ते मला माहिती नाही. किंवा कॅफेमधील त्या माणसाबद्दलही मला काही माहिती नाही. मी तुम्हाला फक्त गुन्हेगाराचे शक्य असलेले मानसशास्त्रीय वर्णन देण्याचा प्रयत्न करतो आहे. आता माझ्या टेबलावरील या माणसाने माझ्या मित्राला धार्मिक नियम मोडल्याबद्दल दोष दिला. खरे तर तो त्यामुळे खूप चिडला होता. जिम मोकळेपणे विचार करणारा असल्याचे आपल्याला माहिती आहे. त्यामुळे या दोन गोष्टींची सांगड घातली जाऊ शकते. जिमसारख्या माणसाने त्याला खूप चीड आणली असणे शक्य आहे. जर जिम कॅन्सीने या माणसाच्या विश्वासाला धक्का पोचवला असेल, तर या

माणसाने असा विचार केला असेल, की या फसव्याला काही शिक्षा दिली तरी चालेल, अगदी मरणाचीदेखील!

त्याने स्वतःचे मन वळवण्याचा प्रयत्न केला असेल, की कॅन्सीच्या मरणामुळे मिळणारा पैसा तो चर्चच्या कामाकडे वळवू शकेल --- उदाहरणार्थ, नवीन छत बसवणे. असे बेत आखून, त्याने सहज मिसेस कॅन्सीला मिस्टर कॅन्सीचे मृत्युपत्र फसवून, बदलायला भाग पाडले असेल व पैसा चर्चसाठी वापरायचे बंधन तिच्यावर

घातले असेल. मग त्याने त्रास देऊन मिस्टर कॅन्सीला मारले असेल आणि मृत्युपत्र सहज मिळेल असे ठेवले असेल. यामुळे दोन गोष्टी घडू शकल्या असतील. त्याचे खाजगी वैर साधणे आणि चर्चचा फायदा करून देणे --- किंवा आता मी विश्लेषण करायचा प्रयत्न केला, तसा --- त्या प्रकारचा खुनी असू शकेल किंवा पूर्णपणे वेगळाही असू शकेल.”

अजून किती प्रकार पोगीओलीने सांगितले असते कुणास ठाऊक, या वळणावर शेरीफला शोध लागला, की त्याची कैदी चक्कर येऊन पडली आहे. यामुळे एकच गोंधळ झाला. एका डोंगरात रहाणाऱ्या बाईला चक्कर यावी, म्हणजे घोड्याला चक्कर येण्यासारखेच होते. शेरीफ मॅथन त्याच्या गाडीतून उठला आणि ओरडला की तो आजारी बाईला नॅशव्हीलच्या तुरुंगात घेऊन जाणार नाही. मिसेस कॅन्सी बरी होईपर्यंत, इथेच तिच्या बाळाबरोबर राहील. त्यासाठी एक आठवडा लागला तरी चालेल.

असे जाहीर केल्यावर, ऑफिसर त्याच्या गाडीतून बाहेर पडला आणि लोकांच्या दाट गर्दीतून जात दिसेनासा झाला.

प्रत्येकजण उपकृत झाला. ते पोगीओलीभोवती जमा झाले व त्याचे त्याच्या भाषणाबद्दल अभिनंदन करू लागले. जाड मनुष्य कोपर टेकत उठला. त्याने हाताने पोगीओलीला पकडले. माझ्याकडे पण चालत आला आणि आम्हाला त्याच्या हॉटेलात जेवायला चलण्याविषयी ओरडून सांगू लागला. पोगीओली म्हणाला की ते मोनार्च कॅफेमध्ये आताच जेवले आहेत.

“पण तुम्हाला सगळ्यांना भूक लागली असेल. चला, माझ्या बायकोने तुम्हाला बोलावण्यासाठी मला इथे पाठवले आहे. ती सगळ्या क्रांतीकारकांना आणि चौकात गाणाऱ्या त्यांच्या गायकांना, खाऊ घालणार आहे.”

गुन्हेगारशास्त्रज्ञाने परत सांगितले, की त्यांना भूक नाही. पण जाड मनुष्य त्याच्या जवळ आला व खालच्या आवाजात बोलला, “तुम्हाला भूक असो वा नसो, त्याने काही फरक पडत नाही. माझ्या बायकोला तुम्हाला व तुमच्या मित्राला काही झाले, तरी आमच्या हॉटेलात जेवायला बोलावले आहे.”

माझा मित्र बोलला, “ठीक आहे.”

“ठीक आहे, चला तर! तुम्हाला असे वाटते का, की चर्चमधील धर्मगुरुच्या हाताखालील माणूस, सॅम हेली कुणा माणसाला सार्वजनिक चौकात उभे राहून देईल?” आणि जिम कॅन्सीला त्रास दिल्याबद्दल त्याच्या नावाने शिव्या देत, व त्याला मारणाऱ्याला अटक न केल्याबद्दल अधिकाऱ्यांना दोष देत, ते सर्वजण निघाले.

माझ्या मित्राला धक्का बसला. का, मी तर कधीच सॅम हेलीविषयी ऐकले नाही. मला माहिती नाही, की हाच तो मनुष्य आहे. “मी तर फक्त तो कुठल्या प्रकारचा माणूस असेल, ते सांगत होतो --- “

“अरे भावा, जेव्हा तुम्ही शहरात जाता तेव्हा तुम्हाला अनेक प्रकारचे लोक दिसतात. सगळे दंतवैद्य सारखेच दिसतात. पण इथे टेनेसीमधील डोंगराळ भागात, एक प्रकारचा एकच माणूस असतो. जेव्हा तुम्ही माणसाच्या प्रकाराचे वर्णन केलेत, तेव्हा तुम्ही त्या माणसाचेच वर्णन केलेत. तुम्हाला मारले जाण्यापूर्वी, माझ्या हॉटेलमध्ये चला. आम्ही लॅनेसबर्गला उन्हाळ्यातील मुक्कामाचे ठिकाण बनवत आहोत आणि आम्हाला प्रवासी लोकांसाठी, ते खुनी ठिकाण म्हणून प्रसिद्ध व्हायला नको आहे.”

“म्हणजे हाच तो मनुष्य असल्याबद्दल, तुमची खात्री असल्याचे दिसते. तुम्ही सर्वजण त्याला ओळखता व तोदेखील तुम्हाला ओळखून आहे.”

“अगदी बरोबर.”

त्याच्या लक्षात आले की हॉटेल मालकाचा काय दृष्टीकोन असू शकतो आणि आम्हालाही लॅनेसबर्गचे नाव शांतता व मित्रत्वाबद्दल राखले जाण्यात रुची होती. आम्ही आमच्या यजमानाच्या मागून चौकापलीकडील हॉटेलात उदास होऊन, दुसरे जेवण करायला निघालो.

हॉटेलात खूप गर्दी उसळली होती आणि ते सगळे देवाने सॅम हेलीला खुनी म्हणून कसे उघडकीस आणले व त्या निरपराध बाईची अन्यायी शिक्षेपासून कशी सुटका केली, त्या विचित्र प्रकाराबद्दल बोलत होते. पोगीओलीने एकदा दोनदा सांगायचा प्रयत्न केला, की अजून ती बाई धोक्यातून बाहेर पडलेली नाही पण आमच्याभोवती बसलेल्या सर्व जेवणाऱ्यांना असे वाटत होते, की लवकरच ती खात्रीने त्या गुन्ह्यातून बाहेर पडणार.

हा सगळा प्रसंग न सोडवल्या गेलेल्या निरुत्साही शेवटाकडे येऊ बघत होता. शेवटी लोकांचे जेवण संपले व ते हॉटेलबाहेर पडू लागले. आम्ही काही माणसांना विचारले, की आम्ही आमच्या गाडीकडे जाणे सुरक्षित असेल का. ते म्हणाले, की त्यांना माहिती नाही. आम्हाला तसा प्रयत्न करून बघावे लागेल. पोगीओली व मी खूपसे स्त्रीपुरुष बाहेर पडेपर्यंत थांबलो व शेवटी, त्यांच्याबरोबरच बाहेर पडलो. आम्ही फूटपाथवर सुरक्षित असतांना, असलेल्या वर्तमानपत्राच्या कार्यालयाच्या मागील भागात बंदुकीचा लहानसा स्फोट झाला. ते ठिकाण हॉटेलपासून रस्ता ओलांडल्यावर लगेच होते. हे अगदीच अंदाज न केलेले नव्हते. शिवाय लोकांनी काही कारवाई करावी म्हणून, अशा प्रकारची घटना होणे, हे लॅनेसबर्गमध्ये नेहमी घडणारे होते. प्रत्यकाने दुसऱ्याच्या मागे उडी मारली व अशा तऱ्हेने साखळी करून, ते मागील इमारतींच्या दारांशी पोचले. यावेळी शेरीफ मॅथनने त्याचा प्रतिहल्ला सुरु केला. ते हॉटेलजवळील खाटीकाच्या दुकानापासून सुरु झाले.

कुठल्या ठिकाणापासून तो सुरु करायचा, हे त्याला कसे समजले, कुणास ठाऊक! मला कळत नव्हते की तो आम्हाला भक्ष्य म्हणून वापरणार होता, की काय! काही झाले तरी शेरीफच्या चौथ्या किंवा पाचव्या बंदुकीच्या बारने लढाई संपुष्टात आली. आमचा हल्लेखोर नैसर्गिकपणे सॅम हेली निघाला. जेव्हा गर्दीने त्याला ओळखले, तेव्हा तो मारला गेला. या मारामारीच्या प्रसंगी शेरीफच्या दंडाला लागले आणि मग सगळे समजून चुकले, की येणाऱ्या तीन महिन्यात तरी तो काही आता मिसेस कॅन्सीला तुरुंगात घेऊन जाऊ शकणार नाही. तिची खूप काळासाठी सुटका झाली.

आम्ही आमच्या गाडीत बसून लॅनेसबर्गच्या बाहेर पडल्यावर, आम्ही पाहीले की, गर्दी मिसेस कॉर्डी कॅन्सीचा फसवणुकीचा किरकोळ गुन्हा माफ करण्यासाठी गव्हर्नरकडे अर्ज करण्यासाठी, तयार झाली होती. त्या अर्जात मिसेस कॉर्डी कॅन्सीचा उदारपणा, तिच्या हृदयाची पवित्रता, चर्चसाठी तिने केलेले काम आणि तिचे शेजारधर्म पाळणारे इतर अनेक गुण यांचा उल्लेख केला गेला. गावातील वकीलाने एक नवीन कागद तयार केला व त्यात म्हटले, की बायको तिच्या नवऱ्याची सहीत फसवणूक करू शकत नाही. त्याने वाद घातला, की ती चोरी समजले जाणारे त्याचे नाव नवऱ्याकडून चोरू शकत नाही. तिने फक्त त्याच्या नावापुढे सही केली. तिने काही फसवणूक केली नाही. या अर्जावर दोनशे त्रेचाळीस लोकशाहीमधील मतदारांकडून सही केली गेली. टेनेसीचे सरकार लोकशाही सरकार होते.

एवढे झाल्यावर आम्ही लॅनेसबर्गच्या बाहेर पडलो ---

# The Keyboard Of Silence

# शांततेचा कीबोर्ड

## Clinton H. Stagg

## क्लिंटन स्टॅग



### एक

रिगलमधील प्रसिद्ध जेवणघरात साधासुधा मनुष्य नेहमी कोणाचे लक्ष वेधून घेऊ शकत नसे. पण पूर्वेकडील कमानीजवळ बसलेल्या पुरुष व स्त्रियांनी दारात उभ्या असलेल्या व शांतपणे त्यांच्याकडे बघणाऱ्या माणसाला न्याहाळण्यासाठी त्याचे डोळे उंचावले. कासवाच्या पाठीच्या कवचाच्या वाचनालयातील चष्म्याने व त्याच्या धुरकटलेल्या काचेने त्या माणसाचे डोळे दोन मोठे फिकट तपकिरी रंगांचे गोल दिसत होते. त्यामुळे त्याच्या चेहऱ्याचा गोरेपणा जास्त उठून दिसत होता.

नाजूकपणे भावनाशील नाकपुड्या असलेले त्याचे नाक सरळ आणि पातळ होते. आता महीरपीच्या आकाराचे झालेले, त्याचे मनापासून हसणारे ओठ असे भासवत होते, की ते अचानक नेहमीप्रमाणे सरळ होणार आहेत. त्या फिकट पण दुसऱ्यावर वर्चस्व गाजवू बघणाऱ्या चेहऱ्यावर व चिरेने दुभंगलेल्या नम्र हनुवटीवर ते शोभून दिसत नव्हते. मृदुमुलायम पांढरे केस भांगामुळे विभागले जाऊन, आतील गुलाबी कातडी दाखवत होते. रुंद खांदे व भरदार छातीवर एकही चुणीशिवाय असलेल्या जेवायच्या वेळेच्या काळया कोटावर ते उठून दिसत होते.

सहाव्या टेबलावरील मुलीचे डोळे दिपले जाऊन त्याच्यावर खिळले होते. तिच्याबरोबर असलेल्या मोठ्या बाईने तिचे सॅलड एकत्र करत, रीतसर चोरटे कटाक्ष त्याच्याकडे टाकले. चौकोनी हनुवटीच्या स्वच्छ दिसणाऱ्या तरुणाने न लाजता, उघडपणे त्याच्याकडे पाहीले. पण जेवणाऱ्या इतर माणसांप्रमाणे त्याचे डोळे उद्धटपणे प्रश्नार्थक नव्हते किंवा त्या मुलीप्रमाणे दिपलेलेही नव्हते.

मोठ्या बाईने सौम्यपणे नापसंती दाखवत म्हटले, "ऱ्होडा, तू निरखून बघते आहेस."

मुलीने सुस्कारा टाकत डोळे वळवले. ती पुटपुटली, "त्याच्या चेहऱ्यावरून तो किती नवलपूर्ण चारित्र्याचा वाटतो आहे!"

पोरकटपणे त्याचा चेहरा उजळवत, भलावण करत, ठामपणे तिच्याबरोबरील मनुष्य बोलला. "खरे आहे. त्याच्या चेहऱ्यावरून तो नवलपूर्ण चारित्र्याचा वाटतो आहे."

उत्सुक डोळयांनी श्वास रोधत, त्या दोघांनी विचारले, "तुम्ही त्याला ओळखता का?

“हो. तो गावातील क्लबचा सभासद असलेला संगीतकार, थॉर्नले कोल्टन आहे. माणसांना पडणारे प्रश्न सोडवणे त्याला आवडते. वरच्या गावातील अध्यक्ष, पार्कीन्स यांचा खुनी त्याने शोधून काढला व संकटकाळात माझे बर्कले ट्रस्ट मधील पद राखायला मदत केली.”

मोठ्या बाईने विचारले, “गुप्तहेर?” मुलीचे डोळे पुन्हा कोल्टनवर खिळले.

तो मनुष्य मान हलवत बोलला, “नाही. तो विनोदाने स्वतःला समस्या सोडवणारा म्हणतो व फक्त त्याला रुचीपूर्ण वाटणाऱ्या केसेसच घेतो. कारण त्या सोडवणे ही त्याची करमणूक असते. तो फी घेत नाही. त्याच्याबरोबरील माणूस सिडने थेम्स त्याचा सचिव असून, त्याचे नाव नदीप्रमाणे उच्चारले जाते. तो पण उल्लेखनीय रीत्या देखणा माणूस आहे. त्याचे काळे केस व डोळे आणि लाल गाल, हे कोल्टनपेक्षा खूप वेगळे असल्याने, तो कोल्टन बरोबर असतांना, फार ओळखला जात नाही.”

कोल्टनजवळ उभ्या असलेल्या, पंचविशीच्या तरुणाकडे पहिल्यांदाच बघत, मोठी बाई बोलली, “मला तर तो असल्याचेही जाणवले नाही. तिचे डोळे जेवणघरातील कोपरा न कोपरा धुंडाळत होते. मग तिला तिचे सल्लागार म्हणून असलेले कर्तव्य आठवले. ती म्हणाली, “ऱ्होडा, तू इतक्या उद्धटपणे कोल्टनकडे बघता कामा नयेस.”

तो मनुष्य शांतपणे बोलला, “मला वाटते, कोल्टनकडे निरखून पाहीले, तरी त्याला काही वाटणार नाही, कारण जरी बऱ्याच लोकांचा यावर विश्वास बसत नसला, तरी तो जन्मापासून पूर्णपणे आंधळा आहे.”

त्या दोघींनी श्वास रोधत, दुसऱ्याच्या वाईट नशीबाबद्दल आवाजात सहानुभूती दाखवत म्हटले, ”आंधळा!” मोठ्या बाईने काही कारण नसतांना दटावत म्हटले, “तो येतो आहे.” तिथे पायरी असल्याचे माफी मागत मुख्य वेटरने कोल्टनला सांगितले आणि सचिव त्याच्या कानात काही पुटपुटला. त्याच्या हातात बारीक काठी धरलेल्या कोल्टनने सिडने थेम्सच्या पुढे टेबलांच्या रांगेतून चालायला सुरवात केली. ती बाई व मुलगी तोंड विस्फारून, तो येतांना बघू लागल्या. तो घाईने त्यांच्याकडे येऊ लागल्यावर त्यांच्या डोळयात आईची काळजी उमटली. घाईघाईने चाललेल्या वेटरला टाळून, जाड व भरपूर कपडे घातलेल्या बाईची फूटभर बाहेर आलेली खुर्ची टाळत, तो चालला होता. त्या दोघींच्या टेबलाशी पोचल्यावर, त्यांनी त्याच्या पातळ ओठांवर मित्रत्वाचे हसू उमटलेले पाहिले.

तिच्या खुर्चीभोवती पाऊले टाकत, तिच्याबरोबर असलेल्या रक्षकवजा माणसाशी हातमिळवणी करतांना नवलपूर्ण, संगीतमय, दयाळू पण तरीही जोशपूर्ण आवाजात त्याने विचारले, “मिस्टर नॉरीस, कसे काय?” तेव्हा ती मुलगी मोहरून गेली. “आम्ही टेबल मिळण्याची वाट बघत उभे असतांना सिडनेने तुम्हाला बघितले.”

उत्तर देतांना नॉरीसने विचारले, “तुम्ही मिस रिचमॉन्डला भेटाल का?”

ताबडतोब कोल्टन त्याची लांबसडक बोटे असलेला गोरापान हात पुढे करून, मुलीकडे वळला.

तो माफी मागत बोलला, “आम्हा दृष्टिहीन लोकांसाठी एवढी सवलत असणे आवश्यक आहे."

त्यांनी हस्तांदोलन केले. मुलीला त्याच्या हाताच्या पकडीत उब जाणवली. वाऱ्याची झुळूक येऊन जावी, तशी काहीशी त्याची विचारप्रक्रिया समजल्याने तिच्या संवेदनशील मनगटाला उचंबळून आल्यासारखे वाटले.

ती काही सामान्य ओळी गुणगुणली व रागाने ओठ चावले, कारण त्या ओळी सामान्य होत्या. तिच्यापुढील माणूस अजून काही मागणी करत होता.

तो उत्साहाने बोलला, “मिस रिचमॉन्ड, तुमचे गाणे नवलपूर्ण आहे. सिडने व माझ्याकडे या आठवड्यातील वाद्यवृंदाच्या तीन रात्रीच्या कार्यक्रमाची तिकिटे आहेत. तुम्हाला माहिती आहे का, की सर्वसामान्य लोक वाखाणत नसले, तरी मला संगीत हे रंगवणे, वास्तुकला, शिल्पकला व इतर सुंदर गोष्टींचा मिलाफ वाटतो.”

मिस रिचमॉन्डचे डोळे त्यांच्याबद्दल दया दाखवत होते.

पण तिचे ओठ बोलले, “मिस्टर कोल्टन, माझी आई.” त्यांनी टेबलापलीकडून परत हस्तांदोलन केले. मिसेस रिचमॉन्ड न्यूयॉर्कचा कृत्रिमपणा नसलेला कनवाळूपणा दाखवत होती. त्याच्या काही शब्दांनी, तिच्या मलूल गालांवर आनंदाची चमक आली.

नॉरीसने नवल वाटून विचारले, “मिस्टर थेम्स निघून का गेले? त्याने असा काही पळ काढला, जसे काही आम्हाला प्लेग झाला आहे.”

कोल्टन हसत म्हणाला, “तो नेहमी असेच करतो. त्याला विचित्र अशी काही भीती असते. त्याबद्दल मी तुम्हाला कधीतरी सांगेन.”

“तुम्ही केव्हातरी बँकेत येऊन मला भेटत का नाही? माझ्या कबरीसारख्या ऑफिसात तुम्ही कित्येक महिन्यात आला नाहीत. आज दुपारी मिस रिचमॉन्ड व तिच्या आईने मला काही मिनिटे काम करतांना पाहीले. त्या म्हणतात, संगीत

नाटकात गाणाऱ्यांना आधी रियाजासाठी दिलेल्या खोल्या माझ्या ऑफिसशी तुलना करण्यास अगदी योग्य आहेत.”

ती मुलगी हसत बोलली, “त्याने महोगनीची तुलना आमच्या मोडकळीस आलेल्या भिंतींशी आणि खोकी पडलेल्या ड्रेसिंग टेबलांशी व वायरीने जोडलेल्या गॅसच्या ज्योतीशी केली, तर मी असे म्हटले पाहिजे!”

कोल्टनने हसत कबूल केले, “माणसे नेहमी सर्वात चांगले घेतात.” मग त्याने सरळसरळ नॉरीसला म्हटले, “अलीकडे सिम्पसनचा व्यवसाय कसा चालला आहे? “आठवडाभर तो बाहेर होता. आज दुपारी नुकतेच त्याने लग्न केले आहे, असे सांगून आम्हाला आश्चर्याचा धक्का दिला. बायकोबद्दल तो फार काही बोलला नाही. पण आता त्याच्या आयुष्याचे नवीन पान उलटले आहे.” कोल्टन शीळ घालत म्हणाला, “ही छान बातमी आहे. तो लग्न करेल, असे मला कधीच वाटले नव्हते.” टेबलापलीकडून मुलीकडे नाजूकशी विशिष्ट नजर टाकून, हसत नॉरीस बोलला, “आणखी कुणालाही नाही.”

“मला त्याच्याकडे आदराने बघून, त्याचे अभिनंदन केले पाहीजे. ठीक आहे. “पुन्हा भेटू.” असे म्हणत, प्रत्येकाचा निरोप घेत, जिथे सिडने थेम्स वेटरला त्याला कुठले पदार्थ हवे आहेत, ते सांगत होता त्या लांबच्या कोपऱ्यातील टेबलाशेजारून, त्याच्या काठीने खुर्चीच्या पायाला स्पर्श करत, कोल्टन घाईघाईने निघाला. मित्रत्वाने मान हलवणाऱ्या कोल्टनकडे हसून बघत, हातातील पदार्थांची यादी लिहायचे पुस्तक मिटवत, वेटर घाईने निघून गेला. थॉर्नेलेने त्याच्या केसमधून सिगरेट काढली. काडी ओढली आणि खुर्चीत मागे टेकून आरामशीर बसला.

“सिडने, कधीतरी तुझी सुंदर स्त्रियांबद्दलची भयंकर भीती मला फार

लाजीरवाण्या परिस्थितीत टाकणार आहे.” हे तो अर्धे गंभीरपणे व अर्धे हसत बोलला. “सतरा पायऱ्यांऐवजी ते साडेसोळा पायऱ्यांचे असते. त्याच्या पेल्यावर उदासीनतेने बोटाने टिचक्या मारायच्या नॉरीसच्या सवयीबद्दल ते नसते, तर माझा उगारलेल्या हाताने त्याची मान आवळली असती.”

“मला वाटते, मी ते बरोबर ओळखले आहे.” त्याच्या आवाजात कळकळीचा पश्चात्ताप व उदासीन काळ्या डोळ्यात चुकीबद्दलचे दुःख दिसत होते.

कोल्टनने संपवले, “ते विसरले गेले.” मग “पण तू थांबायला हवे होतेस, सिडने. मिस रिचमॉन्डचे व्यक्तिमत्व तिच्या गाण्यासारखेच उल्लेखनीय आहे आणि तिची आई इतकी अभिमानी आहे, की ती सर्वसामान्य आणि राजबिंडा माणूस यांच्यातील फरक, ससाणा आणि गरुड यांच्यातील फरकाप्रमाणे विसरली आहे. ती त्याच्यावर प्रेम करते, म्हणून नॉरीस नशीबवान आहे --- आणि तो ---” ”हसणाऱ्या ओठांना वाक्य पुरे करणाऱ्या शब्दांची गरज नव्हती.

थेम्सने बचाव करत म्हटले, “पण तिने आधीच, तिच्या व्यवसायिक कारकीर्दीच्या सुरवातीलाच, दर आठवड्याला दोनशे डॉलर्सची मागणी केली आहे आणि नॉरीस तर वर्षाला पाच हजार डॉलर्सपेक्षा जास्त कमावू शकत नाही.”

कोल्टन हसत बोलला, “बिचारा मुलगा! तुम्हाला बायका कधीच कळणार नाहीत. सुंदर बाई दिसली, की घाबरट शेळीप्रमाणे तू लांब पळतोस. तुझे परिणामकारक हृदय फक्त रक्त वाहण्याच्याच कामाचे आहे.”

अवर्णनीय अशा कटु आवाजात तो बोलला, “थॉर्न, मला माझ्यातील कमकुवतपणा माहिती नाही का? मी जरी चांगल्या बायकांच्या समाजासाठी तळमळत असलो, तरी मला त्यांच्यापासून लांब रहावेच लागते. त्यासाठी

एखाद्याला निराशादायकपणे, निरुपाय म्हणून प्रेमात पडावे लागेल. मी लाज वाटणारी वस्तू आहे, हे मी विसरलोच होतो. मी नदीकाठी सापडणारा उनाड मुलगा आहे व त्यामुळेच मला ते नाव मिळाल्याचे मला माहिती आहे.”

क्षणार्धात कोल्टन गंभीर झाला. खूप वेळ विचार करून तो बोलला, “भुकेसाठी उपाशी रहाणे हा विशेष उपाय असू शकतो. पण आपण याबद्दल खूप वेळा वाद घातलेला आहे.” त्या पातळ, भावना व्यक्त करणाऱ्या ओठांनी वाक्य संपवले.

मग थेम्ससाठी क्लब सँडविच घेऊन वेटर आला आणि कोल्टनचे नेहमीचे नाटक बघून आल्यानंतरचे जेवण तयार होते. ते त्याला वेटरला कधी सांगावे लागत नसे. गाईचा खूपसा लाल रक्ताळ रस लावलेल्या ग्रॅहम पावाचे दोन तुकडे आणि पाणी. कोल्टनच्या बारीक, पोकळ व पिसासारख्या हलक्या छडीच्या जराशा स्पर्शाने त्याच्या ग्रहणशील बोटांना सूचना मिळे, ती छडी त्याने खातांना दोन पायांच्या मध्ये ठेवली होती.

सिडने थेम्स त्याचे सँडविच रिकाम्या मनाने खात होता. त्याचे डोळे जेवणघरात फिरत होते. भडक कपडे केलेल्या एका श्रीमंत विधवेवर, फार रंगरंगोटी केलेल्या एका बाईवर व तिच्या टेबलावरील बैलाच्या मानेच्या माणसाकडे ते स्थिर झाले होते. आता ती रिकाम्या पेल्यातील चेरीत टोकदार काटा खुपसणाऱ्या गोल डोळयांच्या मुलीकडे व शेवटी नेहमी ऱ्होडा रिचमॉन्डच्या ताज्या सुंदर चेहऱ्यावर येऊन स्थिर होत होती. मग सुंदर चेहऱ्यावरील मलूल डोळे प्रकाशित झाले. ते खूप भावनाशील स्वभाव असलेल्या सिडने थेम्सला वाईनपेक्षा जास्त नशा असलेले व जास्त धोकादायक असे वाटले. जेव्हा दुसऱ्याच्या डोळयांनी जेवणघराची फेरी परत एकदा सुरु केली, तेव्हा कोल्टनने त्याची ताटली बाजूला केली.

“देवाने दिलेला भडकपणा, त्याच्या डोळ्यातील चमक व त्यांना पडलेल्या सुरकुत्या भरून काढत होत्या.”

नॉरीसच्या टेबलावरील ते शब्द ऐकल्यापासून, थॉर्नले कोल्टनची मनस्थिती चौकसपणे गंभीर झाली होती. तो शांतपणे पुटपुटला, “उदासी उमलवणाऱ्या खऱ्याखुऱ्या सौदर्याची प्रचिती घेण्यासाठी, एखाद्याने न्यूयॉर्कच्या रेस्टॉरंटमध्ये यायला पाहिजे.”

थेम्सने काही उत्तर दिले नाही. कारण त्याची गरज नव्हती. त्याचे भटकणारे डोळे त्याच्या डावीकडील टेबलावर स्थिर झाले होते.

कोल्टनने त्याच कलेच्या देवतेच्या नशेमध्ये, खालच्या आवाजात चालू ठेवले, “उदाहरणार्थ, डावीकडून दोन टेबले पलीकडे असलेल्या, घट्ट जांभळा गाऊन घातलेल्या, बळकट बाईला कडक पेय प्याल्यामुळे त्रास सहन करावा लागेल. कोल्टनकडे बघण्यासाठी सिडनेने त्याचे डोळे वळवले. पंचवीस वर्षांपूर्वी थेम्सच्या तीरावर बाळाच्या कपड्यांचे गाठोडे समजून एका माणसाने त्याला उचलले होते, तेव्हापासून तो असे करत असे. अशा प्रकारचे त्याचे निरीक्षण होते. असे अनेक किस्से त्याने ऐकले होते. पण त्यामुळे त्याला धक्का बसण्याचे त्याने कधीच सोडले नाही.

“मला नवल वाटते, की तुला कसे समजले, की मी काय करतो आहे किंवा तिने जांभळा ड्रेस घातला आहे?”

तो उत्तर मागत होता.

कोल्टन शांतपणे हसत म्हणाला, “असे गुपित समजून घेण्यासाठी दोन्ही पाय जमिनीवर घट्ट ठेवावे लागतात. तू विसरतोस की एकावर एक फुलीसारखे

ठेवलेले गुडघे प्रत्येक वेळी माझ्या काठीला तू तुझे डोके थोडेसे वळवल्याचे सांगतात. बघ, तू ज्या बाईला भेटायला घाबरतोस, तिच्याकडे तू चोरून बघत असल्याचे मला दाखवतांना, माझी बोटे माझ्या काठीवर नाहीत.''

पाय एकावर एक फुलीसारखे न ठेवायचा प्रयत्न करत व नकळत पहिल्यांदा केलेल्या पायांच्या हालचालीवर कोल्टनने केलेले स्मित बघत, सिडनेने विचारले, ''पण जांभळा ड्रेस?

कोल्टनने जोरात जाहीर केले, ''दम लागत श्वासोच्छवास करणाऱ्या सर्व बळकट बायका जांभळा ड्रेस घालतात. हा बायकांच्या बाबतीतील अलिखित नियम आहे. आणि ज्याचे कान दुप्पट ग्रहणशक्ती असलेले आहेत व त्यायोगे ऐकायची सवय आहे, त्यांच्यासाठी वास घेणे सोपे आहे. तुला दिसेल, की पुढील टेबलावर डाव्या बाजूला कोणी नाही. आता तू तुझे उघडपणे मिस रिचमॉन्डकडे बघणे चालू ठेव. त्याने त्याच्यासमोर दोन्ही हात टेबलाच्या पांढऱ्या आच्छादनावर ठेवले --- ''मी बघणार नाही.''

मुख्य वेटर टेबलाशी थांबला. ''मिस्टर कोल्टन, मिस्टर सिम्पसन यांना त्यांच्या बायकोशी तुमची ओळख करून द्यायची आहे. म्हणून ते तुम्हाला त्यांच्या टेबलावर बोलावत आहेत.''

''त्यांची बायको?'' थेम्स झटपट बोलला

हो, सर.'' हे ठामपणे म्हटले गेले. त्याला विरोध न करता कोल्टनने विचारले, ''मिस्टर सिम्पसन कुठे आहेत? आम्ही त्यांना बघितले नाही.''

वेटर बोलला, ''पामची झाडे आहेत, तिथे पूर्व बाजूला.''

''आपण लगेच त्याच्याकडे जाऊ.''

“मी त्यांना सांगतो.” मनापासून त्यांची सेवा करणाऱ्या वेटरने हाताच्या बोटाने निर्देश केला.

सिडने थेम्स रागाने म्हणाला, “त्याच्या ओळखीच्या फालतू नट्यांपैकी कुणीतरी त्याला शेवटी गुंडाळले. बर्कले ट्रस्ट या पारंपारिक कंपनीचा पहिला उपाध्यक्ष असणाऱा असा तो सुंदर नमुना आहे.”

कोल्टनने वेटरला दोन डॉलरची नोट देत शांतपणे म्हटले, “तू चुकीचे बोलत असल्याचे तुला मी पैजेवर सांगेन. गेली दोन वर्षे ज्या बाईसाठी तो रात्रीचे वाइन असलेले जेवण मागवतो आहे, ती पामच्या इथे नाही व वेटरही त्याने लग्न केलेले असल्याचे सांगायला फार उत्सुक नाही.”

थेम्सने बचाव करत म्हटले, “मी जात नाही आहे.”

कोल्टनने त्याची काठी बोटात धरत, उठायच्या तयारीने हसत विचारले, “सिडने, एका विवाहित स्त्रीने तुला पळवण्याची भीती तर वाटत नाही ना?”

“काय?”

पूर्वेच्या बाजूला शिरण्याच्या ठिकाणी जाण्यासाठी त्याची खुर्ची अर्धी वळवून, सिडनेने त्याच्याकडे तोंड केले. तो घाईने बघत पटकन बोलला, “मी जातो आहे.” व कोल्टन बरोबर उठला.

मला दिसत नाही. सदतीस सरळ, अठरा डावीकडे व नऊ उजवीकडे. आपण पूर्वेच्या दाराशी थांबू.”

कोल्टनने सौम्यपणे चौकशी केली, “इथे सुंदर बायका नसल्याने, इतकी वर्षे तू हासील केलेल्या सुंदर बायकांपासून दूर रहाण्याच्या तुझ्या कसबाला काही धक्का लागणार नाही, नाही का?”

उत्तर न देता, थेम्स वळून धाऊ लागला आणि टेबलांमधून भरभर रस्ता काढत, पूर्वेकडे गेला.

कोल्टन शांतपणे हसला. त्याचे सुटे पैसे उचलून, घाईने चालू पडला. जरी तो वेगळा विचार करत असला, तरी त्याचा प्रशिक्षित मेंदू आपोआप पायऱ्या मोजू लागला. गेल्या दोन वर्षात, कुणालाही हेवा वाटेल अशी कीर्ती मिळवलेल्या सिम्पसनचा तो विचार करत होता. तो मनुष्यस्वभावाचा अभ्यासक असल्याने, त्याला नेहमीच सिम्पसनमध्ये रुची वाटत असे. ते पहिल्यांदा भेटले, तेव्हा कोल्टनच्या चुकीच्या नसणाऱ्या उर्मीने त्याला बरोबर काय ते सांगितले. गावामधील बँकेत पहिला उपाध्यक्ष म्हणून, सिम्पसनने जितका वेळ आळसात घालवता येईल, तितका घालवला आणि बायकांवर पैसा खर्च केला. समस्या सोडवणाऱ्या कोल्टनने त्याच्याकडून वेगळी अपेक्षा केली होती.

थेम्सच्या कमानीखाली आळशीपणे पामच्या सावलीतील टेबलांवरील लोकांच्या गर्दीचे निरीक्षण करत, कोल्टन क्षणभर थांबला.

"डावीकडे दोन. सरळ साडे एकोणीस" थेम्सने बाजूला होत, मार्गदर्शन केले.

गालांवर नीलांच्या निळ्या पुसट रेषा असलेला जाड माणूस त्यांना भेटायला उठला व हृदय जड झालेल्या आवाजात बोलला, "तुम्हाला भेटून आनंद वाटला. मला तुम्हाला भेटायचे होते. पण आज रात्रीच मला ते शक्य होईल, इतका मी नशीबवान असेन, असे वाटले नव्हते. मी ज्या गतीने चाललो होतो, ती तुम्हाला माहिती आहे. जुन्या गावात लग्न करण्यासाठी, मी गेलो, तेव्हा तेथील एका मुलीला तुम्हाला मला भेटवायचे आहे. अगदी लहानपणापासून, आमची मैत्री आहे. चांगली बाई म्हणजे काय, हे सांगण्यासाठी मी इतक्या मागे गेलो, याबद्दल देवाचे आभार! यापुढे तुम्ही आम्हाला आमच्या घरी भेटाल. एक मिनिट थांबा --- "त्याचा आवाज

अगदी मनातल्या मनात कुजबुजल्यासारखा झाला, “मिस्टर कोल्टन, माझी बायको बहिरी व मुकी आहे.”

थेम्सने चौकस भावनेने ऐकले होते, पाहिले होते. पोरकट चेहरा असलेल्या छोट्याश्या बाईच्या घट्ट बसलेल्या टोपीखालून, तिच्या तपकिरी रंगाच्या कुरळ्या बटा डोकावत होत्या आणि त्यामुळे तिच्या बारीक, शांत आकृतीला उठाव येत होता. ती त्यांच्याकडे प्रश्नार्थकपणे बघून स्मितहास्य करत होती. मुलगी लहानशी होती. पण त्याने पाहीले, की तिचा चेहरा पावडरने व लालीने थापलेला होता, जसे काही त्याचा उपयोग तिला शिकवला गेला नव्हता व अंमलातही आणला गेला नव्हता. त्याने शेवटचे स्पष्टीकरण देणारे शब्द बोलेपर्यंत, कोल्टन अर्धवट दयनीय असे डोळे घेऊन मागे उभा होता. कारण त्याला बायकांबरोबरची सिम्पसनची ख्याती पण माहिती होती. शांतपणे बोललेल्या वाक्यांबरोबर, त्याच्या भावनांमध्ये झटपट बदल झाला. अती भावनाशील व चंचल असलेला माणूस, साध्या खेडवळ मुलीशी लग्न करण्यासाठी वाइन पिणाऱ्या बाईपासून दूर गेलेला असू शकेल, यावर त्याचा विश्वास बसत नव्हता.

सिम्पसनची बोटे भरभर फिरत होती. तो थॉर्नले कोल्टनपुढे वाकला. मुलगी हसली आणि तिचा हात बाहेर काढला.

तिच्या शर्टाच्या मोठ्या हाताची झगमगती लेस मनगटापासून लांब फेकली गेली. क्षणभर त्यांनी हात मिळवले. मग मुलीची बोटे परत काम करू लागली.

सिम्पसन हसला. “मिस्टर कोल्टन, तू आंधळा आहेस, यावर तिचा विश्वास नाही. ती म्हणते, की तुला सर्वांसारखेच डोळे आहेत.”

थॉर्नले कोल्टन हसला. “तू तिला सांग, की मोठी भिंग असलेला धुरकट काचांचा चष्मा वापरून माझे डोके दुखवणाऱ्या प्रकाशापासून होणारा त्रास मी कमी केला पाहिजे.”

पण ते तिला पटवून देणे अवघड आहे.” वेटरने ओढलेल्या खुर्चीवर बसायला त्याने नकार दिला.

थोडे झुकल्यासारखे दाखवून व नेहमीच्या निरर्थक शब्दांनी त्याने सिडने थेम्सने करून दिलेली त्याची ओळख दाखवून दिली. तिच्या पापण्या खाली झुकवण्यापूर्वी मुलीने त्याच्याकडे एक झटपट नजर टाकली होती तेव्हा त्याचे डोळे एखाद्या स्त्रीसारखे कोवळे आणि मऊ होते. बाईचा चेहरा बघून, त्याला धक्का बसवल्याशिवाय राहिला नाही.

सिम्पसन बोलला, “तुम्ही बसणार नाही का? मला अशा उच्चभ्रू ठिकाणी बघायची तुमची बहुधा शेवटचीच वेळ असेल. माझ्यासारखा मूर्ख माणूस त्याच्या स्वतःच्या टोकाच्या शक्तीची व शेकोटीशेजारील जागेची भलावण करू शकतो, पण एका मोठ्या रेस्टॉरंटला भेट देण्याइतका मी उद्दीपित झालो आहे. जे ओळखायला मला बरीच वर्षे लागली, ती दिखाऊ कृत्रिमता दहा मिनिटात कोल्टनने भावनाशीलतेने ओळखली आहे.” त्याने म्ह्टल्याप्रमाणे न लाजता, उघडपणे तिचा हात हातात घेतला.

थॉर्नले कोल्टनने त्याचे डोके हलवले व बोलला, “माझी घरी जाण्याची वेळ उलटून गेली आणि तुला माझ्या सवयी माहिती आहेत. सव्वा वाजता पेलाभर सेलेस्टीन, पंधरा मिनिटे पियानोवर मूनलाईट सोनाटा धून आणि मग झोपणे. “मिसेस सिम्पसन, जर मी घरी तुमची भेट घेतली तर? त्याचा पुढे आलेला हात मुलीच्या हातात आला. “ओहो, तुम्ही हलणारे ओठ वाचता? आम्हासारख्या कधीच तसे

डोळे नसलेल्यांसाठी नवलपूर्ण गोष्ट!" त्याच्या ओठांनी आनंदी हास्य केले. तो थेम्सकडे वळला. त्याने विचारले, "सिडने, तोच का?"

सचिवाचे डोळे पॅसेजशेजारील जागेकडे वळले. "नऊ पायऱ्या उंच असलेला माणूस सहजतेने हावभाव करतो आहे."

कोल्टनची बारीक काठी खुर्चीच्या पायाला लागली. तो वाकला व दूर निघून गेला. पाठोपाठ सिम्पसनने शुभरात्र म्हटले. आलो त्याच रस्त्याने परत जाण्यासाठी थॉर्नले कोल्टनला कधी काही मदत लागत नसे. त्याच्या मनात पायऱ्यांचा वा अंतराचा हिशेब तयार असे. त्यामुळे, परतीच्या वाटेवर, तो कधीच डगमगत नसे वा चुकतही नसे. अक्षम्य आक्रमक हावभाव करून, गुन्हा लपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या व मोठा आवाज असलेल्या दारूबाज माणसाचा हलणारा हात चुकवण्यासाठी, तो बाजूला झाला आणि मुख्य जेवणघरातील कमानीपाशी थेम्ससाठी उभा राहीला.

त्याने विचारले, "मॉरीस अजून टेबलाशी बसलेला आहे का?"

"ते रिकामे आहे."

कोल्टनने उंच कपाळाला आठ्या घालत नापसंती दर्शवली. बारीक काठीने त्याने पायावर आपटले. टेबलांच्या दारातून प्रवेशद्वाराकडे जात, शेवटी तो उद्गारला, "उद्या भरपूर वेळ आहे."

त्यांना त्यांचे मोठे कोट व टोप्या मिळाल्या. उत्तर प्रवेशद्वारापाशी दर पहाटे एक वाजता उभ्या रहाणाऱ्या, त्यांच्यासाठी थांबलेल्या लांब, काळया गाडीत बसण्यासाठी, त्यांनी त्यांचे मोठे हॉटेल सोडले.

शांतता संपण्यापूर्वी, थॉर्नले कोल्टनचा जन्म जिथे झाला, त्या मोठ्या,

जुन्या पद्धतीच्या, तपकिरी रंगाच्या दगडांनी बनलेल्या घरी जाण्यासाठी ते निघाले. मग सिडने थेम्स सावकाश बोलला,

"अशा बाईवर जो प्रेम करतो, तिची काळजी घेतो व रक्षण करतो, त्या माणसात खूपच सुप्त चांगुलपणा भरलेला असणार."

"म्हणजे तुला मिस रिचमॉन्ड म्हणायचे आहे का?" कोल्टनच्या ओठांवरील विचित्र हसू काळोखाने लपवले.

"नाही." हे अस्पष्ट होते. "मॉरीस मिस रिचमॉन्डबरोबर लग्न करणार आहे, कारण ती सुंदर आहे, हुशार आहे व उत्तम सामाजिक जाण असलेली आहे. माणसाने तिला मिळवून तिचे प्रदर्शन करण्यापूर्वी. त्याचा गर्व चेचला गेला असेल. मला असे म्हणायचे आहे, की देवाने अपंग बनवलेल्या गावठी मुलीला सिम्पसनने निवडले, कारण त्याचे तिच्यावर प्रेम होते. याला काही अर्थ आहे."

त्याच्या खांद्यावर आपली नाजूक बोटे ठेवत, कोल्टन म्हणाला, "सिडने, पण तुला असे वाटत नाही का, की तिने जरा जास्तच मेकप केला होता?" त्याच्या शब्दांना थोडा चेष्टेचा वास येत होता.

त्याला असे वाटले, की कोणीतरी त्याची कोंडी करून त्याला त्रास द्यायला बघते आहे. सिडने ओरडला, "अरे देवा, थॉर्न! कधीकधी मला तू आंधळा असल्याचे नवल वाटते."

शांतपणे गंभीर आवाजात कोल्टन बोलला, 'सिडने, आंधळ्याला देव बोटे देतो. अंधारात माझ्या पियानोचा कीबोर्ड मला मृत माणसांची गुपिते सांगतो. एखाद्या भव्य रेस्टॉरंटमधील प्रकाशात, शांततेचा कीबोर्ड मला जिवंत हृदयांची गुपिते सांगतो. आणि तो खोटे बोलू शकत नाही."

थेम्सने उत्सुकतेने व दडपणाखाली प्रश्न विचारला, “म्हणजे तुला काय म्हणायचे आहे? मी काय गमावले आहे?” कारण त्याला या माणसाची मनस्थिती माहीती होती व तो त्याला वडिलांच्या ठिकाणी होता. जरी सर्व पाचही ज्ञानेंद्रीये असणाऱ्या त्याला काही दिसले नाही, कसलाही संशय आला नाही, तरी न दिसणाऱ्या माणसाला काही अपशकुनाचा इशारा मिळाला.

कोल्टनने त्याचे खड्यासारखे चकाकणारे घड्याळ खिशातून बाहेर काढले व त्याला बोटाच्या टोकाने स्पर्श केला.

“दीड वाजला. आपल्याला पंधरा मिनिटे उशीर झाला आहे.”

त्याचे घर जवळ आल्यावर त्याने दाराच्या कडीवर हात ठेवला. ते रुंद तपकिरी दगडी पायऱ्या उतरत नाहीत, तोच त्याने प्रश्नाचे उत्तर दिले.

तो शांतपणे बोलला, “सिडने, गुन्हा.”

## दोन

जेव्हा लाल गुलाम आला नाही, तेव्हा कोल्टन वाईट हेतूने हसला. पण पत्त्यातील इस्पिक राजाने मिस्टर कॅनफिल्ड या प्रसिद्ध खेळातील वरची ओळ पटकावली, तेव्हा त्याच्या भावनाशील बोटांतून तो पडला आणि हसला. लाल गुलामानंतर लगेच डावाची बरोबरी झाली. मग वाचनालयाच्या दाराकडे समस्या असलेले लोक बघू लागले.

तो हसला, “काय श्रीम्प्स?”

“ते तुम्हाला हवे असलेले थिएटरशी संबधित कागदपत्र यात आहेत.” पुढील पानांवर नाटकातील प्रसिद्ध नटनट्यांचे मोठे फोटो असलेला मासिकांचा व

वर्तमानपत्रांचा गठ्ठा हातात घेऊन, लाल डोक्याचा, सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्याचा व थोडे वाकडे नाक असलेला मुलगा पुढे आला. तो टेबलाशी पोचता पोचता, थोडा थांबला. त्याचे डोळे उद्दीपित होऊन फडफडत होते “मिस्टर कोल्टन, "फसवणूक! तुम्हाला कळते आहे का, तिथे फसवणूक आहे. पण ती आता नाही. चार बदाम आणि पाच इस्पिक, आता थांबू नका.”

कोल्टन हसला. “ठीक आहे, श्रीम्प्स. तुला माझ्यासाठी काही गुन्ह्याचे अन्वेषण करायचे काम करायचे आहे का?”

त्याचे डोळे उत्सुकतेने नाचू लागले, “करू का? पण मी शिकतो आहे, नाही का? जेवणघरातील पहिली खुर्ची स्वयंपाकघरापासून एकोणीस पाऊलांवर आहे. सहा --- “

कोल्टनने घाईने सहमती दर्शवत म्हटले, “मला माहिती आहे. पण तू ती कागदपत्रे घेऊन तुझ्या खोलीत जा आणि प्रहसन व नृत्यनाट्यात काम करणाऱ्या, तुला माहिती असलेल्या सर्व नटांची नावे लिही. तुला शक्य असेल, तर तू गेल्या दोन महिन्यात मंच सोडलेले लोक कुठे व का गेले, ते लिही.”

मुलाचा चेहरा निराश दिसू लागला. तो ओरडला, “फसवणूक! निक कार्टरला असे कधीच करायला लागणार नाही.”

थॉर्नले कोल्टन हसत बोलला, “किंवा त्याला आंधळ्या माणसासाठी पाऊलेही मोजावी लागणार नाहीत. तू हे कर आणि मग तुझ्यासाठी बहुधा गुप्तहेराचे खरे काम असेल --- वेषांतर केलेल्यांना ओळखून काढणे इत्यादी.”

उत्तर मिळाले नाही. मुलाने कागदपत्र हातात घट्ट धरले व खोलीच्या बाहेर पडला.

सिडने पत्त्यांच्या डावाकडे बघत, हसत आत शिरला तेव्हा चार बदाम व पाच इस्पिक टाकले गेले होते.

“माझ्या अंगावरून आग लागल्यासारखा फी चालत गेला, “त्याचे काय बिघडले आहे?”

थेम्स नेहमी श्रीम्पला फी म्हणत असे, कारण त्याचे डोके लाल होते व चेहरा सुरकुतलेला होता. एका विशिष्ट गोंधळवून टाकणाऱ्या केसमध्ये खुन्याला पकडतांना श्रीम्पने कोल्टन व दुष्ट काळा जॅक यांच्यामध्ये उडी मारली होती. त्यामुळे त्याच्या नाकाला जखम झाली होती. तेव्हा कोल्टनला झालेल्या विजयाच्या आनंदावर मळभ आले होते. तेव्हापासून श्रीम्प कोल्टनच्या घराचा एक भाग होऊन राहिला होता. त्या केसमध्ये श्रीम्प हा त्याची केसची फी ठरला. त्या मुलाच्या आईचा खून झाला होता व तो वडिलांनी केला होता, त्यामुळे त्याची काळजी घ्यायला कोणी नव्हते.

कोल्टनला त्याच्या हसण्याचे स्प्टीकरण देण्याची संधी मिळण्यापूर्वी, टेबलावरील फोन खणखणू लागला. फोनवरील पहीले शब्द ऐकून, त्याचे पातळ ओठ आवळून सरळ झाले, आवाज पिस्तुलासारखा कुरकुरीत झाला. त्याच्या चेहऱ्याच्या फिकट त्वचेखालील कातडी ताणली गेली.

समस्या सोडवणाऱ्याला समस्या मिळाली.

“कधी? काल रात्री. ठीक आहे. अजूनही त्या दोन वायरींच्या चोराचे संधान सुरक्षित आहे का? अजून पुढचे काही सांगितले नाहीत, तरी चालेल. आम्ही लगेच येतो.”

त्याच्या घंटीचे बटण त्याने दाबले. रात्रंदिवस केव्हाही लगेच चालणारी

त्याची मोटार आणण्याची ती खूण होती.

त्याने जोरात हुकुम केला, “सिडने, तुझी टोपी आणि कोट काढ. आपण बर्कले ट्रस्ट कंपनीत जात आहोत. कुठेही विकले जातील, असे अर्धा लाख किमतीचे रोखे चोरले गेले आहेत!”

थेम्स आश्चर्यचकित होत बोलला, “अर्धा लाख?”

कोल्टनने त्याला नेहमी लागणारी त्याची खासगी फोनची डायरी पकडत म्हटले, “असे ते म्हणाले. मी अजून काही ऐकायला थांबलो नाही.” त्याने नावे व क्रमांक कडक पेन्सिलीने लिहिलेल्या पातळ पानांमधून, त्याची बोटे फिरवायला सुरवात केली. सिडने घाईने आला, तेव्हा त्याने थोडक्यात व गर्विष्ठपणे फोन क्रमांक दिलेला ऐकला. कोल्टनने गाडीत बसण्यापूर्वी पाच मिनिटे हे झाले.

नीट चालणाऱ्या गाडीच्या चक्राजवळील मशीनच्या लाकडी चेहऱ्याच्या आयरीश चालकाकडे बघत, सिडने थेम्सने कोल्टनला प्रश्न केला.

“तू काल रात्री म्हणालास?”

कोल्टन बोलला, “हो. दुसरा अंक माझ्या अपेक्षेपेक्षा लवकर सुरु झाला. मी त्या माणसाला कमी समजलो.” फिकट चेहऱ्याने त्याने कुणाचे तरी वाईट चिंतिले.

बर्कले ट्रस्ट कंपनीतील गढूळ शोकाकुल वातावरण आत शिरल्याबरोबर जाणवत होते. तिसऱ्या सचिवाच्या कार्यालयात, तेथील पांढऱ्या केसांचा अध्यक्ष त्याचे उदास काम संपवून, थरथरत काही स्वागतपर शब्द पुटपुटला. पहीला उपाध्यक्ष सिम्पसनचा थंड चेहरा बदलून, स्वागतपर झाला. नॉरीसने हातात लपवलेले त्याचे डोके उचलले व तो आनंदाने काही सांगत पुढे आला.

त्याच्यापासून पाऊलभर अंतरावर उभा असलेला लाल चेहऱ्याचा माणूस त्याला हात लांब करून, स्पर्श करू शकण्याइतका नेहमीच जवळ होता.

"अरे देवा, मिस्टर कोल्टन, त्यांना मी अपराधी वाटतो आहे.!" मॉरीसच्या आवाजात अनुच्चारित वेदना होती.

त्याच्या जड पापण्यांचे डोळे अर्धवट मिटत सिम्पसनने फटकारले, "काहीतरीच! मिस्टर कोल्टन लवकरच या गुप्तहेराला सरळ करतील."

समस्या असणाऱ्याने मान हलवत, काही विरोध न करता मान्य केले आणि पुढे केलेला हात नॉरीसच्या हातात दिला. तो दयाळुपणे म्हणाला, "मला चांगले माहिती आहे." लाल तोंडाच्या माणसाने गुरगुरत आवाज काढला आणि ताबडतोब कोल्टनने त्याच्यासमोर जाण्यासाठी तोंड वळवून उडी मारली.

त्याने सौम्यपणे विचारले, "तर जॅमिसन, तू ते आधीच निपटले आहेस?"

लाल चेहऱ्याचा मध्यवर्ती कार्यालयाचा माणूस विशिष्ट तऱ्हेने बोलला, "कुणीच त्याला दोषी ठरवले नाही. मी फक्त त्याला प्रश्न विचारत होतो, एवढेच."

कोल्टनने फटकारले, "आणि प्रत्येक प्रश्नाबरोबर त्याला शिव्या घालत होतास! गुन्हा शोधायच्या तुझ्या पद्धती तुझ्या इतर वागण्याप्रमाणेच बुद्धिमान नाहीत. जुन्या मलबेरी रस्त्याच्या प्रतीकाच्या स्वरूपातील गणिती नियमाप्रमाणेच प्रत्येक गुन्ह्याचा छडा लावला पाहीजे. आधुनिक केंद्रीय रस्त्यावरील इमारतीप्रमाणे तो बदलत नाही."

नकली हसू हसत, जॅमिसन बोलला, "आपल्याला सगळी माहिती काहीतरी माहिती होईपर्यंत, आपण ती माहिती दुसऱ्याला देऊ शकत नाही!"

समस्या असणाऱ्याने ओठांनी हसत, पण आवाजातील स्वरात हास्य न आणत म्हटले, 'खरे आहे." त्याच्या गालांवर फिकट कातडीखालून, झटपट दोन ठिकाणी चमक आली. "अध्यक्ष मॉन्टरोझ, तुम्हाला काय वाटते?" पांढऱ्या केसांच्या अध्यक्षाने पुन्हा त्याचा वेग कमी केला व त्याची छोटी दाढी कुरवाळली. गेल्या पन्नास वर्षातील बर्कले ट्रस्ट कंपनीत सजवण्यासाठी असलेल्या धातूच्या सपाट जागेच्या पहील्या डागावर --- "

कोल्टन अधीरतेने मध्येच बोलला. "मला ते सगळे माहिती आहे. काय झाले? रक्षण करणाऱ्या कंपनीच्या माणसांऐवजी इथे पोलीस का आहेत?"

अध्यक्ष सुस्कारा टाकत म्हणाले, "ते फार उद्दीपित करणारे होते. मला वाटते, गेल्या पन्नास वर्षात असे पहील्यांदाच झाले."

सिम्पसनचे ओठ फसवे हसू हसतांना, थोडे वाकडे झाले. तो बोलला, "आपण सगळेच उद्दीपित झालो होतो. मी तर हवेतच होतो. इथे मी खाली आलो. माझ्या आयुष्यात मी एवढा आनंदी कधीच नव्हतो. लग्नासाठी लहानशी सुट्टी आखल्याने, ते झाले. आता हे प्रकरण पुढे आले आहे. मी जेव्हा शुद्धीवर आलो, मी तुम्हाला फोन केला, कारण मला चोरीचा लवकरात लवकर छडा लावायचा होता. त्या लहानशा मुलीने आमच्याकडील थोड्या वेळात, बँकेत इतकी रक्कम जमा केली आहे."

कोल्टन पुटपुटला, "फार वाईट, नॉरीस, मला ती गोष्ट सांग." उत्तर मिळण्यापूर्वीच तो कोल्टन कामात असतांना नेहमी त्याच्या पाठीशी असणाऱ्या थेम्सकडे वळला." कुणी सुरक्षा लॉकरकडे जात नाही ना, हे बघ. सिडने, मला कदाचित त्याची तपासणी करावी लागेल."

कोल्टन आंधळा नाही, असे शेकडो लोकांना न्यूयॉर्कमध्ये वाटत असे. तसे वाटणाय़्रा जॅमिसन हसल्यासारखे दाखवत बोलला, “लोकांनी आपल्याला कमी समजावे, म्हणून ही आंधळा असल्याची एक प्रकारची थाप मारणे, नाही का?”

एकदा तो त्यांच्या खोलीत होता आणि तेथील वस्तूंना त्याने त्याच्या डोक्याने शिकवलेल्या छडीने स्पर्श केला होता व त्याला त्यांचे हुबेहूब चित्र दिसले होते व ते त्याच्या मेंदूमध्ये कायमचे उमटले होते, हे समस्या असणाऱ्यांनी त्यांचा आब राखून, स्पष्ट केले.

शब्दोच्चार स्पष्ट व्हावेत म्हणून, त्याचे कोरडे ओठ चाटत, नॉरीसने सुरु केले, “ते कुठेही विकले जाऊ शकणारे प्रत्येकी दहा हजार किंमतीचे पन्नास सरकारी रोखे होते. मी काम करत असलेल्या स्टीलसन इस्टेटचा तो गठ्ठा आहे. आम्ही तो नीट लावत होतो. तिसरा सचिव म्हणून, माझे काम इस्टेट व ट्रस्टसंबंधी आहे.

आज रात्रीपर्यंत सर्व काही संपवणे गरजेचे होते. काल मी उशीरापर्यंत काम केले. इतक्या उशीरापर्यंत काम केले, की रोखे व इतर कागदपत्र लॉकरच्या ठराविक वेळेत त्यात जाणे शक्य नव्हते. आणि त्यावर मला आज सकाळी घड्याळी वेळ संपेपर्यंत, काम करावे लागले.”

कोल्टनने मध्येच विचारले, “किमती रोखे लहानशा सुरक्षा लॉकरमध्ये ठेवायची पद्धत आहे का?

“साधारणपणे हो. मोठ्या लॉकरइतकेच लहानसे सुरक्षा लॉकरही सुरक्षित असतात. फक्त त्याची वेळ ठराविक असते. हे कार्यालय खरे तर सुरक्षा लॉकरचाच एक भाग आहे. भिंतींना खिडक्या नाहीत व त्या चार फूट उंचीच्या असून स्टील सळयांमध्ये सिमेंट ओतून बांधलेल्या आहेत. दार स्टीलच्या पसरट प्रकारचे असून,

तिथे शिरायचा मार्ग केवळ एका लहानशा पिंजऱ्यातून जातो. तो दिवसा ट्रस्ट आणि इस्टेटचा मुख्य असलेल्या थॉम्पसनच्या व कारकून मंडळीच्या कामाने गजबजलेला असतो व रात्री तिथे एक वा दोन पहारेकरी असतात. ते तिथून कधीच जात नाहीत. कारण असे नेहमी होते, की महत्वाचे कागदपत्र व रोखे मोठ्या सुरक्षा लॉकरच्या बाहेर ठेवले जातात. त्यामुळे आम्हाला त्यावर नऊ वाजायच्या आधी काम करता येते. ही वेळ सुरक्षा लॉकरच्या कुलुपांवर नोंदवलेली असते. स्टीलचे दार उघडण्यासाठी, आतील व बाहेरील स्टीलच्या पिंजऱ्यात व स्टीलचे गज असलेल्या छोट्या पुढील खोलीत शिरावे लागते. शिवाय चोरी झाल्यास वाजणारे गजर बंद करावे लागतात. पहारेकऱ्यांना त्रास द्यावा लागतो. आम्ही सभासद असलेल्या बँकेच्या सुरक्षा विभागाच्या चोरीच्या गजर भागातील घंटी वाजवावी लागते. तरीही जर ते उघडले नाही, तर ते मिस्टर मॉन्टरोझ व मिस्टर सिम्पसन यांच्या व माझ्या सहयोगानेच उघडता येते."

"पहारेकऱ्यांना काही त्रास न घेता, ते उघडता येते का?"

"ते दोघेही बँकेत चाळीस वर्षे काम केलेले आहेत. ते काही झाले तरी विश्वासार्ह व अशिक्षित आहेत. ते कार्यालयात शिरू शकत असले, तरी त्यांना आता बघता बघता नाहीशा झालेल्या, इस्टेटीसंबंधीचे वा रोख्यांसंबंधीचे कागदपत्र चोरण्याइतकी पुरेशी माहिती नसते. तरीही त्याना बोलावणे धाडले आहे. व ते इथे कुठल्याही मिनिटाला येतील.

"तुम्ही बनवलेले कागदपत्रदेखील चोरीला गेले का?"

"सगळे."

“बँकेतील इतर कर्मचाऱ्यांना रोखे तिथे ठेवलेले असल्याचे माहिती होते का?”

“बहुतेक बऱ्याचजणांना.”

त्या सर्वांना त्या खोलीत कुठल्याही वेळी जाता येणे शक्य होते का?”

“फक्त ‘प्रवास आणि खर्च’ चा मुख्य कारकून असलेला थॉमस.”

“तो विश्वासू होता का?”

“तो बँकेबरोबरच वाढलेला आहे.”

“तुम्हाला वेळोवेळी इतर कारकून मंडळींची गरज भासते का?”

“थॉमस या कार्यालयातून कागदपत्र घेतो व ते बाहेरून कारकून लोकांना मिळतात. बँक बंद होण्यापूर्वी, त्यांना ते मला परत करावे लागतात. त्यांच्यापैकी प्रत्येकजण रात्री काम संपवून जाण्यापूर्वी, मी ते काळजीपूर्वक तपासतो.

“काल काम करत असतांना, त्यांनी रोखे पाहिलेले असू शकतील का?” क्षणभर कुणाकडूनच उत्तर आले नाही. मग ते कुजबुजत आले. “मिस रिचमॉन्ड व तिची आई काही वेळ आत होत्या --- “

सिम्पसन मध्येच बोलला, “देवा रे, मी पण होतो. मी तुम्हाला असे विचारलेही होते, की स्टीलसन इस्टेटमध्ये तुमचे कसे काय चालले आहे. माझे विचारून झाले, तेव्हा मी निघून गेलो. मला वाटते मी त्यांना एवढा वेळ त्रास द्यायला नको होता.”

पहिल्या उपाध्यक्षाकडे काही लक्ष न देता, कोल्टनने विचारले, “मिस रिचमॉन्डला बोलावणे पाठवले गेले का?”

गुप्तहेर गुरगुरत हसला. “तिला नक्कीच बोलावले गेले आहे.”

जेव्हा मला असे आढळले, की वेळ संपल्यावर, त्या माणसाची मंचावर काम करणारी बाई शिंप्याची पेटी घेऊन आली होती, तेव्हा माझा भागीदार सरळ तिला हॉटेलवर जाऊन भेटला होता.”

नॉरीस रागावून, उभे रहात बोलला, “अरे देवा, तू – “ कोल्टनने त्याच्या खांद्यावर ठेवलेल्या हातामुळे, तो परत खुर्चीत बसला. सगळया बायकांना देवदूत समजणाऱ्या सिडने थेम्सने त्याच्या मुठी आवळल्या.

वेगळयाच आवाजात कोल्टनने विचारले, “हे खरे आहे का?”

नॉरीसला धोका समजल्यासारखे वाटले. “मी सांगतो, ती दोषी नाही. ती दोषी असूच शकत नाही. ती --- ऐका, अरे, ती माझी बायको आहे!”

सगळे प्रतिध्वनीसारखे ओरडले, “तुझी बायको! गुप्तहेर विजयाचे हसू हसत, अध्यक्ष मॉन्टरोझ भीतीने, सिडने थेम्स आश्चर्याने व सिम्पसन अर्धवट दबल्या गेलेल्या अवस्थेत फारच अवाक् झाले.

“आम्ही दोन दिवसांपूर्वी लग्न केले. पण तिच्या मासिक पाळीच्या शेवटापर्यंत, ते गुप्त ठेवायचे होते.”

“किती काळापूर्वी, तिला बोलावणे धाडले गेले?"

गुप्तहेराने उत्तर दिले, ”माझ्या लाथेने तिला हाकलले गेले असेल. आता आम्ही तिथे काम करत होतो. ठीक आहे. ठीक आहे.”

एका माणसाचे गोंधळाचे, ओरडण्याचे, एका बाईचे अर्धवट हुंदके देण्याचे, बाहेरील आवाज त्यांच्या कानावर आले. दार सताड उघडले गेले आणि नृत्यनाट्यातील गायिका व नॉरीसची बायको असलेली ऱ्होडा रिचमॉन्ड, एका लहान खोलीत अर्धवट ढकलली गेली व अर्धवट उचलली गेली.

जॅमिसन तोंडभर हसत बोलला, ‘‘चांगले काम, जिम! ती हॉटेलमध्ये जोरात रडली का?’’

हॉटेल? इतरजण रागाने गुरगुरले. ‘‘तिच्यासाठी हॉटेल नाही. मी नशीबवान असल्यामुळे, तिला पकडू शकलो. ती तासाभरात दक्षिण अमेरिकेला जाण्यासाठी सुटणाऱ्या बोटीत चढणार होती.’’

मुलीच्या नाजूक हाताभोवती वेढा घातलेल्या माणसाकडे उडी मारून जात, नॉरीस किंचाळून ओरडला, ‘‘हे खोटे आहे.’’ कोल्टनची शांत खूण समजून, सिडने थेम्सने त्याला जबरदस्तीने मागे ढकलले. त्याचे स्वतःचे हात थरथरत होते. एकही शब्द न बोलता, समस्याग्रस्ताने मध्यवर्ती कार्यालयातील माणसाची बोटे सोडवली आणि सभ्यपणे मुलीला लांब टेबलाजवळील खुर्चीत बसवले.

अचानक गुप्तहेर गुर्मीने जोरात ओरडला, ‘‘कोण --- “ कोल्टनने अणकुचीदार दगडासारख्या कडक आवाजात म्हटले, ‘‘आमच्यासाठी तुझ्या बळकट दंडाच्या पद्धती बास झाल्या! आम्ही आता काही गोष्टी जाणून घेतो.’’ कडकपणा संपला. त्या जागी हळूवार सहानुभूती आली.

त्याने विचारले, ‘‘मिस रिचमॉन्ड, तुम्हाला निरोप कधी मिळाला?’’

दुखावलेल्या मुलाला डोक्यावर थोपटल्यासारखा धीर देणारा परिणाम त्या आवाजात होता. प्रयत्नपूर्वक त्या मुलीने हुंदके थांबवले आणि जगातील सर्वात नैसर्गिक प्रश्न असल्यासारखे उत्तर दिले. ‘‘एक तासापूर्वी --- फोनवर --- मला वाटते --- तो मिस्टर नॉरीसचा आवाज असल्याचे मला कसे कुणास ठाऊक, पण समजले. तो मला ब्युनोज एअर्स धक्क्यावर भेटू इच्छित होता. तो म्हणाला, की त्याला गुप्तपणे दक्षिण अमेरिकेला जायचे होते आणि मी हे कुणाला सांगायचे नाही. मी आईला

सुद्धा न सांगता धक्क्यावर पोचले. मी एक तास थांबले. पण तो आला नाही. मग मी परदेशी जायचे ठरवले. त्याला माझ्याविना चुकल्यासारखे वाटते का व तो समारंभासाठी असलेल्या मोठ्या खोलीत जातो का, हे मला बघायचे होते. हा मनुष्य --- म्हणाला --- होवर्डने --- चोरी केली ---- मी विचार केला” पुन्हा ती मोडून पडली.

दुसऱ्याच्या वाईट नशीबाला हसणारा जॅमिसन तोंडभर हसत बोलला, “पुढील तासाभरात, आपल्याला येथून सहजपणे निघता येईल.”

कोल्टन विरोधभासात्मक पद्धतीने चपराक लगावत बोलला, “रोखे कुठे गेले, याची तुला काही काळजी नसल्याचे दिसते.”

घशातून खर्जातील आवाज काढत, जॅमिसन बोलला, जेव्हा तुला प्रश्न विचारून, सर्व काही समजेल, तेव्हा जाहीर कर, ठीक आहे?”

कोल्टनने अचानक मुलीला विचारले, “काल तुझ्याबरोबर शिंप्याची सुटाची पेटी होती का?”

“हो. मी माझा फिरायला जातांना घालायचा सूट तयार आहे का, हे बघण्यासाठी फोन केला होता. तो माझ्या घरी पाठवण्यासाठी तयार होता. पण जेव्हा मी गरीब बिचाऱ्या दमलेल्या मुलाला तो आणायला लागणार असल्याचे पाहीले, तेव्हा मीच तो आणला. या रस्त्यावर शिंपी कोपऱ्यावरच आहे. म्हणून आई व मी इथे आलो.”

गुप्तहेरांच्या चेहऱ्यावरील उद्दाम हसू जाणवून, कोल्टन मान हलवत व दात एकमेकांवर घासत बोलला, “अर्थात, नॉरीस ज्यावर काम करत होता, त्या कागद पत्रांमधील रोखे तुम्ही ओळखले का?”

"ओहो, त्यांनी ते मला दाखवले आणि आम्ही हसत हसत त्या अर्धा मिलियन [पाच लाख] डॉलरचे काय करायचे, हे बोलू लागलो. मग जेव्हा त्याने आईला बँकेचा परिसर बघण्यासाठी बाहेर नेले, तेव्हा मी खूप दमले होते --- मी त्यातील एक उचलून वाचला."

नॉरीस ओरडला, "होडा!" त्याला कालच्या निष्पाप शब्दांचा मतितार्थ आता त्याच्या लक्षात आला.

जॅमिसन रागाने बोलला, "जर या माणसाला तिला प्रश्न विचारून, तिचा छळ करायचा असेल, तर करू दे. जर त्याने ते आपल्यासाठी सोपे केले, तर तेदेखील करू दे."

"आणि जर त्याने ते सोपे केले नाही, तर हे होईल. दुसऱ्या गुप्तहेराने त्याच्या खिशातून ओढून कागदपत्र बाहेर काढले. "इथे ब्युनोज एअर्समधील उतारूंची यादी आहे. इथे काल तिकीट काढलेल्या मिस्टर आणि मिसेस फ्रँक मॉरीस यांचे पेन्सिलीने वाढवलेले नाव आहे. नॉरीसच्या जागी मॉरीस! फारसे श्रम न घेता सहजपणे केलेले खूपच चांगले काम."

कोल्टन सोडून खोलीतील बाकी सगळ्यांना बधिरता आली व ते नीट विचार करू शकेनात.

जॅमिसन "आता" हे शब्द अशा काही स्वरात म्हणाला, की जसे काही त्याला काही हुशारीची गोष्ट सांगायची होती आणि त्याबरोबर त्याने विचारपूर्वक शांतपणे, त्याच्या पँटवर छडीने आपटत, आंधळ्या माणसाकडे एक फसवा कटाक्ष टाकला.

“जर तुझी हरकत असेल, तर आपण या दोघांना मुख्य कार्यालयात नेऊ आणि जिथे चोरी पकडली, तिथे फोन करू. फोन जोडा.” तो फसवेपणे सूचकता दाखवत, बोलला.

नाखुषी दाखवणाऱ्या छडीच्या लाटेने परवानगी आली आणि धोका दाखवत, छानसे हसू आले. ते त्यातील चांगुलपणाचा धोका दर्शवत होते. “जॅमिसन, तुला हवे असेल, तेवढे लांब जा. त्यांच्याशी फार मऊपणे वागू नको.”

“अरे देवा, मिस्टर कोल्टन, तुम्ही विचार करत नाही!” नॉरीसचा आवाज त्याच्या घशात दाटला.

समस्या निवारण करणाऱ्याचा स्वर विशेष शांत होता. “मला वाटते, तुम्ही गेलात तर जास्त बरे होईल.” जॅमिसन आणि त्याचा भागीदार हे त्या विभागातील दोन सर्वात श्रीमंत गुप्तहेरांपैकी होते. ती श्रीमंती त्यांनी कशी मिळवली, ते कुणालाच माहिती नव्हते. पण खोट्या अटकेच्या कारवाईसाठी ते तुम्हाला व तुमच्या बायकोला वीस हजार डॉलरची रक्कम देऊ शकत.

त्यासाठी काही तासांचा त्रास सहन करणे ठीक होते, नाही का? ते गेल्यावर मी तुमचा निरागसपणा सिद्ध करू शकेन. इथे त्यांनी माझ्यासाठी काळजी निर्माण केली.”

सिम्पसनने शीळ घातली व जोराने हसत पुढे मागे होऊ लागला. तो उद्गारला, “देवा, ते हुशारीचे होते.”

त्यांच्या विरोधाभास दाखवणाऱ्या फसव्या आवाजात त्याची लायकी नसल्याचे गुप्तहेर एकत्र बोलले, “ओहो, ते असे आहे का?” कोल्टनला त्यांना थांबून विचार करायला लावेल, अशी एक गोष्ट माहिती होती.

कोल्टनने विचारले, “तुम्ही जात आहात का?”

जॅमिसन गुरगुरला, “आम्ही पहील्यांदा त्या दोन पहारेकऱ्यांना शोधतो.”

अचानक बदल झालेला पाहून, कोल्टन हसून बोलला, “छान! तुम्ही तिथे खूप वेळ रेंगाळलात, तर तुम्हाला मुख्यालयाकडे नेण्यासाठी चांगली गर्दी मिळेल. मी निघण्यापूर्वी या चोर- गजर तार विभागाच्या कार्यालयातून, आज पहाटे झालेल्या गजराला उत्तर देणाऱ्या माणसाला ताब्यात घेण्याबद्दल मी फोन केला आहे.”

जॅमिसन भुंकला, “कसला चोर गजर?” तो पांढऱ्या केसांच्या अध्यक्षावर परतपरत डाफरत बोलला, ‘तुम्ही आम्हाला असा गजर वाजला असल्याचे सांगितले का नाही?”

अनेक जोराचे धक्के बसून व्हॅनडाईक म्हणाला, “मला खरेच माहिती नव्हते. आम्हाला दुपारपर्यंत, तातडीच्या गजरांचे व निरनिराळ्या वेळांचे अहवाल मिळत नाहीत. मिस्टर कोल्टन, तुम्हाला ही माहिती कुठून मिळाली, हे मी विचारू शकतो का?”

कोल्टन गर्विष्ठपणे उत्तरला, “मी त्यासाठी फोन केला होता. जर पोलिसांनी दक्ष राहून अटक केली नसती आणि चोरी ही अगदी सहज झाली नसल्याचे, त्यांच्या रिकाम्या जड डोक्याला वाटले असते, तर कदाचित त्यांनी तपास केला असता. पण ती तर फक्त मुख्यालयातील माणसे आहेत. ते अटक तर नेहमीच करतात. डोक्यापेक्षा पाय मजबूत असले, की केंद्रीय कार्यालयातील माणसे चांगली तयार होतात. ओहो, इथे सगळी माणसे एकत्र आहेत.

कशाही वेड्यावाकड्या पद्धतीने वाढलेल्या, अशक्त, हनुवटी लपवणाऱ्या

व पाणी चमकणाऱ्या मलूल डोळ्यांभोवती पसरणाऱ्या पांढऱ्या मिशा असलेला एकजण आणि एक थापटलेल्या चेहऱ्याचा व सुरकुत्यांचे जाळे असलेला दुसरा म्हातारा माणूस, असे दोघेजण सावकाश आत आले.

त्यांचा प्रत्येक भाग कमकुवतपणा, दीनता व प्रामाणिकपणा दर्शवत होते. कोल्टनने स्वागतपर काही पुटपुटत दोघांचाही हात हातात घेतला, तेव्हा त्याला त्यांची थरथर जाणवली. वयस्क पहारेकऱ्याला समजले, की काही घडले आहे. इतकी वर्षे ज्यांनी बँकेचे रक्षण केले, त्यांचे व बँकेचे काही झाले आहे. चोर- गजर तार विभागाच्या कार्यालयाच्या दोन माणसांनी दोन गुप्तहेरांकडे बघून मान हलवली व कोल्टनने स्वागतपर काही पुटपुटत दोघांचाही हात हातात घेतला. कोल्टनशी हातमिळवणी करून, त्यांचे डोळे बारीक झाले.

दोघांनाही तो माहिती होता आणि हेदेखील माहिती होते, की हे काही साधासुधे आरोपपत्र नाही.

थॉर्नले कोल्टन साध्या गोष्टींचा काही त्रास करून घेत नसे. सिडने थेम्सने दोन खुर्च्या ओढत टेबलाशी आणल्या व दोघे म्हातारे बसले. कोल्टनने विचारपूर्वक सिगरेट पेटवली व मग बोलला, "सभ्य गृहस्थहो, आज सकाळी त्या लहान सुरक्षा लॉकरमधून पाच लाख डॉलर्स किंमतीचे सरकारी रोखे चोरीला गेले." त्याची बारीक छडी त्याच्या जवळील माणसाच्या खुर्चीला चिकटून, सुस्तपणे त्याच्या बोटांमध्ये धरलेली होती. त्याला पहारेकऱ्याची उडी नकळत जाणवली. इतरांनी म्हातारी तोंडे पडलेली पाहिली. त्यांनी व पहारेकऱ्यांनी एकमेकांकडे दीन कटाक्ष टाकले. त्यांची थरथरणारी बोटे झिजलेले पँटचे गुडघे धरत होती. कोल्टनने रक्षणकर्त्या चोर- गजर तार विभागाच्या दोन माणसांची तोंडे आश्चर्याने वासलेली पाहीली.

भावनातिरेकाने आवाज थरथरत पांढरी दाढीवाला पहारेकरी बोलला, “मला हे माहिती होते. जेव्हा मेरी आजारी पडली, तेव्हा काहीतरी होणार, हे मला माहिती होते.

कोल्टनने रुची दाखवत विचारले, “मेरी कोण?” इतरजण गर्दी करून पुढे आले. मेरी माझी बायको आहे. ती गेले तीस वर्षे बँकेची फरशी धुते आहे आणि तिच्याविरुद्ध कोणी एक शब्ददेखील काढलेला नाही.” त्याने दयनीय आक्रमकपणे त्यांच्याकडे पाहीले. “तिला जमिनीवर सापडलेल्या पिनाही ती उचलून रोखपालाच्या खोक्यात ठेवत असे.”

सिम्पसन हसत बोलला, “ते खरे आहे. तो बँकेचा विनोद आहे.”

थॉर्नलेने सभ्यपणे विचारले, “आणि काल रात्री ती आजारी पडली?”

एक पहारेकरी त्याच्या कोरड्या ओठांवरून त्याचा वयाने खरखरीत झालेला हात फिरवत असतांना, दुसरा पहारेकरी उत्तरला, “एक आठवड्यापूर्वी. मिसेस बोडेनला अस्थमा झाला होता आणि ती आमच्या जवळच हॉलच्या पलीकडे रहाते --- “

कोल्टन मध्येच बोलला, “तू कुठे रहातोस?”

“सोळाशे तीन रस्त्यावर. मी, तो व त्याच्या बायकोबरोबर गेली तीस वर्षे रहातो. मिसेस बोडेन मेरीसाठी काम करते. आम्ही मेरी आजारी असल्याचे कुणाला सांगितले नाही, कारण तिला मग काढून टाकले गेले असते. आणि मिसेस बोडेन खूप गरीब आहे. त्याचा आवाज पोरकटपणे थरथरत होता.

कोल्टनने त्याला उत्तेजन देत विचारले, “काल रात्री, मिसेस बोडेनने तुझा विश्वास संपादन केल्यावर, तू तिला मिस्टर नॉरीसच्या कार्यालयाची फरशी झाडून

पुसून घ्यायला परवानगी दिलीस?”

कोल्टनच्या आज्ञार्थी शांततेतून हालचाल करत, नॉरीसने घाईघाईने सुरु केले, “मी ते विसरलोच होतो!”

मेरीचा नवरा थरथरत म्हणाला, “हो. जॉनने दार उघडले व त्याच्या घड्याळात बघून लिहायला सुरवात केली. मी नेहमीप्रमाणे शेजारील खोलीत मिसेस बोडेनवर लक्ष ठेवायला थांबलो. मग कसे माहिती नाही, पण दार लागले व अंधारात मिसेस बोडेन घाबरली. ती खरेच उदास होऊन, किंचाळून रडू लागली.

जॉनकडे किल्ली होती, पण त्याला प्रत्येकाची येण्याजाण्याची वेळ घड्याळात बघून लिहून ठेवायचे काम होते. मिस्टर मॉन्टरोझला दुसऱ्या दिवशी चुकीच्या अहवालाच्या नोंदी मिळाल्या असत्या, तर तो चिडला असता. मी माझी शेजारील खोलीतील जागा सोडू शकत नव्हतो. त्यामुळे मी तिला असे सांगून शांत केले, की जॉन अर्ध्या तासात येऊन तिला बाहेर काढेल. ती नंतर शांत झाली. तिने जोरात किंचाळणे थांबवले. पण मी तिला अंधारात पायाने थयथयाट करतांना ऐकत होतो. पुढील दार कोण वाजवत आहे, हे बघण्यासाठी जॉनला धावत जावे लागले आणि त्याने या लोकांना आत घेतले. ते म्हणाले --- सुरक्षा लॉकरमधील चोरीचा गजर वाजला आणि --- ”

कोल्टन थांबून बोलला, “त्या गोष्टीचे एवढे काही नाही. त्यांच्यापैकी एखादा मला त्याबद्दल सांगेल.”

चोर- गजर तार विभागाच्या कार्यालयातील दोघांपैकी एका उंच असलेल्याने सांगायला सुरवात केली. “सात वाजून अठरा मिनिटांनी सुरक्षा गजरापाशी आम्हाला बोलावले गेले. गालीच्याखालून सुरक्षा लॉकर सर्व बाजूंनी

वायरने जोडले गेले आहेत. सुरक्षा लॉकरला चिकटून एक माणूस उभा असतो व त्याचे धातूच्या पत्र्यावर आपटून वाजणाऱ्या गजराकडे लक्ष असते. दिवसा अर्थात आम्ही तो बंद करतो. एका कशाही, गबाळग्रंथी व दाढी वाढलेल्या माणसाकडे निर्देश करत, तो बोलला, "आम्ही इथे आलो, तेव्हा आम्ही दार बंद पाहिले. आत कुणीतरी शोक करताना आम्ही ऐकले. बंद दारामागे स्कर्ट खोचलेली एक बाई जमिनीवर पडून मरणांतिक घाबरलेली दिसत होती. तिने आम्हाला पाहिल्यावर, ती उठून रडत उभी राहिली. ती देवाचे आभार मानणारे काही शब्द पुटपुटत होती."

"तुम्ही ती घाबरलेली असल्याची खात्री केली?"

"हो. पण आम्ही तिला तसेच बाहेर जाऊन दिले नाही. आम्ही सर्व दिवे लावले व कशालाही हात न लावता, खोली तपासली. तिला सभ्यपणे, अर्थात तिच्या अंगावर काही [ चोरलेली ] वस्तू नाही ना, हे बघण्यासाठी तपासले. अंधारात दार शोधतांना, ती सुरक्षा लॉकरच्या बाजूला पडल्याचे आम्हाला तिच्याकडून समजले. तिला दिव्यांची बटणे कुठे आहेत, हे माहिती नव्हते."

"चोरले गेलेले दहा हजार डॉलर किंमतीचे पन्नास रोखे तिच्याकडे सापडले नाहीत ना?"

दोघेजण हसले. दोघांपैकी बुटका हसत बोलला, "अरेच्या, मिस्टर कोल्टन, ती इतकी नाजूक व अशक्त होती की तुम्ही तिच्या आरपार पाहू शकला असतात. तिने साधा सिगरेटचा कागद लपवला असता, तरी त्याचा फुगीरपणा जाणवला असता."

"मग काय झाले?"

"तिने तिच्याकडील बादली उचलली. त्यात जमीन पुसलेले घाणेरडे पाणी

भरलेले होते. साबणाचा पिवळा फेस त्यावर तरंगत होता. जॉनने तिला इथे रोखपालाच्या पिंजऱ्यात नेले. आम्ही आजूबाजूला बोलत उभे होतो. ती घरी जाईपर्यंत, आम्ही ते घाणेरडे पाणी व तिचे रडणे बघत होतो. ती इतकी गलीतगात्र झाली होती, की मी तिला गाडीत ठेवले." कोल्टनने शांतपणे त्याच्या सिगरेटची राख झटकत, जॅमिसन व त्याच्या भागीदाराकडे वळत म्हटले, "अरेरे, मला हे फार संशयास्पद वाटते आहे, नाही का जॅमिसन? मी तुम्हाला या चार माणसांना अटक करून त्या बाईच्या मागावर रहाण्याचा सल्ला देईन. दहा हजार डॉलर किंमतीचे पन्नास रोखे, कुणाही प्रामाणिक माणसाला वेडा बनवण्यासाठी पुरेसे आहेत.

जॅमिसन उपहासाने म्हणाला, "तो फसव्या तूच तर नाहीस? मला तेथील पेटे माहिती आहे. जर तो सर्व काही ठीक होते असे म्हणत असेल, तर तसे असले पाहिजे. आपण पहील्यांदा अपराधी माणसांना खेचले पाहिजे. मग आपण सामानही आणू."

कोल्टनच्या ओठांवर हसू फुटले. तो धमकीवजा स्वरात म्हणाला, "तुम्ही त्यांना अटक करा. मग आपण तासाभरात आपण खोट्या अटकेची कारवाई सुरु करू. तुम्ही मॉरीस आणि मिस रिचमंडला इथेच सोडा! ते गुन्हेगार नसल्याचे फक्त मूर्ख गुप्तहेरच म्हणतील."

एवढे बोलून, त्याने सुरक्षा लॉकरकडे उडी मारली. स्टीलच्या पृष्ठभागावर त्याची निष्णात जाणकार बोटे उमटवली. तो गुडघ्यांवर बसला. त्याच्या बोटांच्या टोकांनी त्याने हलकेच जाड गालीच्यावर ब्रशसारखा हात फिरवला. त्याच्या चकाकणाऱ्या गालांवरील दोन ठिपके अजून लाल झाले. माग काढणाऱ्या कुत्र्यासारख्या त्याच्या नाकपुड्या जलद गतीने हलल्या. धुरकटलेल्या, मोठ्या गोल काचेमागील डोळे चमकू लागले. शांतपणे ते त्याच्याकडे बघू लागले.

त्याने त्याचा चेहरा जवळजवळ जमिनीकडे वळवला. त्याने छडी खाली ठेवली. तो हाताने गालीच्यावर ठेका धरु लागला. त्यांनी त्याच्याभोवती गर्दी केली. त्याचा एक हात मागील खिशाकडे गेला. त्याने रुमालाने सुरक्षा लॉकरच्या खालील, भिंत व गालीच्यामधील जमीन झाडली. तो उठला सिगरेटच्या पेटत्या टोकाला हलका स्पर्श करुन त्यावर रुमाल टाकला. त्यात बारीक, पिवळी भुकटी सांडली.

तो ओरडला, “बघा. बघा. कडक लाकडाच्या जमिनीचा तोच रंग असल्याने तुम्हाला ते आधी दिसले नाही.

जॅमिसन पुढे येत फसवेपणे शेरा मारत बोलला, “ती लाकडाला चकाकी आणणारी भुकटी आहे. आम्हाला नको आहे --- “

आंधळ्या माणसाने मुख्य कार्यालयाच्या माणसाच्या नाकाखाली रुमाल धरत म्हटले, “याचा वास घे. आता तुला तो ओळखला का? तो सल्फरचा वास आहे. भुकटी केलेले सामान्य सल्फर. रोखे कार्यालयाबाहेर कसे नेले गेले, हे कुणाही माणसाला सांगणारी गोष्ट. औषधाच्या दुकानात जाऊन सल्फर कशाकरता वापरले जाते, हे शोधून काढ.”

त्याने रुमाल कोटाच्या खिशात टाकला. पँटचे गुडघे झटकले आणि त्याची काठी उचलली.

तो शांतपणे बोलला, “सिडने, इकडे ये. “आपले काम संपले.”

चकित झालेल्या लोकांनी ह्लण्यापूर्वी किंवा काही बोलण्यापूर्वी, तो घाईने, आपोआप पायऱ्या मोजत, कार्यालयातून निघून गेला. त्याने थांबलेल्या गाडीमध्ये उडी मारली. सिम्पसन व जॅमिसन दाराकडे धावले, तेव्हा सिडने थेम्स

त्याच्यामागोमाग आला. तो आयरीश गाडीचालकाला बोलला, "जॉन, घरी." आणि मोटार जोरात दूर गेली.

पहिल्या कोपऱ्याशी तो पुढे वाकला.

त्याने आज्ञा दिली, "सोळाशे तिसरा रस्ता --- लवकर!"

थेम्सने आश्चर्य दाखवत विचारले, "तुला ते दोन म्हातारे पहारेकरी गुन्हेगार वाटत नाहीत का?"

झटपट व थोडक्यात, तो बोलला, "नाही. ती नको असलेली बिनमहत्वाची माहिती होती. ती मी डोक्यातून काढून टाकतो."

"तू नक्कीच गर्दीतील सर्वांना गोंधळात टाकलेस." काही आठवून थेम्स हसला.

"मला तेच करायचे होते. म्हणूनच मी त्या सर्वांच्या खोलात गेलो. मला सर्वांना, विशेषतः त्या दोन गुप्तहेरांना आश्चर्यात पाडायचे होते. आता ते विचार करू लागतील. आणि आपण हा फोन करण्यापूर्वी कुणालाही बाहेर जाऊन देणार नाहीत. मला आता विचार करायचा आहे."

सिडने थेम्सला आंधळ्या माणसाची मनस्थिती माहिती होती. तो काही स्पष्टीकरण वा उत्तरेही देणार नाही, हेदेखील माहिती होते. कोल्टन ती द्यायला तयार होईपर्यंत, ते पूर्वेकडे वरील बाजूस जात राहीले.

लवकरच ते वरील तिसऱ्या रस्त्यावर आले. शिकाऊ गाड्यांचा मोठा, नकोसा आवाज त्यांच्या डोक्यावर चालला होता. अनेक प्रकारच्या बायकापुरूषांची व मुलांची गर्दी रस्त्यावर उसळली होती. घाणेरड्या भाड्याच्या घरांवर आग लागल्यास विझवायचे गंजके जिने डगमगत होते.

कोल्टनच्या चेहऱ्यावरील ताणलेले गडद भाव नाहीसे झाले.

“हे पारंपारिक बर्कले ट्रस्टचे दुरून कानावर पडणारे गंभीर रडणे आहे का, सिडने?” तो उशीवर मागे रेलत, सिगरेटचे झुरके ओढत, गंभीर विचार मनात येत नसल्यासारखा हसला. वाचनालयाच्या धुरकट काचेतून, डोक्यावर दिसणाऱ्या आकाशाच्या निळया पट्ट्याकडे त्याचे डोळे लागले होते.

गाडी थांबली.

“जॉन, हे ते आहे का?”

“कोपऱ्यावरचे सलून पंधराशे चौऱ्याण्णव आहे.”

कोल्टनच्या गोऱ्या गालावरील दोन लाल जागा पुन्हा चकाकल्या. “सिडने, रस्ता दाखव.” तो उडी मारून, फूटपाथवर गेला. त्याची बारीकशी काठी त्याच्या पँटच्या कडेला उत्सुकतेने घासत होती.

थेम्स उतरून त्याच्या कोटाच्या बाहीच्या कडेला चिकटेल इतका जवळ आला. त्या पुसट स्पर्शाने त्याला मार्ग सापडत, समस्या सोडवणारा चालू लागला. कारण तो त्याच्या आंधळेपणावर फारच भावूक होता आणि त्याला रस्ता दाखवण्याचा प्रयत्न करणे, त्याला चीड आणत असे. एक बरेसे कापडाचे दुकान व कर्जे देणाऱ्याचे दुकान यामध्ये सिडनेला आत शिरायचा रस्ता दिसला. हवेने पुसट झालेल्या क्रमांकाची खात्री करण्यासाठी, तो थांबला. कापडाचा दुकानदार त्याचे घाणेरडे तळहात चोळत व खोकल्याबद्दल माफी मागत, बाहेर डोकावला.

कोल्टनने कडकपणे विचारले, “मिसेस बोडेन कितव्या मजल्यावर रहाते?”

“चौथ्या मजल्यावर, पुढील बाजूला. तुम्हाला काही कपडे घ्यायला आवडेल का?”

“तिचा नवरा बर्कले ट्रस्टमध्ये पहारेकरी आहे का?”

“तो वारला. तुम्हाला हॉलपलीकडील मिसेस श्नायडर हवी आहे का? तिचा नवरा पहारेकरी आहे. रस्त्याचा शेवटचा डेरे बोर्डर देखील. तुम्हाला गरीब बायकांना असे --- चांगले स्कर्ट द्यायचे आहेत का?”

थेम्सने दार उघडले. त्याने कापडाच्या दुकानदाराला वाक्याच्या मध्येच सोडले. अंधाऱ्या हॉलमधून, सिडनेने काळजीपूर्वक मार्ग काढला. पुढील माणसाच्या टाचांना काठी टेकवत, न डगमगता कोल्टन चालला होता. त्या वेड्यावाकड्या पायऱ्यांचा प्रवास त्याच्यासाठी छळीक होता. त्याच्या तीक्ष्ण कानाना व वास घेण्याच्या उच्च क्षमतेला अर्धपोटी मुलांचे आवाज नकोसे होत होते. पण त्याच्या मेंदूने आपोआप पायऱ्या मोजल्या, जेणेकरून त्याला परततांना जराही त्रास होऊ नये.

चौथ्या मजल्याच्या हॉलशी थेम्स थांबल्यावर, कोल्टन कुजबुजला, "पहील्यांदा श्नायडर," मंद उजेडात, थेम्सने बघितले, की ते दोन दारांच्या मध्ये उभे आहेत. “यापैकी कुठले, ते मला माहिती नाही, पण मी जाऊन बघतो.” त्याने त्याच्या डावीकडील दारावर टकटक केले. मागचे दार ताबडतोब उघडले गेले. “मिसेस बोडेन बाहेर गेली आहे.” एक नीट चालू न शकणाऱ्या, म्हाताऱ्या बाईने तिचे डोके, वर खाली करत, उंच/भेदक आवाजात जाहीर केले.

कोल्टन त्याची टोपी काढत, नम्रपणे वाकत म्हणाला, “तुम्ही तिचा पत्ता देऊ शकता का?

घाईने लांब व सरळ नसलेल्या अवस्थेत पण सरळ होण्याचा प्रयत्न करत, त्या म्हातारीने तिच्या थरथरत्या हाताने चष्मा सावरत, म्हटले, “पण कायदे! ती

तिच्या ब्रुकलीनमधील बहिणीबरोबर रहाण्यासाठी गेली आहे. ती आजारी पडेपर्यंत तिला माझ्या मुलांनी बघितले. तिची तब्येत इतकी नाजूक झाली आहे, की काल रात्री उशीरा सोशिएबल चर्चमध्ये ताटल्या धुतांना --- "

"तुम्ही मिसेस श्नायडर आहात का?"

"मुलांनी" मुळे आलेले हसू अंधारात लपले. "मी तिची मैत्रिण आहे. तुम्ही मदत करणाऱ्या लोकांकडून आला आहात का? मिसेस बोडेन म्हणाली, तिने मदत मागितली आहे. फुफ्फुसे अशक्त असल्याने, मोठ्या दुकानातील तिची नोकरी गेल्यावर, दोन आठवड्यांपूर्वी ती इथे आली. तिला अस्थमा असल्याचे ती म्हणते. त्यामुळे तिला एक दिवसाआड काम करणेच फक्त झेपते. पण ती असे म्हणत असली, तरी मी काही तिला मला मूर्ख ठरवू देणार नाही. माझ्या दोन --- "

कोल्टन मध्येच बोलला, "आणि तू आजारी असल्याचे सोंग करून, तिला मदत केलीस?

त्या बाईने लगेच त्याचे बोलणे दुरुस्त करायची घाई केली. "मी दोन दिवस आजारी होते. पण तिच्या तथाकथित अस्थम्यासाठी काही सेंट मिळू शकत असल्याचे पाहून, ती आनंदी झाली. तो अस्थमा नव्हताच. माझ्या बहिणीचा भाऊ ---"

"अर्थात तिने ती परतेपर्यंत किल्ली तुझ्याकडेच ठेवली?"

कोल्टनने बहिणीचा भाऊ हवेत अर्धवट सोडून दिला.

"हो, पण --- " त्याच्या आवाजात संशयाची छटा होती.

कोल्टनने थंडपणे मान्य केले, "तिला खरेच पैशांची गरज होती, हे सिद्ध करण्यासाठी, दानधर्म संस्थेचे दलाल म्हणून आपण खोलीची तपासणी केली

पाहीजे. अर्थात आपण ती परतेपर्यंत थांबू शकतो. पण हा या महिन्यातील शेवटचा दिवस आहे.”

ती रागारागाने खोलीत शिरली. “कायदे! मी ते मुळीच मानत नाही.” आणि क्षणभराने एका मोडक्या टीनच्या चिमटयाला बांधलेली लोखंडी किल्ली घेऊन, ती परतली.

थेम्सने किल्ली घेतल्यावर, कोल्टनने नम्रपणे जाहीर केले, “मिसेस श्नायडर, तुम्हाला काळजी करायची काही गरज नाही.” ती बोलली, “कायदे! माझे एवढे हे बटाटे उकडले, की मी तुमच्याबरोबर असेन. माझ्या मुलांना त्यांच्या बँकेत जावे लागेल --- “ बाकीचे वाक्य तोडले गेले, कारण कोल्टनने थेम्सला दारापासून धक्का देऊन बाहेर काढल्यावर, ती स्टोव्हकडे वळली.

तो कुजबुजला, “लवकर!” क्षणभरात किल्ली कुलुपात बसली. दार उघडे होते.

चीर गेलेल्या, वेड्यावाकड्या पलंगाला व मोडक्या खुर्चीला त्याची छडी चिकटवत, कोल्टन आत घुसला. छडी फिरवत, त्याने चौकशी केली, ट्रंक कुठे आहे?”

“तिचा काही पत्ता नाही, कपाटे वगैरे काही नाही.”

कोल्टन फटकारला, “कपाटाचे खण गेले खड्ड्यात! तुमच्या डोळ्यांना काय दिसते, ते शोधा.”

थेम्सने त्याचे संपवण्यापूर्वी वरचा खण जवळजवळ उघडा होता. त्याने मजेने शीळ घातली. “काही नाही, तर वर नाव नसलेली रिकामी गोळ्यांची पेटी, कापलेली तीन पिसे आणि थोडा कापूस. काय --- “

“तेच मला हवे होते. ते तुझ्या खिशात टाक.” त्याचा आवाज ताणलेला वाटत होता. तो नम्रपणे मान्यता मिळण्यासाठी थांबला, कारण त्याच्या तीक्ष्ण कानांना त्या बाईच्या येण्याची चाहूल लागली. तो मऊपणे बोलला, “मिसेस श्नायडर, मिसेस बोडेनला आपल्या मदतीची गरज आहे, यात काही संशय नाही.

“अं --- कपाटातील वरच्या खणात तिची अस्थम्याची औषधे आहेत का?”

ती त्याच्या अंगावरून धावत गेली व उघड्या खणात तिचे डोके खुपसले. आंधळया माणसाकडे मान हलवत, रोखून बघत बोलली, “मिस्टर तुमचे डोळे चांगलेच शक्तिमान दिसत आहेत.” तो कपाटापासून पाच फुटांवर देखील नव्हता.

“ती तिच्या अस्थम्यावर चांगलीच ठाम दिसते आहे. पण माझ्या बहिणीचा भाऊ --- “

परत बहिणीच्या भावाला लटकवत ठेऊन, तो बोलला, “मिसेस बोडेनच्या चारित्र्याबद्दल वाईट, असे काही तुम्हाला माहिती आहे का?”

“कायद्याप्रमाणे नाही. स्वतःच्या सावलीलाही घाबरेल, एवढी ती घाबरली होती. तिच्याबरोबर रहाणारी मी एकटीच आहे आणि माझ्यापासूनदेखील ती अंतर राखून व नम्र असते.” परत जोराने मान हलवणे.

इतर काही बायका येतात, तशी ती अर्धवट कपडे घालून हॉलमध्ये येणार नाही.”

“आणि स्पष्ट कायदे! तिच्या ब्रुकलीन मधील बहिणीच्या तेराव्या शतकातील धोब्याकडे आज तिने तिचे सर्व कपडे नेऊन टाकले आहेत. मला नाही --- “

“ओहो, आभारी आहे. पण आम्हाला अजून चारजणांना भेटायचे आहे.” असे म्हणत व थंडपणे वाकत, कोल्टन खोलीतून बाहेर पडून, जिन्याकडे निघाला. त्याच्यामागून थेम्स व वरच्या पट्टीतील आवाजाचे त्या बाईचे स्तुतीपाठक निघाले.

कोल्टनच्या बाजूच्या शांत रस्त्यांवरील गोंधळ मागे टाकून, ते शांतपणे गाडीत बसले.

समस्या सोडवणाऱ्याने थंडपणे विचारले, “सिडने, तुला याबद्दल काय वाटते?”

डोके हलवत, थेम्सने कबुली दिली, “मी पूर्णपणे गोंधळून गेलो आहे.”

आपण बँकेत गेलो, तेव्हा नॉरीसचे वर्तन फारच वाईट होते. मग ते दक्षिण अमेरिकन बोटीचे प्रकरण. तिला निरोप मिळाला की नाही, हे तुम्हाला कसे समजणार?” त्याने अचानक विचारले.

“नाहीच. पण मला मिस रिचमॉन्ड किंवा मिसेस नॉरीस माहिती आहे. कुणालाही सामान्यज्ञान वापरून, एवढे समजले असते, की ब्युनोज एअर्स धक्क्यावर तिला हजर रहाण्याचे तेवढेच कारण होते. जॅमिसन व त्याच्यासारखे इतरजण सामान्यज्ञान वापरत नाहीत. ते पोलिसांची जुनी पद्धत वापरतात. तर्काने गुन्हेगार वाटणाऱ्यांना अटक करायची आणि मग खटला चालवायचा. नॉरीस व त्याच्या बायकोसारखे अर्धवट संशय घेणारे लोक एकतर दुसऱ्याला वाचवायचा प्रयत्न करताना काही कबुली देतात. पोलिसांच्या दृष्टीने, ती आदर्श अटक असते.”

‘मग असे दिसते आहे, की तुम्ही दोन पहारेकरी आणि रक्षक कंपनीच्या दोन माणसांवर संशय घेत आहात. जॅमिसनने त्यासाठी गाडीभर लोक गोळा केले असणार.” कोल्टन उत्तरला, “तो कुणालाच घेणार नाही. मी त्याला ओळखतो. मी

काय बोलत होतो, यावर विचार करण्याचा प्रयत्न करण्यात तो उरलेला दिवस घालवेल. मग तो मुख्य कार्यालयाला फोन करेल आणि ते माणसे पाठवून, मिस रिचमॉन्डला कुणी फोन केला व मिसेस बोडेन कुठे आहे, हे त्यांना शोधायला लावतील.

थेम्स उदासीनतेने पण उद्दीपित होत बोलला, "थॉर्न, तिथे ती बाई आहे! तिने कपड्यांनी भरलेली बॅग ब्रुकलीनला तिच्या बहिणीकडे नेली. रोखे --- "

"तू हे विसरतोस, की कंपनीच्या माणसांनी तिला खोलीतून रिकाम्या हाताने बाहेर येतांना पाहिले. त्यांनी तिची तपासणीदेखील केली आणि एकाने तिला गाडीत ठेवले."

कोल्टन चौकसपणे हसला. "सिडने, हे पूर्णपणे एका माणसाचे काम होते. गुन्हेगाराच्या बारीकसारीक बाबतीत अगदी क्वचित केले जाणारे काम होते. हा गुन्हा साधा असला, तरी मला वाटते, त्याच्या बारीकसारीक तपशीलाकडे लक्ष देण्यासारखा होता. म्हणूनच मला त्यात रुची आहे."

थेम्स उद्गारला, "साधे आहे. तू असे बोलतो आहेस, जसे काही तुला गुन्हेगार कोण हे माहिती आहे."

"मला नक्की माहिती आहे. काल रात्रीच मला ते समजले आहे."

"काल रात्री?

"चोरी खात्रीपूर्वक, आज सकाळी लवकर झाली."

सिडनेच्या आवाजात बिचारी नवलाई होती. "का? का? तू त्याला पकडत का नाहीस? हे सर्व काय चालले आहे?"

"कारण माझे हसे होईल, म्हणून. माझ्याकडे अजून काही पुरावा नाही.

नेहमीचा गुन्हेगार संधी मिळाली, की त्यावर झडप घालतो व वेड्यावाकड्या पद्धतीने चोरी करून, ती वस्तू मिळवतो. सराईत नसलेला गुन्हेगार, प्रत्येक बारीकसारीक गोष्टीला महत्व देतो. ताठरपणे त्याच्या समस्या सोडवतो. आणि पैशांच्या व्यवहारातील अग्रगणी त्याचा विचार आधी करतो. तो अचानक, आक्रमकपणे खूप महिने आधी त्याचा बेत ठरवतो. सिडने, तू समजून घेतले पाहिजेस, पाच लक्ष हे काही महिन्यांचे काम आहे."

"पण संशय फक्त मिस रिचमॉन्ड, नॉरीस आणि मिसेस बोडेनवरच आहे."

समस्या सोडवणाऱ्याने सुधारणा केली, "संशय प्रत्येकाकडे जातो. अध्यक्ष मॉन्टरोझने त्याच्या अखत्यारीत असलेले सर्व काही करण्यासाठी, पण प्रसिद्धी टाळण्यासाठी पोलिसांना बोलवावे, असे तुम्हाला वाटत नाही का? नॉरीसला व त्याच्या बायकोला अटक करण्याची मध्यवर्ती कार्यालयातील माणसांची उत्सुकता तुम्हाला विचित्र वाटत नाही का? स्टीलसन इस्टेटवर काम करण्यासाठी नॉरीसला जादा वेळ बसावे लागले व त्यामुळे सिम्पसनला त्याचा अहवाल मिळून, ते काम करायला उशीर झाला, हा सिम्पसनचा कबुलीजबाब संशयपूर्ण वाटत नाही का? कपडे घेऊन येणाऱ्या मुलाचे श्रम वाचवण्यासाठी, मिस रिचमॉन्ड तिचे कपडे घेऊन स्वतः येत होती, ही तिची गोष्ट तिच्यासारख्या बाईसाठी पूर्णपणे अशक्य वाटते. नॉरीसने त्याच्या बायकोला रोख्यांबद्दल सांगितल्याचे काय? पाच लाख किमतीच्या रोख्यांचे व्यावसायिक नसलेले प्रकरण! पहाटेच्या गजराला उत्तर दिलेले दोघे काही गडबड नसल्याचे सांगतात, हे खात्रीपूर्वक खरे असेल का? मिसेस श्नायडर आजारी असल्याचे, दोघे पहारेकरी खोटे सांगत नसतील कशावरून व दोन आठवडे ते ओळखणाऱ्या बाईला बँकेच्या आत घ्यायचा, त्यांचा गुप्त बेत नसेल कशावरून?

चिठ्ठी नसलेली औषधांच्या गोळ्यांची डबी, तीन बिनकाट्याची पिसे आणि एरवी रिकाम्या असणाऱ्या खोलीतील क्षयरोगाने आजारी असलेल्या बाईच्या सर्जनचा कापूस तुम्हाला विचित्रपणे चक्रावून टाकत नाही का? या गुन्ह्यातील पुढील मुख्य बाब म्हणजे गुन्हेगाराने गुन्हा करण्याआधीच मला तो माहिती असणे, हे गुन्ह्याच्या दृष्टीने क्षुल्लक वाटत नाही का?" एवढे बोलून, तो मोठ्याने हसला.

"थॉर्न, तू महान स्कॉटीश आहेस." सिडने थेम्सचा आवाज शुद्ध नवलपूर्णतेत थांबत गेला.

"तू यात सगळ्यांना गुंतवले आहेस."

कोल्टनने त्याची सिगरेट रस्त्यात फेकत म्हटले, "ओहो, नाही. प्रत्येकला नाही. प्रहसनात्मक नृत्यनाट्यातील कमनशिबी नट लगेच रंगमंचावर अवतरेल, जेव्हा मी श्रीम्पला कामाला लावून जुन्या नटांची यादी करण्यात व्यस्त ठेवले, ती यादी मी सादर करेन."

## तीन

वरील छपरामुळे पूर्ण अंधारात असलेल्या वाचनालयात थॉर्नले कोल्टनने हळूवार शीळ घालत, मेंडेलसोहनच्या वसंत ऋतुच्या गाण्याच्या सुरावटींच्या मिश्रणाचे गीत त्याच्या कुशल बोटांनी, विशिष्ट कागदाच्या गाळण्यानी रिकाम्या बदकपीसावर बारीक पांढरी वाळू पसरत, वाजवले. छोटाश्या कापसाच्या काडीला थोडा कापूस गुंडाळला. दुहेरी पडद्याची सळसळ त्याच्या तीक्ष्ण कानांना ऐकू आली.

त्याने विचारले, "सिडने, तुला आज सकाळी बँकेकडून काही समजले का?"

न डगमगता थेम्स अंधारात शिरला. कोल्टनसाठी त्याला अंतर व पायऱ्यांचा अंदाज बांधायची सततची सवय असल्याने, त्याला अंधारातही आंधळ्या माणसाइतकाच आत्मविश्वास होता.

त्याने थोडक्यात उत्तर दिले, “नाही.” मग खूप काळच्या मैत्रीमुळे मोकळेपणे टीका करत, तो बोलला, “हा गुन्हा आहे. थॉर्न, त्या मुलीचा हट्टीपणे छळ होत असतांना तू निष्क्रिय रहाणे म्हणजे गुन्हा करणेच होते आणि --- “

कोल्टन विचारपूर्वक मध्येच बोलला, “मला वाटते, इतक्या ताणाखाली असलेल्या एका माणसासाठी ती काल रात्री खास गाईली.”

सुंदर मुलींसाठी सिडनेचे हृदय नेहमीच उचंबळत असे. तो बेदम उत्साहाने बोलला, “ते नवलपूर्ण होते. नवलपूर्ण!” समस्या सोडवणारा, हसत हसत बोलला, “अरे! अरे! हे लक्षात ठेव, की ती दुसऱ्या माणसाची बायको आहे!”

थेम्स पश्चात्तापदग्धतेणे बोलला, “अरे देवा, थॉर्न, तू हसू कसा शकतोस? त्या प्रश्न करणाऱ्या, नष्ट करायच्या लायकीच्या व प्रकरणावर अंधार पाडणाऱ्या दोन गुप्तहेर कुत्र्यांचा विचार कर! त्यांनी मिस रिचमॉन्डला दुपारी उशीरापर्यंत बँकेतून जाऊन का दिले नाही आणि नंतर जॅमिसनने तिच्याबरोबर जाण्याचा हट्ट धरला. बँक बंद होईपर्यंत त्याचा भागीदार तिथे घोटाळत बसला होता. कोल्टन हसून बोलला, “चूर्ण केलेल्या सल्फरचा काय उपयोग असतो, याचा शोध मी घेतो आहे. मला वाटते, त्यानीदेखील घ्यावा. मध्यवर्ती कार्यालयातील माणूस सोडून कुणीही मी सुचवल्याप्रमाणे, औषधाच्या दुकानात जाऊन शोध घेऊ शकले असते.”

मध्यवर्ती कार्यालयातील अजून दोन माणसांनी त्या बिचाऱ्या म्हाताऱ्या मिसेस श्नायडरला व दोन पहारेकऱ्यांनी, दोन पोलिसांना जोराने फरफटत आणले व मारपीट केली."

आणि अजून अर्धा डझन मिसेस बोडेनच्या मागे होते. आम्ही नंतर एखाद्या व्यक्तीच्या जीवनावरील छानपैकी नृत्यनाट्य व अश्लाघ्य कॅबरे बघत होतो. त्यासाठी ही बेकायदेशीर खोली होती. कालच्या अती प्रकाशाने माझे डोळे फार दुखू लागले."

अंधारात फोन खणखणल्याने थेम्सने उडी मारली. कोल्टनपासून कधीही दूर नसणाऱ्या छडीला ती हालचाल जाणवली.

त्याने विनंती केली, "सिडने, उत्तर दे."

सचिवाचे हात त्याच्या पायांइतके खात्रीशीर नव्हते. त्याला क्षणभर डगमगायला झाले.

जेव्हा त्याने नेहमीचा सलाम केला व क्षणभर ऐकले, तेव्हा तो धापा टाकू लागलाः

"थॉर्न, हा सिम्पसन आहे. त्याची बायको हरवली आहे. त्याला तू हवा आहेस."

त्याने अंधारात फोन पुढे केला. पण थॉर्नलेने तो घेण्यासाठी काही हालचाल केली नाही.

कोल्टन आळशीपणे म्हणाला, "त्याला सांग की एका तासाभरात मी खाली बँकेत येईन. मग मी त्याला भेटेन.

सिडनेने निरोप सांगितला. शांतता पसरली. "थॉर्न, तो भीतीने रानटी झाला आहे." थेम्सचा आवाज उद्दीपित होऊन कापत होता. "जेव्हा तो काल रात्री घरी

गेला, तेव्हा ती नाहीशी झाली होती. त्यांच्या इमारतीच्या दारावरील पहारेकरी म्हणाला, त्याला वाटले, की ती सकाळी थोडे चालायला बाहेर गेली.

सिम्पसन चोरीमुळे इतका उद्दीपित झाला होता, की त्याने ठरल्याप्रमाणे, दिवसाभरात तिला फोन केला नाही. त्याने अर्धी रात्र तिला शोधण्यात घालवली आणि डझनभर वेळा तुझ्याशी बोलायचा प्रयत्न केला. थॉर्न, ती मुकी व बहिरी व हरवलेली आहे, याचा विचार कर. यामुळे सिडने थेम्सला उदासीनतेचा झटका येणेच बाकी होते.

“त्याला सांग, की मी त्या चोरीचा विचार करतो आहे. त्याला सांग, की मी दोन केसचा एकत्र गोंधळ करत नाही. मी काही गुप्तहेर नाही. हरवलेल्या स्त्रीची केस माझ्यासाठी फारशी रुचीपूर्ण नाही. रोज शेकडो स्त्रिया हरवतात. मला रुची वाटणाऱ्या केस सोडवण्यातच मला आनंद वाटतो, पोलिसांच्या कामात नाही.” कोल्टनचा आवाज सहानुभूतीशून्य व कडक होता.

सिडनेला तो माहिती होता, कारण तो वापरणारा माणूस त्याला माहिती होता. त्याने परत निरोप सांगितला, सभ्य आवाजात माफी मागितली आणि सुस्कारा टाकत पुन्हा फोन हातात घेतला.

“थॉर्न, हे निर्दयतेचे आहे. त्या मुक्या व बहिऱ्या बाईचा विचार कर. या इथे हरवलेल्या --- “

कोल्टन जरा कडक आवाजात बोलला, “सिडने, कधीकधी तुझे विशिष्ट कारणाने त्यावर आघात होणारे हृदय दमून जाते. क्षणापूर्वी तू मला वाक्ताडन करत होतास, की मी इथे बसून आहे आणि बर्कले ट्रस्ट कंपनीतून पाच लाख किमतीचे रोखे चोरणाऱ्या माणसाच्या मागे धावत नाही म्हणून.”

“पण मिसेस नॉरीसला कुणाचीही मदत नाही.” असे म्हणून त्याने पंधरा मिनिटे वाद घातला. तेव्हा कोल्टन अंधारात शांतपणे हसत होता. त्याने अजून दोन पिसे पांढऱ्या चूर्णाने भरली आणि त्याच्या दोन टोकात कापसाचे बोळे कोंबले.

अचानक थेम्स थांबला कारण कोल्टनने फोन उचलला व तो एक क्रमांक देऊ लागला.

त्याने फोन जोडला गेल्यावर म्हटले, “हॅलो श्रीम्प, सगळे काही ठीक आहे?”

“व्यवसाय चांगला चालला आहे. तीन तास, नाही का?” छान. वेळेवर ये आणि आज्ञा पाळ. अच्छा!”

सिडनेने विचारले, “फी कुठे आहे? मी कालपासून त्याला पाहिले नाही.”

“त्याचा आवडता नायक, निक कार्टरचे उदाहरण समोर ठेवत, आता हा श्रीम्प खराखुरा गुप्तहेर झाला आहे.”

कोल्टनने त्याचे चमकणारे घड्याळ खिशात ठेवले, तीन पिसे उचलली व उठला. “सिडने, चल. आपण चालत बँकेत जाऊ.”

वाहनात बसून जाणे शक्य असतांना व आंधळया माणसाची चालायची नावड त्याला माहिती असल्याने, थेम्स उद्गारला, “चालत? गाडी कुठे आहे?”

कोल्टनने स्पष्ट केले, “जॉन आणि गाडी श्रीम्पला गुप्तहेराच्या कामगिरीत मदत करत आहेत आणि बर्कले ट्रस्ट कंपनी चालत वीस मिनिटाच्या अंतरावर आहे. त्याने स्पष्ट उत्तरे देण्यास नकार दिला. पण फालतू विषयांवर संभाषण चालू ठेवले. त्यामुळे आधीच उदास असलेला सचिव वेडा झाला.

कुणी बँकेत शिरल्याबरोबर, मध्यवर्ती कार्यालयातील माणसांवर आधीच्या दिवसाच्या प्रश्न विचारण्याचा, धमक्यांचा व त्रास दिला गेल्याचा परिणाम दिसत असे.

नोटांचा ढीग मोजतांना वयस्क रोखपालाचे हात थरथरत असत. मागील बाजूचे हिशेब सांभाळणारे रकमा लिहून त्या खोडत असत. ट्रस्ट आणि इस्टेट कारकुनांचा मुख्य थॉम्पसन त्याच्या पिंजऱ्यासारख्या खोलीत बसून, फारच दयनीय स्थितीत दिसत होता.

अध्यक्ष मॉन्टरोझच्या शेजारील टंकलेखकाची खुर्ची रिकामी होती, कारण स्टेनो बाई घरी डॉक्टरांच्या देखरेखीखाली होती. पन्नास वर्षांचे बर्कले ट्रस्ट कंपनीचे पारंपारिक, शांत व कंटाळलेले आयुष्य पाच लाख डॉलर्सच्या वादळाने ढवळून निघाले होते.

लॉकरच्या कार्यालयातील गटाचा तिसरा सचिव असलेल्या नॉरीससारख्यांची स्थिती जरा बरी होती. अध्यक्ष मॉन्टरोझचे त्याच्या थरथरत्या हातावर फारसे नियंत्रण नव्हते. त्याची दाढी कुरवाळत, नॉरीसचे डोळे आदल्या रात्रीचा झोपाळूपणा दाखवत होते. मिस रिचमॉन्ड शांत होती, पण ती नंतरच्या उदासीनतेच्या झटक्याची पूर्वसूचना होती. तिची आई मुसमुसून रडत होती. सिम्पसन फारच दमलेला दिसत होता आणि सिडने थेम्स त्रास असणाऱ्या दोन माणसासाठी सहानुभूतीचे शब्द पुटपुटत होता.

जॅमिसन व मध्यवर्ती कार्यालयातील माणूस त्याचे फसवे हसू पूर्णपणे संशय नसलेले करू शकत नव्हता. संरक्षक कंपनीची माणसे पूर्णपणे गोंधळलेली होती.

कोल्टनच्या आवाजात अथवा ओठांवर आता हास्य नव्हते. तो खूप शांत व थंडपणे नम्र होता. “तुम्हाला दोन पहारेकऱ्यांना बोलावणे पाठवायचे नाही का?”

वाईट स्वभावाचा जॅमिसन म्हणाला, “आपली माणसे त्यांच्यावर लक्ष ठेऊन आहेत.”

कोल्टन कडकपणे म्हणाला. “आभारी आहे. तुम्ही सगळे या टेबलाशी बसा. तुम्हाला मला एक गोष्ट सांगायची आहे.”

“आम्ही काही ऐकण्यासाठी आलो नाही --- “

सिम्पसन गुप्तहेराच्या मध्येच बोलला, “मिस्टर कोल्टन, कृपा करून थोडक्यात सांगा. माझी बायको --- “

कोल्टनच्या छडीने त्याला खात्री दिली. लांब टेबलाभोवती खुर्च्या होत्या आणि त्याच्या बोटांच्या टोकांना खिशातील त्याचे घड्याळ जाणवले.

सिम्पसनचा आवाज चिडवल्यासारखा उत्सुक झाला होता. त्याचे जड झालेल्या पापण्यांचे डोळे बारीक झाले. कोल्टनच्या फारशी रुची न घेण्याने थेम्स माणसाच्या नैसर्गिक पश्चात्तापाला दोष देऊ शकत नव्हता.

ते शांतपणे बसले. कोल्टन बंद दाराकडे तोंड करून बसला. टेबलापलीकडे सिम्पसन व नॉरीस होते. मिस रिचमॉन्ड व तिची आई शेवटी होत्या. चार गुप्तहेर समस्या सोडवणाऱ्यां च्या दोन्ही बाजूंना होते.

कोल्टनने त्याच्या व्यक्त करणाऱ्या आवाजात सुरवात केली, “ही जन्मजात गुन्हेगाराची गोष्ट आहे. त्याने प्रयत्न केला, तरीही तो प्रामाणिक राहू शकला नसता.” त्याचा एक हात त्याच्यासमोरील टेबलावर पडलेला होता आणि दुसरा पोकळ, बारीक छडी धरलेला हात गुडघ्यांवर होता. “तो नुसता मूर्ख म्हणून जन्मला नव्हता

तर त्याने लहान सहान चोऱ्या कुमारवयातच करायला सुरवात केली होती. तो खूप वर्षे प्रामाणिक माणूस होता. पण तेव्हा तो गुन्हेगारीचा मार्ग तयार करणारा आगळावेगळा गुन्हेगार होता. त्याला डोके होते. त्याला प्रामाणिक मनुष्य म्हणून नवलपूर्ण यश मिळू शकले असते पण तो सरळ नव्हता. त्याची प्रवृत्ती गुन्हेगारी होती. तो योग्य संधीची वाट बघत होता. पण त्याच्या स्वभावाची नीतिमान बाजू त्याच्या कह्यात नव्हती. त्याला पैशांची गरज होती आणि त्याच्यासारख्या जन्मजात लबाडाने बर्कले ट्रस्ट कंपनीत चोरीचा बेत आखायला सुरवात केली. ते फार कठीण नव्हते. कारण जुनी पारंपारिक संस्था असल्याने व तिथे काम करतांना लोक म्हातारे झाले असल्यामुळे, व्यक्तिगत बाजूने आधुनिक, नवीन लोक सतत येत जात असतात, तशा संस्थांसारखी ती नव्हती. बँकेतील किंमती मालाच्या रक्षणासाठी प्रस्थापित सुरक्षारक्षकांऐवजी साधे पहारेकरी नेमले गेले होते आणि जिथे साधा प्रामाणिकपण असतो, तिथे नेहमी हल्ला होण्याची भीती असतेच.

या गुन्ह्गाराने अनेक वर्षांपूर्वीच हल्ला करण्यायोग्य जागा हेरली. जेव्हा गुन्हा करायची वेळ आली, तेव्हा त्याला नेहमीप्रमाणे नशीबाने साथ दिली.” तो थांबला.

.बाहेरील दारावर हळू टकटक झाली. पण त्याच्या तीक्ष्ण कानांनी ती ऐकली.

“त्याला त्याबद्दल काही संशय नव्हता. कारण त्याने नकोसा, दुसऱ्यांवर संशय जाईल असा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम आखला होता. ही चोरी ही या मालिकेतील फक्त एक होती. त्याच्या लबाड मेंदूने अगणित लांबलचक बेत आखले होते. काही वर्षात बर्कले ट्रस्ट कंपनी लाखो डॉलर्सच्या घाट्यात गेली असती!”

त्याने टेबलावर जोराने मूठ आपटली. दार उघडले. आयरीश चेहऱ्याचा गाडीचालक व तरतरीत चेहऱ्याचा श्रीम्प यांच्यामध्ये, डोळे सुजलेला, झोकांड्या जाणारा, दाढी न केलेला प्राणी ---

शांततेत पिस्तुलाच्या ठो आवाजासारखा कोल्टनचा आवाज आला, "सिम्पसन, तुझी बायको तिथे आहे."

"अरे देवा थॉर्न, हा पुरुष आहे." सिडने थेम्सच्या आवाजात दुःख होते. तो प्रेम करत असलेल्या भावनाशील आंधळया माणसाने अशी चूक केलेली असणे शक्य होते.

"हो. पुरुष आहे. सिम्पसन, न हलता बस. चटपटीतपणे हालचाल करत कोल्टनच्या बोटांनी धमकी दिलेली बारीक छडी टाकली आणि निळी स्टीलची काठी आपोआप धरली. "किंवा एके काळी तो पुरुष होता." त्याचा आवाजाचा पोत धमकी दिल्यासारखा धोकादायक झाला. चार्ली, ड्रॉकी हा रंगभूमीवर नृत्यनाट्यात व प्रहसनात दुसऱ्याची हुबेहूब भूमिका करणाऱ्या प्रसिद्ध नट होता. सर्वात तरुण आणि रंगभूमीवर उत्तम स्त्रीभूमिका करणारी, फुफ्फुसाचा क्षयरोग झालेली, मिसेस बोडेन होती. हिने इतके उत्तम काम केले व सोळा हजार तीन रस्त्यावर रहाणाऱ्या तीन साध्यासुध्या लोकांची सहानुभूती मिळवली. सिम्पसनची बायको, लहानशी, मुकी व बहीऱ्री मुलगी मिसेस सिम्पसन, त्याला जास्त चांगले जीवन जगायला मदत करणाऱ्र होती."

चालकाला धक्का द्यायचा प्रयत्न करत, वेडीवाकडी हालचाल करत, एका माणसाची सावली किंचाळली. "ते मला जुनाट दुखण्यांवर उपचार करणाऱ्या शुद्ध हवेतील संस्थेत दाखल करणार असल्याचे म्हणाले होते. तुम्ही काय बोलत आहात,

ते मला समजत नाही. त्यांनी मला ठेऊन घेतले --- "त्याचे पूर्ण शरीर हुंदक्यांनी गदगदले.

कोल्टनचा रिकामा हात टेबलावरील टोकात कापसाचे बोळे कोंबलेल्या तीन पिसांवर पडला. "तू मला यासाठीचे सत्य सांगशील का?" स्वयंचलीत पिस्तूल एक इंचभरही हलले नाही.

"दयाळू देवा! हो! असामान्य शक्तीने त्याने मोठ्या आयरीश माणसापासून सुटका करून घेतली व भरभर टेबलाशी गेला. त्याच्या बोटांनी धक्का देत पीस ओढले, त्यातील टोकाचा कापूस काढला व डोके मागे टाकले ---

सिम्पसन विषारीपणे ओरडला "या नाट्यमयतेचा धिक्कार असो." पण हलला नाही. "देवा रे कोल्टन, मूर्ख, रानटी आणि कोकेनने नाक चोंदलेल्या मॉरीस व त्याच्या बायकोला वाचवण्यासाठी, तू माझ्यावर दबाव आणू शकणार नाहीस! त्याचा चेहरा जांभळा झाला होता आणि कपाळावरील नीला तटतटून फुगल्या होत्या. "मिसेस बोडेन!" तो रागाने बोलला, "तिला रोखे कसे मिळाले? ते आता कुठे आहेत? ते शोध." तो टेबलावर बसलेल्या कोल्टनकडे पाहून, आणि मध्यवर्ती कार्यालयातील त्याच्याजवळ उभ्या असलेल्या माणसांकडे पाहून, विजयाने हसला.

मोठी घाणेरड्या पाण्याची जड बादली घेऊन डगमगत, श्रीम्प आला, "कोल्टन, तू इथे आहेस तर! त्याने ती समस्या सोडवणाऱ्याच्या शेजारी ठेवली.

"सिम्पसन, रोखे इथे आहेत!" कोल्टनचा हात पाण्यात गेला आणि थेंब गळणाऱ्या, चकचकीत, काळ्या वस्तूबरोबर बाहेर आला. "हे बर्फाची रबरी बॅग असलेले पहीले पाकीट आहे!"

सिम्पसन रागाने किंचाळत ओरडला, "अरे राक्षसा!"

कोल्टनने स्वतःला न थांबवता व त्या दोन गुप्तहेरांवर शेवटचा रागीट शब्द उच्चारून, त्यांना आतापर्यंत न दिसलेले दाखवत म्हटले, ‘‘पोलिसांनो, तुमचा कैदी ताब्यात घ्या.’’

## चार

मोठ्या, जुन्या अवस्थेतील, घरातील सावली असलेल्या वाचनालयात ते आले, तेव्हा थॉर्नले कोल्टनने जाहीर केले, ‘‘अर्थात, ड्रॉकी, हा खऱ्या गुन्हेगाराचा फक्त ड्रगची चटक असलेले हत्यार होता. त्याने सांगितले असते, की रोखे कुठे आहेत. सिम्पसनकडे त्याच्यावर लक्ष ठेवायला वेळ होता. ते फसवे शब्द उच्चारण्यापूर्वी, त्याचा राग आवरत, मी केले तसे, रोखे शोधणे शक्य होते. मिस रिचमॉन्डला आलेल्या टेलीफोनवरील निरोपाशी त्याचा असलेला लागाबांधा, मॉरीसच्या नावावरील आरक्षण असलेली दोन व्यक्तींची आरक्षणे आणि खोटी मिसेस बोडेन कामाला बाहेर पडल्यावर, ड्रॉकी तिला भेटला, ती जागा पोलीस शोधू शकले असते. माझ्यासाठी ही माहिती जाणून घेणे काहीच महत्वाचे नव्हते, कारण शांततेच्या कीबोर्डने मला चोरी होण्याच्या आधीच गुन्हेगार कोण ते सांगितले होते.’’

सिडने थेम्सने कबूल केले, ‘‘मी नेहमीप्रमाणे गोंधळलेलो आहे.’’

‘‘रीगलमध्ये मी पहीला अंक पाहीला. सिम्पसनने मला त्यांच्या धीट राक्षसीपणाने काही हासील करायला उद्युक्त केले. तो पूर्णपणे धीट राक्षसीपणा नव्हता. पण तो पळून जायची तयारी करत होता. ती नाहीशी होण्याची वेळ येण्याआधी, तुमची सहानुभूती मिळवण्यासाठी व त्याने तो बदलला आहे हे दाखवण्यासाठी लग्न केलेल्या मुक्या बहीऱ्या बाईतील माझी रुची जागृत

करण्यासाठी, तो हे करत होता. निष्फळ शोधानंतर, त्याला रोख्यांसकट युरोपमधील लांब सुट्टीची गरज होती. अर्थात हे धक्क्यातून सावरण्यासाठी होते. त्याच्यावर काही संशय आला नसता. चांगल्या शहाण्या माणसाने फालतू विषयावरील संगीत नाटकातील क्षयाने व कोकेनच्या व्यसनाने मरू घातलेल्या, मुक्या, बहीऱ्या नटीचा शोध घेतला नसता. ड्रगची स्वप्ने पुरी करण्यासाठी पैसा आड येत होता. एकदा सिम्पसन देशाबाहेर गेला होता. ड्रॉकी रानटीपणे बोलला असता आणि रागाने गरागरा फिरुन कबुली दिली असती आणि ती कबुली कोकेनमुळे आलेला विसराळूपणा, म्हणून मान्यही केली गेली असती. सिम्पसन कधीच सरळपणे खेळला नव्हता. तो त्याचा स्वभाव नव्हता. मी त्याच्याशी हातमिळवणी केल्यापासून, मला तो जन्मजात गुन्हेगार म्हणूनच माहिती होता. कारण ज्योतिषी जसा चेहरा वाचतात, तसा मी हात वाचू शकत असे. मला हा फायदा होता, की सिम्पसनसारखी माणसे त्यांच्या जबर इच्छाशक्तीने त्यांच्या भावना डोळयांमागे व चेहऱ्यामागे लपवू शकतात. त्यामुळे कोणी त्यांचे मन वाचू शकत नाही. पण ते हाताच्या बाबतीत काही करू शकत नाहीत.”

थेम्सने अविश्वासाने विचारले, “म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का, की रिगलमध्ये त्याचे हात हातात घेऊन, तुला त्याचे बेत समजले?”

कोल्टन हसत बोलला, “अगदी तसेच नाही, पण तुला माहिती आहे, मी हातमिळवणी कशी करतो. माझे लांब बोट नेहमी शांततेच्या कीबोर्डवर --- मनगटावर हलकेच पडलेले असते. माझ्यासारखा हलका स्पर्श करून, मी ह्स्ताक्षरदेखील वाचू शकतो. अक्षरांचा कोऱ्या कागदावर उमटलेला ठसादेखील मी वाचू शकतो. लाखातील एका माणसालाही अशी देणगी मिळालेली नसेल. मला

वाटते, मिस रिचमॉन्डलाही ते जमते, कारण मी जेव्हा तिच्याशी हात मिळवले, तेव्हा मला तिच्यामध्ये प्रतिसाद देणारी उत्सुकता जाणवली.

सिम्पसनच्या बाबतीत त्याचे हृदय वाफेच्या इंजिनासारखे चालू असते. तू किंवा कुणीही डोळस माणूस त्याचा चेहरा व डोळे त्यावर बुरखा असल्याने वाचू शकणार नाहीत. त्याच्या हाताच्या नाडीवरील ठोक्यांनी मला सांगितले की त्याला काही प्रकारे उद्दीपित झाल्याने, फार कष्ट होत आहेत. जेव्हा मी त्याच्या बायकोबरोबर हातमिळवणी केली, तेव्हा मला का चे उत्तर मिळाले.

थेम्सने काही न समजल्याने विचारले, "का? कारण त्याची बायको पुरुष व ड्रग मित्र होती म्हणून?"

"तुझ्या हाताने तुला ते सांगितले आणि माझे डोळे फसले?"

"माझे शरीरशास्त्राविषयीचे ज्ञान मला ती पुरुष असल्याचे सांगून गेले. तुला हे माहिती नाही का, की स्त्रियांच्या स्नायुंवर त्यांना सुंदर बायकी वक्राकार देणारा चरबीचा थर असतो? पुरुषाचे स्नायु कातडीखाली लगेच असतात. स्त्रियांचे ढोंग करणाऱ्या पुरुषांचे स्नायु मासल असल्यामुळे त्यांना वक्राकार असतो, चरबीमुळे नव्हे. शिवाय माझ्या बोटांच्या टोकांनी 'बायको'ची कोकेनची नाडी तर ओळखलीच पण स्नायुंचा फसवेपणाही ओळखला. सिम्पसनची सोंगे बघता, तो विचारपूर्वक बेत आखून केलेला गुन्हा होता.

तिला काही समजण्यापूर्वी, मी अच्छा करायच्या बहाण्याने खुणा करून, तिला हात बाहेर काढायला लाऊन ते सिद्ध केले. ओठांनी उच्चारलेले शब्द वाचायची माझी सवय तुझ्या लक्षात आहे ना? सिम्पसन तिला बोलायची संधी देत नव्हता. कोकेनमुळे तिचे डोळे तेजस्वी दिसत होते व ओठांना फासकटलेली जादा

लाली तिला गावाकडील मुलगी दिसायला भाग पाडत होते. पुरुषी दाढीचा मागमूस राहू नये व ती गावाकडील मेकप करणे माहिती नसलेली पण कोकेनने त्वचा गुळगुळीत केलेली मुलगी वाटावी, असा त्याचा प्रयत्न होता. ज्यांनी तिला पाहीले, ते नक्की फसले असणार. पण भडक मेकपमुळे त्यांना संशय आला असणार.सिम्पसन खुबीदारपणे बारीकसारीक गोष्टींचा विचार करणारा होता.

सामान्यज्ञानाने मला सांगितले, की सिम्पसन कुणा अननुभवी व्यक्तीची मदत घेण्याचा धोका घेऊ शकत नाही. त्यामुळे मी श्रीम्पला अशी अभिनेत्री शोधायला लावली, जी खराब तब्येतीमुळे गेल्या दोन महिन्यात, त्या व्यवसायाच्या बाहेर पडली आहे. या सगळ्या नाटकाची खूप वेळा तालीम झाली असणार, कारण त्याशिवाय सिम्पसनला काही इलाज नव्हता. श्रीम्पच्या यादीत ड्रॉकी होता. काही फोन करून, मला समजले, की तो खरेच वाईट रीत्या कोकेनचा व्यसनाधीन होता आणि काल सकाळी तो पूर्वी रहायचा त्या जुनाट बोर्डींगपेक्षा बऱ्या नसलेल्या विश्रांती गृहातून परत आला होता. त्याला स्त्री करण्याची, ही सिम्पसनची योजना होती. सिम्पसन त्याला भेटायचा धोका घेणार नाही, हे मी शोधून काढल्यावर, जॉन आणि श्रीम्प यांनी त्याला ढोंग करायला लावले, की ते सिम्पसन कडून आले आहेत. कोकेनग्रस्त लोकांना दर तासाला ते लागते. श्रीम्पने त्याला बँकेत आणायच्या तीन तास आधी ड्रॉकीला ते मिळाले नव्हते. तो त्यासाठी वेडा झाला होता. तिसऱ्या रस्त्याला भेट आणि पट्टीचे कोकेन पिणारे त्यांच्या शरीरावर ते दिसणे लपवण्यासाठी, पिसे त्यांच्या हातात दिसणार नाहीत अशी ठेवतात. त्यांना कोकेनचे झुरके मारतांना कोणी बघू नये म्हणून मला त्यांना बोलके करावे लागले. तू पाहिलेस, की तो बेत कसा यशस्वी झाला.

“पण खोलीबाहेर त्याला मदत करणारे गुप्तहेर? रोखे खराब पाण्यात असल्याचा अंदाज तू कसा काय केलास?”

संरक्षक कंपनीच्या माणसांनी मला ते सांगितले. बिनडोळयांना जे समजले, ते त्यांनी डोळयांनी बघितले. पाण्याच्या पृष्ठभागावर बुडबुड्यांच्या स्वरूपात तरंगणारे साबणाचे पिवळे द्रावण! मला वाटते, त्यांच्यापैकी एकाने ते बघून सर्वांना सांगितले. फरशी धुण्यासाठी वापरला जाणारा पिवळा साबण कधीही तरंगत नाही, हा झटपट बुद्धीने कुणीही केलेला विचार असू शकतो.

सापडलेल्या सल्फरच्या चूर्णाने मला हुशारीची बर्फ पिशवीची युक्ती दाखवून दिली.

नेहमी पातळ रबराच्या बॅगा खोक्यात भरतात, तेव्हा एकमेकांना चिकटू नये म्हणून सल्फरचे चूर्ण औषधे बनवणाऱ्यांकडून वापरले जाते. अर्थात ड्रॉकी रोज रात्री ते त्याच्याबरोबर नेत असे व संधी शोधताना, थोडेसे चूर्ण आजूबाजूला गालीच्यावर उडत असणर. सहज होणारी गोष्ट म्हणजे, सुरक्षा लॉकर्स खालून ती झाडून घेणे, पण ते केले गेले नाही व मला तिचे राहिलेले कण माझ्या रुमालात गोळा करता आले. चोरीचा गजर वाजणे, हा अंतिम कळसाध्याय होता. मिसेस बोडेनचे निरागिसत्व सिद्ध करण्यासाठी तो दुवा जरुरीचा होता. सिम्पसनला अर्थात तो दुवा माहिती होता. ड्रॉकीने बहुधा त्याचे बूट काढले व रबराच्या बर्फपिशवीवर उभा राहिला व लॉकर उघडून, रोखे व सिम्पसनने बारकाईने वर्णन केलेले कागदपत्र काढले. मग ते जेव्हा बांधले गेले व लॉकर बंद केला गेला, तेव्हा चालतांना त्याचा तोल जाऊ लागल्यामुळे संरक्षक कंपनीची माणसे शपथपूर्वक सांगत आली, की खोलीमधून काही घेतले गेले नाही. जेव्हा इमारत सोडायची वेळ आली, तेव्हा भरलेली बादली तळघराच्या लांब अंधारी कोपऱ्यात जिथे घाणेरडे पाणी व जमीन पुसायची फडकी

ठेवली जात, तिथे ठेवण्यात आली. रोखे त्याच्या ताब्यात घ्यायला सिम्पसन तयार होईपर्यंत, ते सुरक्षित होते. म्हणूनच मी जॅमिसन व त्याच्या भागीदाराला बँकेच्या आसपास ठेवले होते. मला सिम्पसनला सावधान होण्याची संधी द्यायची नव्हती.

अर्थात गोंधळून, रागावलेल्या अध्यक्ष मॉन्टरोझला पोलीसला फोन करायची सूचना त्यानेच दिली. कारण त्याला खात्री होती, की तो मला फसवू शकेल. तो मूर्खासारखा धोका घेणार नव्हता. त्याला मध्यवर्ती कार्यालयाच्या लोकांना जास्तीत जास्त गोंधळात टाकायचे होते. नॉरीस व त्याच्या बायकोवर संशय येऊ नये म्हणून, तो गर्विष्ठपणे काळजी घेत होता. ज्या प्रकारे तो इकडे तिकडे बोलत व पहात होता, ते इतर बरीसारीक तपशीलाशी मिळतेजुळते होते. मला वाटते, आज सकाळी, त्याच्या लक्षात येऊ लागले, की मी काय करतो आहे. पण आता माझ्यावर भरवसा ठेऊन फसले जाण्याशिवाय, त्याला काहीच करण्यासारखे उरले नव्हते. मी त्याला चांगलाच धक्का देणार होतो.”

खूप मिनिटे दोन माणसे गुपचूप सिगरेट ओढत होती.

शेवटी सिडनेने विचारले, “पण तू चोरी होण्यावजी कुणाला ताकीद का दिली नाहीस?

कोल्टनच्या बोलक्या ओठांवर, फसवे हसू आले. “सिडने, तू चिकट तुपात पडलेली माशी दाखवण्याचा अट्टाहास करतो आहेस. खरे तर मला डुलकी घेतांना पकडले गेले. पण माझा अंदाज आहे, मी झोपलो नव्हतो. समाजाच्या सुरक्षेसाठी तुरुंग बांधले जातात आणि सिम्पसन हजारात असा एक माणूस आहे, की ज्याच्यापासून समाजाला संरक्षणाची गरज आहे.”

जीवनातील अनेक टप्प्यांवर पासपोर्ट मिळवून देण्याचे काम करणाऱ्या त्याच्यासारख्या वर्तमानपत्रातील माणसाला गुप्तहेरगिरी करायला विशिष्ट प्रकारच्या काल्पनिक चारित्र्याचा माणूस असणे जरुरीचे असते. कधीकधी त्याला 'तोतया गुन्हे अन्वेषक' म्हणून ओळखले जाते.

# Leg Man

# लेगमन

## Erie Stanley Gardner

## एरी स्टॅन्ले गार्डनर



मे डीव्हर्स पत्र घेऊन माझ्या कार्यालयात आली. ती क्षणभर माझ्या खुर्चीशेजारी उभी राहीली, पाकीटे माझ्या टेबलावर ठेवली. शाईची दौत नीट ठेवण्यासाठी, कागदांचे वजन करण्यासाठी व थोडाफार पसारा आवरण्यासाठी ती थांबली.

तिच्या कंबरेभोवती चामड्याचा पट्टा होता आणि त्याखाली आजूबाजूला फिरणाऱ्या तिच्या डौलदार आकृतीच्या स्नायुंची हालचाल दिसत होती. मी तिच्या पट्ट्याभोवती हात टाकून तिला माझ्याजवळ ओढू लागलो.

माझा हात, फार जोराने नव्हे, पण दूर करत, ती म्हणाली, "अंगसटीला येऊ नकोस. ऐक. मला काम आहे. पेटे, मला सोड."

मी तिला म्हणालो, "तुझ्या हसऱ्या डोळ्यांकडून काही वसूल करण्यासाठी मी तुला धरले आहे."

अचानक ती वाकली. तिच्या ओठांनी माझ्या ओठांवर उष्ण चंबू केला --- आणि प्रेमळ चुंबन घेतले. दारावर टकटक न करता आत यायला बोनिफेसला तोच मुहूर्त सापडला.

मे ने दाराची करकर ऐकली आणि खणातून कागदांचा गठ्ठा काढला. मी माझ्या केसातून बोटे फिरवू लागलो आणि बोनिफेसने व्यावसायिक पद्धतीने त्याचा घसा खाकरला.

माझ्या तोंडाला लिपस्टिक लागली होती की काय, याची मला खात्री नव्हती. म्हणून मी माझे कोपर टेबलावर ठेऊन हाताच्या बोटांनी तोंड झाकले. मी लक्षपूर्वक कायद्याच्या उघड्या पुस्तकाकडे पाहू लागलो.

मे डीव्हर्स बोलली, "मिस्टर वेनिक, छान! ते पत्रात येईल असे मी बघेन." व दाराकडे निघून गेली. ती बोनिफेसच्या अंगावरून जातांना, तिने जणू "अरे लबाडा, आता काय करायचे, ते तू बघ." असे म्हणणारा एक खोडकर कटाक्ष माझ्याकडे टाकला.

बोनिफेसने कडकपणे माझ्याकडे बघितले. त्याचे निळसर पांढऱ्या बुबुळांचे पिवळसर डोळे बघून मला खूप उकळलेल्या व सोलून उभ्या कापलेल्या अंड्यांची आठवण झाली. तो वाईट विनोद करायच्या मनस्थितीत होता.

त्याने विचारले, "काय गोंधळ चालला होता?"

“गोंधळ? कुठे काय?” मी डोळे उंचावत, पण माझा हात तोंडावर ठेवत विचारले.

तो बोलला, “इथे आत.”

मे डीव्हर्स दार लावत होती. मी खूप सभ्यपणे विचारले, “मिस डीव्हर्स, तुम्ही काही ऐकले का?

ती शांतपणे म्हणाली, “नाही सर.” आणि बाहेर सटकली.

मी टेबलावरील उघड्या कायद्याच्या पुस्तकात तोंड घालून हसलो. “पहिल्या वर्गाने सामान पाठवणे व दुसऱ्या वर्गाने सामान पाठवणे यात मला फारसा फरक दिसत नाही.”

त्यामुळे बोनिफेस थोडासा शांत झाला. कोणीच जराही लक्ष देत नसणाऱ्या शैक्षणिक कायदेशीर बाबींचे विश्लेषण करायला त्याला आवडे.

तो म्हणे, “जर नावांच्या बाबतीत फार गोंधळ केला नाही, तर त्यातील फरक, त्यामानाने साधा सोपा आहे. लक्ष देण्याची प्राथमिक गोष्ट म्हणजे पाठवायच्या सामानाचे वर्गीकरण करण्याची पद्धत.”

माझ्या आवाजाला हातामागे उब देत, मी बोललो, “हो सर.”

बोनिफेस माझ्याकडे रोखून बघत बोलला, “वेनिक, या कंपनीबरोबर तुझे संबंध काहीसे विचित्र आहेत. तू कायद्याचा अभ्यास करतो आहेस. तू शोध घेणे अपेक्षित आहे. आधुनिक समाजमान्य कायद्याचे कारकुनी काम आणि गुप्तहेर यामध्ये तू लटपटतो आहेस. तरीही, हे सहज घडते, की आयकराची तपासणी करतांना, मला असे आढळते, की गेल्या तीन महिन्यात तुला जो पगार दिला गेला तो बघता, तुझा पगार वर्षाला साधारण पंधरा हजार डॉलर्स होतो.”

यात बोलण्यासारखे काही नसल्याने मी गप्प होतो. मे डीव्हर्स दार उघडून आत येत बोलली, “मिस्टर वेनिक, मिस्टर जोनाथनना तुम्हाला लगेच भेटायचे आहे.”

जसे काही टोकेरी नखांनी भारलेला असल्यासारख्या मी खुर्चीतून उठलो व म्हणालो, “मी ताबडतोब येतो आहे. मिस्टर बोनिफेस मला माफ करा.”

मे डीव्हर्स दारात उभी होती. तिने मला सामान्य कार्यालयांकडे जाण्याचा मार्ग दाखवला. मी रुमालाने माझ्या चेहऱ्याला लागलेली लिपस्टिक पुसत असतांना ती माझ्याकडे बघून हसत, म्हणाली, “ही तुझी खेळण्याची शिक्षा आहे.”

मला काही बोलायला वेळ नव्हता. जेव्हा वयस्क जोनाथनने मला लगेच भेटण्याविषयी निरोप पाठवला, तेव्हा त्याला मला लगेच भेटायचे होते. सेड्रिक बोनिफेस माझ्यामागोमाग कार्यालयाच्या दारापर्यंत आला आणि जणू विषय पुढे वाढवण्यासाठी, जोनाथनच्या कार्यालयाची पवित्रता भंग करावी की नाही, या बाबतीत जणू स्वतःशीच वाद घालत असल्यासारखा, पॅसेजमधून येऊ लागला. कोल्ह्याच्या पुढे दोन उड्या मारून बिळात शिरणाऱ्या सशासारखा मी जोनाथनच्या खासगी कार्यालयात डोकावलो.

आज सकाळी वयस्क जोनाथन नेहमीपेक्षा वाईट दिसत होता. त्याचा चेहरा स्निग्धांश नसलेल्या दुधासारखा दिसत होता.

त्याच्या दमलेल्या डोळयांखाली माझ्या मुठीएवढ्या मोठ्या वळकट्या होत्या. आंबट लिंबूरसातून काढल्याप्रमाणे त्याचा चेहरा रागीट सुरकुत्यांनी भरलेला दिसत होता.

तो बोलला, “वेनिक, दार लाऊन घे.”

मी दार लावले.

“बस.”

मी बसलो.

तो बोलला, “वेनिक, आपण राक्षसाच्या गुहेत आहोत.” मी तो पुढे बोलण्याची वाट बघत बसलो होतो.

तो म्हणाला, त्याच्या मिळकत करातील विधानात प्रश्न उभे राहिले आहेत.

काही विचार न करता, मी मिस्टर बोनिफेसना तो मुद्दा टिपून घ्यायला सांगितला. त्यामुळे त्याला मिळकत कराच्या परताव्याबाबत सल्ला घ्यावा लागला आणि गेल्या तीन महिन्यात तुम्ही किती कर भरला आहे, हेदेखील बघावे लागले.

मी म्हणालो, “तो मला असे सांगत होता.”

जोनाथन म्हणाला, “ हे लाजलावणे आहे. मला यात बोनिफेसचा सहभाग हवा आहे. कॉलेज प्राध्यापकापेक्षा तो शैक्षणिक कायदेशीर बाबी जास्त चांगल्या प्रकारे वापरू शकतो. अडचणींमध्ये मी त्याला वापरतो आहे, हे त्या मूग गिळून बसणाऱ्याला अजिबात समजत नाही. तो बघत असलेल्या केसेस स्वच्छ करण्यासाठी तू वापरत असलेल्या जास्त सुंदर व नाटकी पद्धतीने --- त्याचा कोणीही कधी संशय घेणार नाही.”

मी शेवटी कबूल केले, “हो, कायद्याचा ज्ञानकोष जणू त्याच्या तोंडातून तो वदत असतो.”

जोनाथन म्हणाला, “आपल्याला काही करून त्यावर काम करावे लागेल. जर त्याने तुला काही प्रश्न विचारले, तर तू त्याला त्याची माझ्याबरोबर चर्चा करायला सांग. वेनिक, तुझ्या चेहऱ्याच्या कोपऱ्यात तो लिपस्टिकचा डाग आहे का?”

आपोआप माझा हातरुमाल खिशातून निघून माझ्या चेहऱ्याच्या कोपऱ्यात गेला. मी बोललो, “नाही, सर. काही लाल रंग लागला असेल. मी त्या लाल पेनाने कागदावर खुणा करत होतो आणि --- ”

जोनाथनचे डोळे हातरुमालावर पडलेले पाहील्यावर मी थांबलो. ती लाल चिकट खूण होती. आता मागे हटून काही उपयोग नव्हता. मी हातरुमाल परत माझ्या खिशात टाकला व म्हणालो, “जाऊदे, हो. ती लिपस्टिक आहे.”

तो कोरडेपणे बोलला, “मला वाटते, मिस डीव्हर्सची.”

मी काही बोललो नाही.

तो म्हणाला, “मला भीती आहे, की तिची नोकरी आम्हाला संपवावी लागेल. मी तिला नोकरीत घेतले, मला वाटते, ती जरा जास्तच --- आकर्षक बाई आहे. तरीही नोकरी देणाऱ्या कंपनीने तिची इतकी जोरदार शिफारस केली होती, की - “

मी म्हणालो, “ठीक आहे. तुम्ही तिला काढून टाका.”

“तुला काही वाटणार नाही?”

मी त्याला बोललो, “नक्कीच नाही. मला व तिलाही दुसरीकडे कुठेही नोकरी मिळेल.”

तो म्हणाला, “वेनिक, एक मिनिट थांब. माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नकोस. जर तू त्या बाईला एकटे सोडायला शिकलास, तर मला तुझे काम चांगलेच पसंत आहे.”

मी ठरवले, की मी त्याला खूप त्रास देऊ शकतो. मी म्हणालो, “ऐक, तुला वाटते बायका म्हणजे विष आहेत. मला त्या खूप रुचीपूर्ण वाटतात. ही अफवा खरी आहे का, हे मी तुला विचारणार नाही की तू एकाच वेळी दोन बायकांना पोटगी

देतोस! मला हे विचारायचा व काही कारण नसतांना तुझ्या खासगी जीवनात डोकावण्याचा काही अधिकार नाही. मी इथे बसून माझ्या प्रेमाविषयी बोलणार नाही. अरे बाबा, असे बोलणे हा तुझ्या अखत्यारीतील विषय नाही, हे मी पूर्णपणे जाणतो.”

त्याची लांब, हडकुळी बोटे एकावर एक अशी अस्वस्थपणे मागेपुढे हलू लागली व त्याने हाताच्या मुठी घट्ट बंद करून ठेवल्या. मग त्याने एकेक करून त्याच्या बोटांचा तळहाताला जोडणारा भाग मोडायला सुरवात केली.

बऱ्याच वेळाने तो म्हणाला, “वेनिक, मला तुझ्या भविष्याबद्दल खूप आशा आहेत. तुला क्षणिक शारीरिक सुखाचा चाबूक ओढतांना बघून, मला तुझा द्वेष वाटतो.”

मी त्याला म्हटले, “ठीक आहे. मी असे वागणार नाही.”

त्याने त्याची दहा बोटे मोडणे संपवले आणि उदासीनतेने मान हलवली. तो बोलला, “वेनिक, पुढील आयुष्यात तुला याचा उपयोग होईल.”

“पुढे काय होईल, याचे मला काही सोयरसुतक नाही. मला थोडे अंतर जोरात धावायला आवडते.”

त्याने सुस्कारा टाकला. त्याची बोटे सोडवली आणि कामाला लागला. “वेनिक, मी याबद्दल बोलतो आहे, कारण मला तुला बाहेर एका केससाठी पाठवायचे आहे, ज्यात एक फार आकर्षक बाई आहे. मला दुःखाने असे म्हणणे भाग पडू नये, की ती खूप महत्वाची, रसरशीत आणि ---वळणदार व उत्तेजक बाई आहे.”

मी विचारले, “ती कोण आहे?”

“तिचे नाव पेम्बरटन आहे. कल्व्हेरटन येथील तिचा नवरा हार्वे पेम्बरटन याच्या बास आणि पेम्बरटन ब्रोकर्स कंपनीमधील मिसेस ऑलिव्ह पेम्बरटन.”

मी विचारले, “तिला काय हवे आहे?”

“तिच्या नवऱ्याला फसवले गेले आहे.”

“कशा प्रकारची फसवणूक?”

“त्याने त्याचे डोळे ताकीद देत माझ्यावर रोखले. “पेटे, आनंदी फसवणूक.”

“ती बाई कोण आहे?”

वयस्क जोनाथनने एका ताकीदपत्राचा सल्ला घेतला. तिचे नाव डायना लॉक आहे आणि तिचे केस लाल आहेत.”

“मी काय करायचे आहे?”

“तू काही उपायाने, तिच्यात बंदुक खुपसायची आहेस. वरवर पाहता, तिच्याकडे पेम्बरटनविरुद्ध लोखंडी म्यान असलेली केस आहे. मी बोनिफेसला सुरवातीला कामाला लावतो. तो काही कायदेशीर तांत्रिक बाजू काढून, बचाव करायचा प्रयत्न करेल. पण तू तिच्यात  बंदूक खुपसून, वरचढ ठरून, त्याला मागे टाक.”

मी विचारले, “लाल केसांच्या बाईने केस केली आहे का?”

जोनाथन बोलला, “अजून नाही. ती आता सुसंवादी अवस्थेत आहे. तिने आता दोऱ्या घट्ट करत आणल्या आहेत आणि ही दुसरी बाई तिच्या नवऱ्याला धमक्या देऊन त्याच्या खिशातील डायरी हिसकावून घेणार नाही, असे बघण्यासाठी, मिसेस पेम्बरटनने आपल्याला नेमले आहे. तर तुला पेम्बरटन घरात रहायचे आहे.

मिस्टर पेम्बरटनना माहिती नाही, की त्यांची बायको शहाणपणे हे थांबवायचा प्रयत्न करते आहे.”

मी विचारले, “पण मी माझे तेथील वास्तव्य मिस्टर पेम्बरटनना कसे काय समजाऊन सांगू?”

जोनाथन बोलला, “तुला मिसेस पेम्बरटनचा भाऊ बनायचे आहे. ते तू कसे जमवशील? मिसेस पेम्बरटनचा भाऊ पश्चिमेकडे रहातो. तिच्या नवऱ्याने त्याला कधीच पाहिलेले नाही. चांगल्या नशीबाने, त्याचे नावही पीटर आहे. त्यामुळे तुला काही अडचण येणार नाही.”

मी विचारले, “समजा, मी घरात असतांना खरा भाऊ आला तर?”

जोनाथन बोलला, “तुला एवढेच करायचे आहे, की तुला आज संध्याकाळी साडेसातला त्यांच्या दाराशी जायचे आहे. ती तुझ्या घंटीसाठी थांबलेली असेल. ती दार उघडेल व गरज असलेले सर्व नाटक करेल. तू कोटाच्या कॉलर खालील डाव्या भागात, लाल गुलाबाचे फूल लावायचे आहे, म्हणजे काही चूक होणार नाही. तिचे लग्नाआधीचे नाव क्रो आहे. तू पीटर क्रो असशील. तो सतत इकडे तिकडे फिरणारा व फारसे काही पैसे न मिळवणारा आहे. तिच्या नवऱ्याला तुझ्याबद्दल सर्व काही ऐकून माहिती आहे.”

मी विचारले, “त्याने कधी माझे चित्र वा फोटो बघितलेला नाही का?”

जोनाथन बोलला, “बहुधा नाही.”

मी संशयाने बोललो, “हे मला एखाद्या झाडासारखे वाटते आहे.”

“मी खात्रीपूर्वक सांगतो, की सर्व काही ठीक होईल. मी महत्वाच्या मध्यस्थाची भूमिका निभावतो आहे.”

मी त्याला म्हटले, “ठीक आहे. मी माझ्या मोहिमेवर निघतो.”

मी दारावर हात ठेवल्यावर त्याने हाक मारत म्हटले, “पेटे”

“काय?”

त्याने खडसावले, “तू शहाणपणे वागशील.”

मी वळून त्याला अच्छा केला. “मी खात्री देतो की मी तसा वागेन. पण मला शंका आहे.” आणि मी माझ्यामागे दार लावले.

मी माझ्या मनगटावरील घड्याळात पाहीले. मला जायला तीन मिनिटे होती. मी कोटाच्या कॉलरखालील डाव्या भागात, लाल गुलाबाचे फूल लावले. मी आधीच घर शोधून काढले होते. हे मोठे रेंगाळणारे प्रकरण होते. ते उपनगरातील श्रीमंती दाखवत होते. मी असा अंदाज केला की बास आणि पेम्बरटन कंपनीचे उत्पन्न वरच्या थरातील असणार.

मी माझ्या जाकीटाखालील कपडे नीट केले. कॉलरमधील टायची गाठ नीट बसवली आणि बरोबर साडेसातला घराच्या पुढील पायऱ्या चढून गेलो. घंटी वाजवली. मला पॅसेजमध्ये पुरुषी पाऊले वाजलेली ऐकू आली. हे जोनाथनने सांगितलेल्या वर्णनाशी जुळणारे नव्हते. क्षणभर मी नवल करत राहिलो, की केलेल्या बेतात काही त्रुटी असाव्या की काय आणि मला नवऱ्याला तोंड द्यावे लागणार. दार उघडले. त्या उभ्या असलेल्या माणसाच्या वाईट चेहऱ्याकडे मी पाहिले आणि ओळखले की तो स्वयंपाकी होता. जज्जने खुन्याकडे पहावे, तसे तो माझ्याकडे पहात होता. मी उच्च पट्टीतील बायकी आवाज असलेली, काळ्याभोर केसांची व धुळकट ऑलीव्हसारख्या कांतीची व चारचौघांसारखी आकृती असलेली एक बाई

उडतउडत पाहीली आणि तिने एक आनंदाची आरोळी मारत, तिचे हात माझ्या गळयात टाकले.

ती किंचाळली, "पेटे! ओहो पेटे, माझ्या आवडत्या! जर तू कधी माझ्याकडे आलास, तर तू मला नक्की मदत करशील.

स्वयंपाकी मागे सरकून खोकला. त्या बाईने मला मिठी मारली. ती मोठ्या आनंदाने खुषीत येऊन खालीवर उड्या मारत होती. मग ती बोलली, "मला तुझ्याकडे पाहू दे." ती मागे सरकली. तिचे हात माझ्या खांद्यांवर ठेवले. तिचे डोळे माझा शोध घेत होते.

येथपर्यंत सगळे नाटक करून झाले, पण बाकीच्यांचे काय? मी तिच्या डोळयात संमती बघितली. मी स्तुती करण्यायोग्य व्यक्ती असल्याचे आणि मी नक्की जिंकणार असल्याचे भाव चेहऱ्यावर आणत, तिने तिचे डोके मला चुंबन घेण्यासाठी वळवून ओठ पुढे केले.

जोनाथनने मला काळजी घ्यायला का सांगितले, ते मला समजत नव्हते. मी स्वयंपाक्याला जास्त जोरात खोकताना ऐकले. मला वाटते, तिला भाऊ आहे, हे त्याला माहिती नसावे. मी तिला पुढाकार घेऊन दिला. तिने तो मोठ्या रुबाबात घेतला. मी एक निःश्वास सोडला. एक घट्ट जाकीट घातलेला बुटका मनुष्य माझ्याकडे तपकिरी नवलपूर्ण डोळ्यांनी बघत होता.

त्याच्या मागे त्याच्याहून पंधरा वर्षांने मोठा, एके काळी लाल केस असलेला व आता कानांमागे केसांच्या बटा लोंबणारा माणूस होता. त्याच्या इतर

डोक्यावर टक्कल होते. त्याचे तोंड घोड्यासारखे होते. काळाने त्याच्यावर अंमल गाजवला होता. तो चारित्र्य दाखवणारा चेहरा होता.

मिसेस पेम्बरटन म्हणाली, “पेटे, तू माझ्या नवऱ्याला कधीच भेटला नाहीस.”

तो जाडा माणूस पुढे आला आणि मी माझा हात बाहेर काढला. मी म्हणालो, ‘छान, छान, म्हणजे हा हार्वे आहे तर! हार्वे, तू कसा आहेस?”

ती म्हणाली, “आणि हा मिस्टर बास माझ्या नवऱ्याचा भागीदार.”

त्या उंच माणसाबरोबर मी हात मिळवले. “पेटे क्रो, माझ्या मानलेल्या भावा.”

मिसेस पेम्बरटनने निरीक्षण करत विचारले, “पेटे, तुझे सामान कुठे आहे?”

मी तिला बोललो, “मी ते स्टेशनवर ठेवले आहे.”

ती खिन्नपणे हसली व म्हणाली, “काही न कळवता येणे हा तुझा स्वभावच आहे. आपण गाडीतून जाऊ व तुझे सामान आणू.”

मी विचारले, “माझ्यासाठी इथे खोली आहे का?”

ती उद्गारली, आहे. मी तुझी वाटच बघत होते. हार्वे त्याच्या कामांमध्ये आणि इतर बेकार गोष्टींमध्ये इतका गर्क असतो की अलीकडे मला त्याला भेटायला सुद्धा मिळत नाही. तुला देवानेच पाठवले असावे.”

हार्वेने त्याचा हात त्याच्या बायकोच्या कंबरेभोवती टाकला. तो बोलला, “अग, अग, छोट्याशा स्त्रिये, हे फार काळ चालणार नाही. मग आपण सुट्टीवर जाऊ. आपण बोटीत रहायचा प्रवास करू. दक्षिणेकडील समुद्र त्यासाठी कसे राहतील?”

तिने विचारले, “हे मी वचन समजू का?”

त्याने तिला इतके मनापासून धरले, की मला ते खोटेच वाटले.

ती त्रासिक लाडाने बोलली, “तू मला पूर्वीही वचने दिलेली आहेस. पण नेहमी व्यवसायातील काही मध्ये येते.”

“यावेळेस तसे काही होणार नाही. दुसऱ्या कुठल्या कामात आतासारखे अडकण्यापूर्वी, मी माझा व्यवसाय विकून सुद्धा टाकेन.”

मी त्याला त्याच्या भागीदाराकडे मुद्दाम बघतांना पाहिले.

मिसेस पेम्बरटनने मला समजावले, “आमची जेवणे आताच झाली आणि मिस्टर बास व माझा नवरा परत त्यांच्या जुन्या नेहमीच्या कार्यालयात जात आहेत. आपण आता जाऊन तुझे सामान आणले तर?”

मी तिला पुढाकार घ्यायला लावून म्हणालो, “तू म्हणशील तसे.”

ती मला बोलावत म्हणाली, “चल तर मग. हार्वेची गाडी बाहेरील बाजूस, समोर आहे. माझी गॅरेजमध्ये आहे. ओहो, माझ्या प्रिय, आपण जाऊन ती बाहेर काढू. मी तुला बघून इतकी खूश झाले आहे.” एवढे बोलून ती दुसरीकडे गेली.

हार्वे पेम्बरटनने मला एखाद्या पालकासारखे हसून दाखवले. “पेटे, ऑलिव्हने मला तुझ्याबद्दल बरेच काही सांगितले आहे. मी लवकरच तुझ्याशी बोलेन.”

बासने खिशातून सिगरेट काढली व विचारले, “मेक्सीकोमध्ये जनावरांची शिकार करण्याचा खेळ खेळणारा तोच हा का?

मिसेस पेम्बरटन उत्तरली, “तोच तो.”

बास बोलला, “अरे तरुण माणसा, एकदा आपण भरपूर गप्पा मारू. मी शाळेतून बाहेर पडल्यावर, जंगलाचा रक्षक होतो. मी वरील सेस्पेमध्ये, पाइनच्या डोंगरांवर कामाला होतो. मला वाटते, तुला तो भाग माहिती असावा.”

मी म्हणालो, “मी तिथे खूप फिरलो आहे.”

त्याने मान हलवली. “मी तिथे रक्षक म्हणून तीन वर्षे काम केले. चल हार्वे, आपण जाऊन त्या आकड्यांवर काम करू.”

ऑलिव्ह पेम्बरटन माझा हात पकडत व मला कडेच्या रस्त्याने बाहेर काढत, म्हणाला, “आम्ही मागील रस्त्याने जातो. ती “लवकर चल.” ती बोलली व पुढे गॅरेजच्या रस्त्याला नाहीशी झाली. कार्यालयात त्यांची परिषद आहे आणि मला ती कशाबद्दल आहे, ते ऐकायचे आहे.”

तिने गॅरेजचे दार उघडले. मी तिला गाडीत बसायला मदत केली. तिने हसून माझे आभार मानले. तिचा स्कर्ट गुडघ्यांपर्यंत ओढत, ती म्हणाली, “मी गाडी चालवते, तेव्हा मला माझे पाय मोकळे असलेले आवडतात.

तिचे पाय सुंदर होते.

मी तिच्याशेजारी बसलो. तिने मोटार सुरु केली. त्या गावंढ्या गावातून आम्ही सुसाट बाहेर पडलो. आमची गाडी रस्त्याला लागली, तेव्हा बास व तिचा नवरा गाडीत नुकतेच बसत होते.

गाडी वेगाने निघाली व हवेत जणू उडू लागली. मी बावचळून गेलो. तिने चक्र फिरवल्यावर, मी मोठी किंचाळी ऐकली. ती नवऱ्याला हात करत होती. नंतर ती रस्त्याने निघाली.

मी विचारले, “तू नेहमी अशीच गाडी चालवतेस का?”

ती म्हणाली, “बरेच वेळा. आणि काही वेळा तर मी याहूनही जलद गतीने जाते.”

मी म्हटले, “त्यामुळे तुला पाय मोकळे लागतात, याचे काही नवल नाही.

तिने खाली तिच्या पायांकडे पाहिले. मग तिने तिचे डोळे परत रस्त्याकडे वळवले. तिने स्पष्ट केले, “मला त्यांना तिथे मागे टाकायचे आहे. मी पहारेकऱ्याचे मन वळवले आहे आणि त्यांच्यापुढे माझे कार्यालय आहे. तिने रागाने अजून वेग

वाढवला. ती कडेला लांब बघत बोलली, “मी अशी आशा करते, की मी तुला स्वागत करून घाबरवले नाही. तुला माहिती आहे, मला मोकळेपणे व मित्रत्वाने वागावे लागते.”

मी तिला सांगितले, “मला मोकळेपणा आवडतो. त्यामुळे, तो माणूस तुमचा होतो.”

तिने तिच्या मोटार चालवण्याकडे लक्ष दिले. त्यासाठी लक्ष देण्याची खरेच गरज होती.

ती शहराच्या व्यापारी भागात पोचली. गर्दीतून वाट काढत, चौकाचौकातील सिग्नल टाळत एका गाडी उभी करायच्या ठिकाणाशी पोचली. ती म्हणाली, “चल पेटे” आणि कार्यालयाच्या इमारतींपैकी सर्वात उत्तम अशा एका सात मजली इमारतीशी गेली.

आम्ही इमारतीत शिरतांना, तिने शेरा मारला, “तुझे नाव पेटे आहे, हे खरेच चांगले नशीब आहे.”

मी मान हलवली व ते तिथल्या तिथे सोडून दिले. मी डोळयाच्या कोपऱ्यातून तिला न्याहाळत होतो. ती एक डौलदार व चपळ बाई होती. ती अर्धा चित्ता असल्यासारखी होती. ती साधारण तिशी बत्तीशीची असावी. पण तिचे चालणे व शरीराकृती एखाद्या विशीतील बाईसारखी होती. तिचा आवाज खालच्या पट्टीतील व घोगरा होता आणि डोळे आव्हानात्मक होते. रात्रीच्या लिफ्ट चालू होत्या. तिच्या फोनला उत्तर म्हणून, पहारेकरी आला. त्याने तिला पाहिल्यावर त्याचा चेहरा ख्रिसमस झाडासारखा उजळला. त्याचा चेहरा माझ्याकडे बघून, शंकास्पद झाला.

ती म्हणाली, “ओलाफ, हे ठीक आहे. हा मनुष्य मला मदत करतो आहे. घाई कर, कारण माझा नवरा येतो आहे.”

आम्ही लिफ्टमध्ये गेलो. ओलाफने दार लावले आणि आम्हाला खडखडत, वर पाठवले. त्याचे डोळे ऑलिव्हच्या आकृतीवर खिळले होते. मी कुत्र्यांना लोकांकडे तशाच भावाने बघतांना पाहीले होते. ओबडधोबड प्रेम आणि आंधळा, मुका इमानीपणा. त्याने आम्हाला सहाव्या मजल्यावर सोडले. ती म्हणाली, “इकडून ये.” आणि पॅसेजमधून चालू लागली.

मी चालतांना होणारी तिच्या नितंबांची हालचाल बघू लागलो. मला वाटते, तिला मी ती बघायला हवी होती ---

तिने काही विशेष नाराजी दाखवली नाही. ती फक्त प्राण्यांना चिडवायला आवडणाऱ्या प्रकारची बाई होती --- की ती मला खेळवत होती?

तिने कुलुपात किल्ली घातल्यावर, मी विचारले, “पहारेकऱ्याला तुला फसवायची काही संधीच नव्हती का? ती म्हणाली, “नाही.”

तिने कुलूप उघडल्यावर व कार्यालयातील दिवा लावल्यावर, मी तिला म्हटले, “मानवी स्वभावावर तुझा बराच विश्वास दिसतो.

ती पुरुषीपणे बोलली, “हो, आहे.” पुरुष माणसे नेहमी माझ्याशी अदबीने वागतात. बायका मला प्रश्न करून त्रास देतात. मी बायकांचा द्वेष करते.”

स्टेनोग्राफ्रचे एक टेबल सोडल्यास, कार्यालयात काही फर्निचर नव्हते. सरळ पाठीच्या काही खुर्च्या, ॲश ट्रे व केराची टोपली होती. इलेक्ट्रिक उपकरणांना जोडलेल्या वायरी भिंतीच्या प्लॅस्टरच्या भोकांमधून, आलेल्या दिसत होत्या. तिने टेबलाचा एक खण उघडला. दोन वस्तू काढून, एक माझ्या हातात दिली. “जेव्हा तू

माझ्या नवऱ्याला पुढील कार्यालयात आलेले ऐकशील, तेव्हा हे वायरीला जोड आणि तू काय ऐकशील, ते लक्षात ठेव. मला वाटते, आज रात्री गोष्टी प्रकरण मिटण्यावर येणार आहेत."

मी तिच्यासमोर बसलो आणि माझ्याकडील शेवटची सिगरेट काढली. मी विचारले, "या बाबतीत मला काही विशेष असे करायचे आहे का?"

ती म्हणाली, "अर्थात."

मी विचारले, काय?"

'ते तुझ्यावर अवलंबून राहील."

मी विचारले, "मी काठीने वस्तू फोडणे अपेक्षित आहे का?"

तिने मला तिच्या गडद, मोहक डोळ्यांनी अभ्यासले व मोठ्या खोल आवाजात म्हणाली, "मी तुला मोकळेपणे सांगते, मी माझ्या नवऱ्याची कसलीच काळजी करत नाही. तो देखील माझी काळजी करतो, असे मला वाटत नाही. आमचा काडीमोड अटळ आहे. जेव्हा तो होईल, तेव्हा मला माझ्या वाटणीचा पैसा पाहिजे."

"मी विचारले, "पण संपत्ती किती आहे?"

ती बोलली, "बहुधा भागीदारीचे व्याज. तो मुक्तपणे खर्च करत असतो आणि तो शहाणपणे जास्तीत जास्त चांगले व्याज मिळवायच्या मागे आहे. मनुष्य त्रेचाळीस वर्षांचा झाल्यावर व बाहेर हिंडू लागल्यावर, पैसाच सर्व काही असतो. आतापर्यंत तो फक्त गोड वडील आहे. मी विशेष काळजी केली नाही. कारण माझ्याकडे खर्च करायला भरपूर पैसे होते. पण आता त्याची मान घट्ट फासात अडकली आहे. ही डायना लॉक गर्विष्ठ आहे. ती अती गर्विष्ठ आहे. किंवा कोणीतरी डोकेबाज

तिच्यामागे उभा आहे. मला वाटते तो कुठे तरी वकील असावा. काही झाले तरी त्यांनी हार्वेला फार वाईट परिस्थितीत टाकले आहे. त्याला पैशांची -- फार पैशांची गरज आहे आणि तो त्याला फक्त भागीदारी विकूनच मिळू शकतो. तू त्याला ते करण्याबद्दल बोलतांना ऐकलेस. तसे केले, तर तो मला रहायच्या बोटीच्या सफरीवर नेऊ शकेल."

मी मान डोलवली.

ती म्हणाली, "ठीक आहे. जर असे होण्याचे वारे वहात असतील, तर मी त्यांना मोठ्या धारदार पकडीत पकडणार आहे."

मी थोडा विचार केला. मी म्हणालो, "लाल डोके तिची बॅग उघडू शकेल. एखादी छान, मोत्याचे हँडल असलेली बंदूक घेऊन, धाडधाड चालवू शकेल. तुला माहिती आहे का, त्यांना असे करायची सवय आहे."

हे फक्त मधल्या जागा भरणे होते. ती काय म्हणते, ते मला हवे होते. ती ते म्हणाली, "हे सुद्धा ठीक आहे. माझ्या नावाचा मोठ्या रकमेचा जीवन विमा आहे. पण मला त्याला नंगा करायचे नाही.

"शू --- ते इकडे येत आहेत."

मी लिफ्टच्या दाराचा आवाज ऐकला. पॅसेजमध्ये पाऊले वाजली. मग मी जवळील कार्यालयाच्या दारात किल्ली फिरवल्याचा व दिव्याचे बटण लावल्याचा आवाज ऐकला.

मिसेस पेम्बरटनने माझ्याकडे पाहून मान हलवली. मी वायर जोडून, कानात आवाज ऐकू येणारा हेडफोन लावला. तिनेही तसेच केले. मला काही पुसट आवाज

ऐकू येऊ लागले. तो आवाज बासचा असल्याचे मी ओळखले. तो म्हणत होता, “पण हार्वे, तुला विकायची काय गरज आहे?”

हार्वे पेम्बरटन बोलला, “मला थोडे हुश्श करायचे आहे. मी फार म्हातारा होण्यापूर्वी, मला माझ्या बायकोबरोबर खरा मधुचंद्र साजरा करायचा आहे. आम्ही कधीच प्रवास केला नाही. आपण जेव्हा त्या मोठ्या हॉटेलचे काम मिळवत होतो, तेव्हा मी तिच्याशी चार वर्षांपूर्वी लग्न केले. तेव्हापासून मला कधी सवडच मिळाली नाही. आमचा मधुचंद्र कधी साजरा झालाच नाही.”

“परत गेल्यावर तू काय करणार आहेस?”

“मला माहिती नाही.”

बास बोलला, “तुला गोष्टी सावरता येतील. तुला व्यवसाय न विकता मधुचंद्र साजरा करता येईल.”

“हार्वे, मला तुझ्यासारखा भागीदार गमवायचा नाही आहे.”

पेम्बरटन बोलला, “नाही. ज्यात माझा सगळा पैसा गुंतला आहे असा व्यवसाय मला सोडायचा नाही. मी त्याबद्दल काळजी केली तर मी वाईट भागीदार ठरेन. मला यातून पाय न अडकता बाहेर पडायचे आहे. मग माझा मला काहीही विचार करायचे स्वातंत्र्य असेल.”

बास म्हणाला, “तू हे आता करू नयेस, असे मला वाटण्याचे एक कारण आहे. ते म्हणजे आता माझ्याकडे पुरेसे पैसे नाहीत. भागीदारी मोडल्यावर मला तुला जेवढे पैसे द्यावे लागतील, तेवढे माझ्याकडे आता नाहीत.”

पेम्बरटन त्याच्या भावनामय, कटू आवाजात बोलला, “तू किती देऊ शकतोस?”

मी बासला बोलतांना ऐकले, “ मला माहिती नाही.”

पेम्बरटन अधीरतेने म्हणाला, “आर्थर, तू हे प्रकरण चिघळवू नकोस. मी तुला दुपारीच सांगितले, की मला काही ठराविक रक्कम ठरवून करारपत्र बनवायचे आहे. तुला विचार करायला दुपारचा पुरेसा वेळ होता."

तिथे अनेक सेकंद शांतता पसरली आणि मला वाटते, कदाचित बास कागदावर काही आकडे लिहित होता. मी हार्वे पेम्बरटनला असे म्हणतांना ऐकले, “मी एका हिशेबनीसाला आणून, त्याच्याकडून व्यवसायासंबंधी सर्व हिशेब तयार करून घेणार आहे आणि --- “

बास म्हणाला, “त्याचा याच्याशी काही संबंध नाही. व्यवसायाची किंमत काय आहे, याचा काही प्रश्न नसून, प्रश्न असा आहे, की माझ्या खेळत्या भांडवलावर त्रासदायक परिणाम न होता, मी तुला किती पैसे देऊ शकतो. हार्वे, मी तुला मोकळेपणे सांगतो, की मला व्यवसाय विकायचा नाही. भागीदार म्हणून मला तुला गमवायचे नाही आणि आताच्या तुलनेत तुला चांगली घसघशीत रक्कम मिळणे अवघड दिसते आहे. मी सोडून तू हा व्यवसाय कुणाला विकणार? आपल्या करारपत्रानुसार एका भागीदाराने दुसऱ्याला व्यवसाय विकण्यापूर्वी सहा महिने दिले पाहिजेत --- “

पेम्बरटन अधीरतेने म्हणाला, “मी हे सगळे जाणून आहे. किंमत काय आहे?”

बास बोलला, “दहा हजार.”

पेम्बरटन ओरडला, “दहा हजार. अरे देवा, तू वेडा झाला आहेस का? व्यवसायाची किंमत पन्नास हजार आहे. मी हिशेब करायला लाऊन, योग्य किंमत

काढणार आहे. पण मला ठाऊक आहे की माझा वाटा पंचवीस आहे. मी थोडे कमी घेतले, तरी ते वीस होतात आणि याहून खाली मी येणार नाही.

बेसच्या आवाजात सुटकेचा भाव दिसला. “मग हे प्रकरण मार्गी लागत आहे. मला हे ऐकून आनंद झाला. पेम्बरटन, मला भीती होती, की तू पैशाच्या बाबतीत अडकला आहेस आणि दहा हजार डॉलरवर सौदा तोडशील. ती अक्षम्य चूक झाली असती. मला तू व्यवसाय विकायला नको आहेस.”

पेम्बरटन शपथ घेऊ लागला. बास म्हणाला, “ठीक आहे, एकमेकात आपली समजूत पटली, म्हणून मी आनंदी आहे. तू इथे रहावेस, म्हणून मी तुझ्यावर दबाव आणणार नाही. काही ना काही कारणाने, तू व्यवसायाच्या बाहेर जाणे, माझ्यासाठी चांगलेही ठरू शकेल. पण तुझ्यासाठी किंवा माझ्यासाठी, मला ते करायचे नाही आहे. मला तोशीस पडली तरी मी तुला पै न पै देईन --- पण तू राहिलास, तर मला आनंद होईल. व्यवसायाला व मला तुझी गरज आहे. तुलाही व्यवसायाची गरज आहे. ठीक आहे. मी जातो आहे. नंतर भेटू. शुभ रात्र.”

वीजेच्या उपकरणावर दार लावल्याचा आवाज आला.

पेम्बरटन ओरडला, “आर्थर, परत ये. मला तुझ्याशी बोलायचे आहे.” पण दुसरा आवाज आला नाही. मी गिऱ्हाईकाकडे पाहीले.

ती बोलली, “पाहीलेस, तो व्यवसाय विकायला बघतो आहे. तो लबाड बरेचसे पैसे लुबाडेल. तो बहुधा तिच्याबरोबर पळून जाईल. मला तू हे थांबवलेले आवडेल.”

मी विचारले, “आता काय कार्यक्रम आहे?”

“मला वाटते, त्याचे तिच्याबरोबर भेटायचे ठरले आहे.

पहारेकऱ्याने मला सांगितले, की त्याला एका तरुण बाईला मिस्टर पेम्बरटनच्या कार्यालयात पाठवण्याची सूचना त्याने दिली आहे.”

लवकरच मला लिफ्टच्या दाराचा आवाज ऐकू आला. दिवाही दिसला. आमच्या दारावरून, पॅसेजमध्ये भरभर चालल्याचा आवाज आला. मग शेजारील कार्यालयाच्या दारावर टकटक झाली. मी परत हेडफोन चढवला. मला दार उघडल्याचा व लावल्याचा आवाज आला.

हार्वे पेम्बरटनने विचारले, “तू कागदपत्रे आणलीस का?”

एका बाईचा आवाज आला, “असा म्हाताऱ्या आजीसारखा वागू नकोस. माझे चुंबन घे आणि कागदपत्रांची चिंता सोड. ती सुरक्षित जागी आहेत.”

पेम्बरटन तिला खुलवत बोलला, “तू म्हणाली होतीस, की तू कधीही ती लंपास करू शकतेस आणि काय लिहिले आहे, ते वाचण्यासाठी ती तू मला देऊ शकतेस.

ती म्हणाली, “त्याऐवजी मी त्या कागदपत्रांच्या प्रती आणल्या आहेत. माझ्या वकिलाने मला मूळ कागद आणू दिले नाहीत.”

“का?”

मला माहिती नाही. मला वाटते, त्याचा माझ्यावर विश्वास नाही. हार्वे, मी नितीमत्ता बाजूला सारून, पैसे लुबाडेन, असे वाटून घेऊ नकोस. पण तू माझे हृदय तोडले आहेस. प्रिया, मी पैशांच्या मागे नाही. मला तू हवा आहेस. पण तू मला दुखावले आहेस आणि मी वकिलाकडे गेले. त्याने माझ्याकडून काही कागदपत्रांवर सह्या घेतल्या. आता असे दिसते आहे, की तू माझ्याबरोबर येणार नसलास, तर मला त्याप्रमाणेच चालावे लागेल. मला ते हवे आहे. माझा लबाड वकील मला सांगतो

आहे, की मी तुझ्यासारख्या विवाहित माणसावर वचन मोडल्याबद्दल फिर्याद करू शकत नाही.” पेम्बरटन मध्येच बोलला, “मला वाटते तुझा वकील लबाड आहे व तो काही त्रास उत्पन्न करतो आहे व तुला ब्लॅकमेल करणारी ठरवतो आहे.”

“नाही. हार्वे, तसे नाही. कायद्यात काही पळवाट आहे. जर एखाद्या मुलीला मनुष्य विवाहित असल्याचे माहिती नसेल आणि त्याने तिच्यापासून ते लपवले, तर किंवा तो विवाहित असला तरी त्याला वचनभंगाबद्दल कोर्टात खेचता येते. ओहो! हार्वे. मला या सगळ्या वकिलांशी काही व्यवहार नको आहे. मला तू हवा आहेस. तू तुझ्या बायकोला घटस्फोट देऊन, माझा होऊ शकत नाहीस का?”

हार्वे पेम्बरटन म्हणाला, “अर्थातच नाही. तू छोटीशी मूर्ख बाई आहेस आणि तू तुझे आयुष्य वकीलाबरोबर जोडले आहेस, तर तो मला असले काही स्वातंत्र्य घेऊ देणार नाही. त्या पत्रांमधील मजकुरामुळे, मला घटस्फोट मिळणार नाही आणि मी तिला जगातील प्रत्येक गोष्ट दिल्याशिवाय, ती मला घटस्फोट देणार नाही. ती माझी धुलाई करणार, असे दिसते आहे. तुलाही तेच करायचे असावे.” क्षणभर तिथे शांतता पसरली. मग एका बाईचे हुंदके ऐकू येऊ लागले.

परत पेम्बरटन बोलू लागला. ठराविक काळानंतर त्याचा आवाज चढत होता. मला वाटते, तो जमिनीवर चालत होता व चालतांना बोलत होता. तो बोलला, “तुझे रडणे चालू दे. तिथे बस आणि तुझ्या रुमालात, टिपे गाळ. जर तुला ते माहिती करून घ्यायचे असेल, तर मला ते नरकासारखे संशयास्पद वाटते आहे. मी तुला वाफेच्या बोटीवर जेव्हा पहील्यांदा भेटलो, तेव्हा तू अशी रडकी नव्हतीस. तू चांगली खेळकर होतीस.”

ती रागाने किंचाळत बोलली, “तु --- ला --- माझ्याशी --- लग्न क --- रा --- य --- चे होते.”

तो म्हणाला, “ठीक आहे. तेव्हा मी त्यावर ठाम होतो. मला वाटत होते, की माझी बायको मला घटस्फोट देईल. त्याला आग लागो. मला माझ्या लग्नात बाधा आणून काही करायचे नव्हते. ती म्हणजे आग आहे. मला माझ्या लग्नाचे भक्ष्य बनवायचे नाही. तुला ते माहिती आहे. ते नंतर झाले. नंतर मी व्यवसायिक कामामुळे, जेव्हा तुझ्याबरोबर भेटायचे टाळले, तेव्हा तू लगेच या वकिलाकडे धावलीस.”

ती दुःखाने बोलली, “मी त्याच्याकडे एक मित्र म्हणून गेले. मी त्याला खूप वर्षे ओळखत होते. त्याने मला सांगितले, की तू मला गंभीरपणे घेत नाही आहेस व मी तुझ्यावर सूड उगवावा. मला काय हवे होते, तर फक्त माझ्या पायावर मी पुन्हा उभी रहाणे.”

पेम्बरटन बोलला, “त्यात तुझ्या वकिलाला हवे असलेले मिळव आणि मग मला ते केवढ्याला पडेल, त्याचा विचार कर. तू त्या भिकार वकीलाला सोडून का देत नाहीस?”

“मी असे करू शकत नाही. त्याने कागदपत्रावर माझ्या सहया घेतल्या आहेत.”

परत एकदा तिथे शांतता पसरली. मग पेम्बरटन बोलला, "तू चांगली वागते आहेस, हे मला कसे काय कळणार? तू सर्व व्यवसायाची बांधणी केली आहेस."

ती हुंदके देत म्हणाली, “तू मला त्यापेक्षा जास्त चांगले ओळखतोस.”

“वकीलाला लाथाडावे?

“मी असे --- करू शकत नाही. त्याने कागदपत्रावर माझ्या सहया घेतल्या आहेत.”

पेम्बरटनने तिला सांगितले, “तू मला मारून मुटकून तयार केलेस आणि आता --- “

तिचा आवाज नंतर चांगला मोठा आला. ती बोलली, “ठीक आहे तर मग. तुला साखरवेष्टीत गोळी नको असेल, तर आपण ती कडू बनवू. हे भावनातिरेकाने हुंदके देणाऱ्या बाईचे नाटक करून, मी दमले आहे. माझ्या आयुष्यात मी इतका पराकोटीचा मुका भोळसट माणूस पाहिला नाही. तुला असे वाटते आहे, असे दिसते आहे, की मध्यमवयीन म्हातारा दिसणाऱ्याला गोड पदार्थ व तुझ्या गोडपणाला भुलणारी निष्पाप मुलगी मिळणार आहे. खड्ड्यात जा. जर तू स्वतःला पाहिजे त्या गोष्टींवर चांगला खर्च करणारा असतास, आणि मला काही फुटकळ वस्तूंवर समाधान मानायला लावले असतेस, तर मी तू फोपशा आहेस, असे म्हटले असते. पण तुला वाटले, तुझ्या या फोर्डने बनवलेल्या पहील्या गाडीला भुलणारी मी लहानशी निष्पाप मुलगी आहे. ठीक आहे. तू उभा राहून हे ओझे घे. तू त्याचे काय करायचे ठरवले आहेस? माझ्याकडे तुझी पत्रे आहेत. ती तू खेळू पहात असलेला खेळ दाखवत आहेत. तेव्हा जास्त गमजा करू नकोस.”

तो म्हणाला, “हे असे आहे तर! तू दुहेरी तोंडाची घाणेरडी बाई आहेस.”

“ओहो, दुहेरी तोंडाची घाणेरडी बाई का? एक मिनिट, मिस्टर हार्वे पेम्बरटन, मी तुझे एक पत्र वाचते. ते ज्युरींना कसे वाटेल, ते ठरव.”

“प्रिये, लक्षात ठेव, हे संस्कृतीचे मूर्ख रीतीरिवाज सोडून, आपण आधीच नवरा बायको आहोत. अर्थात समारंभ अजून व्हायचा आहे. माझ्या व्यवसायिक कामातून मी थोडासा मोकळा झालो, की लगेच त्याची तजवीज करतो. जर मी आताच तुझ्याशी लग्न करायला निघालो, तर व्यवसायाचे काही पुरे व्हायला आलेले बेत कोलमडतील. प्रिये, मी तुला माझ्यावर विश्वास ठेवायला सांगतो. मी तुझ्यावर

अमाप प्रेम करतो. गुलाबाचे सुंदर फूल चिरडण्याइतकेही मी तुला दुखावणार नाही. प्रिये, मी तुझ्यावर प्रेम करतो.”

हे ऐकून, ती मोडून पडली व म्हणाली, “अजून किती वेडेपणा बाकी आहे, ते देवालाच माहिती!

तो बोलला, “तू दुहेरी तोंडाची घाणेरडी बाई!”

तिचा आवाज खाली गेला. मला वाटले, ती दाराकडे वळली. ती बोलली, “मग आता तुझे हे वागणे थांबव. हे प्रकरण इथेच थांबव. तुझ्याकडे चोवीस तास आहेत. एक तर सुरु ठेव, किंवा बंद कर. “

मी दाराचा आवाज ऐकला. मग हॉलमध्ये टाचांचा आवाज आला आणि क्षणभराने लिफ्टच्या दाराचा आवाज आला. दुसऱ्या कार्यालयात सर्व शांत होते.

मी माझ्या डोक्यातून ते सर्व काढून टाकले.

मिसेस पेम्बरटन म्हणाली, “ठीक आहे. तर एकंदरीत ते असे आहे.”

“मला वाटते, तो त्याची किंमत असेल, त्याच्या अर्ध्या किमतीला बासला ते विकेल आणि ते सर्व त्या लाल डोक्याला मिळेल.”

मी विचारले, “ती लाल डोक्याची आहे, हे तुला कसे काय माहीत?

“मी तिला पाहीले आहे. तिचा भूतकाळ शोधायला, मी तिच्यामागे गुप्तहेरही सोडले होते, जेणेकरून तिच्यावर काही कारवाई करता येईल. पण मला तिची एकही गोष्ट समजली नाही. तिने हा खेळ गुपचूप खेळला होता.”

मी तिला म्हणालो, “ठीक आहे. तुझ्या नवऱ्याला पुढे जाऊ दे व लढू दे. जरी त्याला काही सिद्ध करता आले नाही, तरी नुकसानभरपाई म्हणून ज्युरी तिला एवढे काही देणार नाही.”

ती बोलली, “ते तेवढेच नाही. त्या पत्रांची पण भानगड आहे. तो मूर्खासारखी पत्रे लिहितो. त्याचे फाऊन्टन पेन खिशात ठेवायला तो शिकू शकत नाही. लक्षात ठेव, बास आणि पेम्बरटन यांच्याकडे काही महत्वाची गिऱ्हाईके आहेत. जोपर्यंत त्यांची गिऱ्हाईके त्याना व्यायसायिक जाण व क्षमता असल्याचे मानतात, तोपर्यंत ते व्यवसाय करू शकतात.”

मी तिला म्हटले, “त्या गोष्टी गेल्या उडत! तुझा नवरा युरोपला एक सहल काढू शकतो.”

ती म्हणाली, “तुला कळत नाही. त्याने पूर्वी पण एकदा स्वतःला मूर्ख बनवून घेतले होते. म्हणून बासने भागीदारीच्या करारपत्रात काही मजकूर टाकला आहे. त्यांनी भागीदारी सुरु केली, तेव्हा प्रत्येकाने दोन हजार डॉलर्स त्यात घातले. करारपत्रात असे लिहिलेले आहे, की कुणी भागीदार त्याचा व्यावसायिक वाटा दुसऱ्याला सहा महिन्यांची मुदत दिल्याशिवाय विकू शकत नाही आणि त्यात असेही लिहिले आहे, की जर हार्वे बाईच्या भानगडीत फारच त्रासला, तर बास त्याला मूळ दोन हजार डॉलर्सची रक्कम देऊन बाहेर काढू शकतो. बरोबर काय शब्द आहेत, ते मला माहिती नाही. सुरवातीलाच --- वाढण्यापूर्वीच मला तू ती गोष्ट खुडून टाकायला हवी आहेस. हार्वेचा नाईलाज आहे. चोवीस तासांच्या आत काहीतरी करणे भाग आहे.”

मी तिला म्हटले, “ठीक आहे. मी बघतो, मला काय करता येईल. त्या मुलीचा पत्ता काय आहे?”

“डायना लॉक, सदनिका, ३ अ, ४२१५, मध्य रस्ता. प्रयत्न करून, तिला शोधून काढण्याचा काही उपयोग नाही, कारण मला वाटते, ती व्यवसायिक आहे आणि सर्व युक्त्यांना पुरून उरणारी आहे. पण करून बघ आणि सफल हो.”

मी म्हणालो, “अजून एक गोष्ट, मला त्या वकिलाचे नावही पाहीजे.”

“म्हणजे डायना लॉकच्या वकिलाचे नाव?”

“हो.”

“मी ते तुला देऊ शकत नाही.”

“का नाही?”

“कारण मला ते माहिती नाही. तो फार मागे मागे रहातो. तो तिचा कुणी मित्र आहे. त्याला ब्लॅकमेलच्या प्रकरणात भाग घेतल्याबद्दल कोर्टात प्रॅक्टीस करायची परवानगी नाकारली जाऊ शकते, म्हणून बहुधा तो घाबरतो.”

मी विचारले, “किती दिवस हे चालू आहे?”

“म्हणजे त्या लाल डोकेवालीबरोबरचे प्रकरण? ते सुरु झाले --- “

“नाही, ते नव्हे. मला म्हणायचे आहे --- ” मी कार्यालयाकडे हात नेऊन दाखवला.

ती बोलली, “मला एका गुप्तहेर संस्थेची मदत मिळणे शक्य झाल्यापासून. पहारेकरी, ओलाफ हा वायरमन आहे. त्याने मला हे सर्व करायला मदत केली. त्याने काही जुने भाग आणले - “

“तुला तो विश्वासू वाटतो का?”

ती बोलली, “आयुष्यभरासाठी."

मी सिगरेट पेटवून म्हटले, “मला बाथरुमला जायचे आहे.”

ती उघडी आहे का?”

ती तिच्या हातातील बॅग उघडत म्हणाली, “मला तुला माझी किल्ली द्यायला लागेल. मग तिने सेकंदभर हो नाही केले व बोलली, “मला वाटते, ती दुसऱ्या

पर्समध्ये राहिली. पण कुलूप काय नावालाच आहे. ते कुठल्याही किल्लीने उघडेल. किंवा तू लहानशा खिशातील चाकूच्या टोकानेदेखील ते उघडू शकतोस.''

मी खाली वाकून तिच्या हातातील बॅगेत पाहीले. ''पिस्तुल कशासाठी?''

ती बॅग बंद करत म्हणाली, ''संरक्षणासाठी.''

मी म्हणालो, ''ठीक आहे. ते मला दे. आता मी तुझा रक्षणकर्ता आहे. त्या पिस्तुलामुळे, तू अडचणीत सापडशील.''

मी माझा हात बाहेत काढला, तोपर्यंत तिने क्षणभर हो नाही केले. मग मनाविरुद्ध पिस्तुल बॅगेतून काढले आणि हातात धरून ती संभ्रमात पडली.

''पण समजा, तू माझ्याबरोबर नसलास आणि काही झाले तर काय? समजा वायर्सचा मागोवा घेत, तो इथपर्यंत पोचला व मला पकडले, तर काय?''

मी तिला म्हटले, ''नेहमी माझ्याबरोबरच रहा.''

पिस्तुलाच्या गोष्टीने साधारण अर्धवर्तुळ पूर्ण केले. तिने विचारले, ''तुला आता मी तुझ्याबरोबर यायला हवी आहे का?

मी तिला म्हटले, ''गोंधळ करू नकोस. मी बाथरूमला चाललो आहे आणि लगेच परत येतो.''

''आणि तू इथे नसतांना माझा नवरा आला तर? मला वाटते, मी असे म्हणावे, की हे ठीक चाललेले नाही. तू बाथरूमला जायचा बहाणा करत आहेस. तू परत येईपर्यंत, त्याने माझा गळा आवळता कामा नये.''

मी दाराशी घुटमळलो. मी बोललो, ''मी परत येईपर्यंत, तुझे खेळणे तुझ्याकडे ठेव. जेव्हा आपण बाहेर जाऊ, तेव्हा तू बंदुक तुझ्याकडे ठेऊ नकोस किंवा मग माझ्याबरोबर येऊ नकोस. तू मला पैसे देणार आहेस. तेव्हा तुला पाहिजे ते कर.''

मी दारापर्यंत जाऊन, कार्यालय ओलांडले. व दाराची मूठ उघडण्यासाठी, बाहेरून ती फिरवली.

मी बाथरूममध्ये असतांना, हार्वे पेम्बरटनने बाथरुमला जायचे ठरवले, तर काय होईल? की तो मला पॅसेजमध्येच भेटेल? मी जमिनीसरपट जाऊन त्याची ती संधी घालवेन. मी लिफ्टच्या उजव्या बाजूला जिना पाहिला व खाली गेलो.

पुरुषांची बाथरूम लांब एका टोकाला होती. माझ्याकडील पहिलीच किल्ली लागली.

पाच मिनिटांनी पुन्हा मी जेव्हा मिसेस पेम्बरटनकडे आलो, तेव्हा मी तिला उदास व मरगळलेले पाहिले.

मी विचारले, "काय झाले? काही गैर झाले का?"

ती ताण आलेल्या, उदास आवाजात म्हणाली, "जर माझा नवरा पॅसेजमध्ये तुझ्या अंगावर चालून आला असता, तर काय?"

मी म्हणालो, "नाही, तसे झाले नाही."

ती म्हणाली, "तू अशी संधी घेता कामा नयेस."

मी हसलो. "मी तसे केले नाही. मी जिना भरभर उतरलो आणि चौथ्या मजल्यावरील बाथरूम वापरली."

तिचा चेहऱ्यावर सुटकेचे भाव आले.

मी तिला म्हणालो, "ठीक आहे. आपण जाऊ या. आपण माझे सामान आणू आणि नंतर मी तुला घरी नेणार आहे. नंतर जर तुला चालत असेल, तर मी तुझी गाडी घेऊन, माझी काही कामे करेन."

"तुझा काही बेत आहे का?"

“मी संधी घेणारा माणूस आहे.”

ती बोलली, “ठीक आहे. आपण जाऊ. आपण जिना उतरून जाऊ व खालील मजल्यावरून लिफ्टसाठी बटण दाबू.”

आम्ही दाराकडे निघालो. तिने दिवा मालवला. मी म्हणालो, “एक मिनिट, तू काही विसरते आहेस.”

“काय?”

“पिस्तुल.”

“ते ठीक आहे. मी त्यावर विचार केला. मला वाटते, तुझे बरोबर होते. म्हणून मी ते ठेऊन दिले.”

“कुठे?”

“टेबलाच्या खणात.”

मी परत दिवा लाऊन, ते बघायला गेलो.

ती करमणूक झाल्याच्या आवाजात म्हणाली, “वरील उजव्या हाताचा खण.”

मी खण उघडला. तिथे पिस्तुल होते. मी ते उचलले व माझ्या खिशात ठेऊ लागलो. मग माझा विचार बदलून, ते परत खणात ठेवले. खण बंद करत व दिवा मालवत, मी म्हटले, “चल.”

आम्ही हॉलमधून निसटून, भरभर पायऱ्या उतरत खालील मजल्यावर आलो. मी लिफ्टचे बटण दाबले. ओलाफने लिफ्ट वर आणली आणि मी त्याच्याकडे परत पाहीले. तो मोठा, हाडापेराने मजबूत स्विडीश माणूस होता. तो नाकेला असून,

त्याच्या मिशा सोनेरी व उतरत्या होत्या. त्याचे डोळे कुत्र्यासारखे होते. तळमजल्यावर जाईपर्यंत त्याचे डोळे मिसेस पेम्बरटनवरून, जराही हलले नाहीत.

मिसेस पेम्बरटनने तिचे डोके त्याच्यापासून लिफ्टच्या हँडलकडे वळवले होते व ती खाली जाणारी दारे पहात होती. जेव्हा आम्ही तळमजल्यावर आलो, तेव्हा तिने वळून, त्याच्याकडे काही विशिष्ट दृष्टीने पाहीले. तिच्याकडे बघून, त्याचे पेटत्या कोळशांसारखे डोळे चमकले. ओलाफने दार उघडले. मी मिसेस पेम्बरटनचा दंड पकडला व आम्ही रस्ता ओलांडून, मोटार उभी केलेल्या जागी गेलो.

मी म्हटले, “मी गाडी चालवतो. मला गाडीशी सवय करून घ्याची आहे.”

मी स्टेशनवर गेलो. माझे सामान घेतले आणि परत मिसेस पेम्बरटनच्या घरी आलो. स्वयंपाक्याने माझे सामान वर आणून, मला माझी खोली दाखवली. तो गेल्यावर, मी माझी बॅग उघडली. त्यात दोन बंदूका होत्या. त्यातील एक खांद्याला लटकवायची चकाकणाऱ्या चामड्याच्या आवरणाची बंदूक मी घेतली. ती कोटाच्या आत दडवून, मी मिसेस पेम्बरटनच्या खोलीचे दार वाजवले.

तिने दार उघडले व पॅसेजमध्ये उभी राहिली. तिच्यामागे दिवा होता. तिच्या तलम रेशमी कपड्यामधून मोठ्या मऊ भासणाऱ्या तिच्या वळणदार शरीराच्या उत्तेजक सावल्या पडत होत्या. मी तिच्या चेहऱ्याकडे एकटक बघत राहिलो. मी तिला म्हणालो, “मी बाहेर जातो आहे. मी आलो की तुला ऐकू येईल ना?”

ती बोलली, “हो, मी वाट बघेन.”

मी तुझ्या दारावरून जातांना खोकलो, तर तुझ्यासाठी ती चांगली बातमी असेल. जर मी खोकलो नाही, तर तू समज की गोष्टी सुरळीत चालू नाहीत.”

तिने मान डोलावली. तिची डौलदार, बारीक आकृती माझ्याजवळ आणत ती आली. तिने तिचा हात माझ्या दंडावर ठेवला आणि त्या विशिष्ट घोगऱ्या आवाजात म्हणाली, "कृपया, काळजी घे."

मी मान हलवली व निघालो. माझे डोळे तिच्यावरून एकदाही भरकटले नाहीत. पॅसेजमधून आणि जिन्यातून खाली पाय न वाजवता जातांना, मी विचार केला की मी कधीही असा खर्जातील विशिष्ट आवाज असलेली व प्राण्यांना चिडवायला आवडणारी बाई पाहीलेली नाही.

बेचाळीसशे पंधरा, सेंटर रस्त्याला तीन मजली अपार्टमेंट होते. खालचे मजले दुकानांना दिले होते. रस्त्यापासूनची वाट जिन्याशी उघडत होती. मी दार उघडायचा प्रयत्न केला. त्याला कुलूप नव्हते.

मी परत गाडीत बसायला गेलो आणि विचार केला. हे नवल होते की वकील कधी समोरासमोर आला नव्हता, तर फक्त आडूनआडून माहिती होता. कुणालाच त्याचे नाव माहिती नव्हते. त्याचा उल्लेख मोकळेपणे केला जाई. पण सगळी चर्चा तो त्याच्या पक्षकारांकडून करून घेई. त्यामुळे त्यांचा बेत यशस्वी
झाला, तरी पैसे गोळा करणारे पक्षकार असणार. मग त्याला पैसे देणे तिचे काम राहिले असते.

ते मला योग्य वाटले नाही. हे दोन व दोन मिळवून, दोनच उत्तर काढण्यासारखे होते.

मी परिसराकडे नजर टाकली. तिथे पहील्या मजल्यावर, लहानशी सराफी पेढी होती. आता ती बंद झाली होती. खिडकीत रात्रदिवा जळत होता. काही स्वस्त घड्याळे व काही किरकोळ दागिने खिडकीतून दिसत होते.

मी कोपऱ्यावरून गाडीने एक चक्कर मारली व गाडी उभी केली. काहीही मिळणारे औषधाचे दुकान उघडे होते. मी त्यात जाऊन, चिकटपट्टी आणली. बेन्झाईनची लहान बाटली आणली. कापूस, लिहायचे पॅड व पोलिसाची शिट्टी आणली. मी कारकुनाला विचारले, “खोटे नकली मोती आहेत का?

त्याच्याकडे एकोणपन्नास सेंटच्या काही माळा होत्या. त्यातील एक मी घेतली. मग मी गाडीकडे गेलो. मोत्यांमधील दोरे तोडले आणि त्यातील चार सोडून बाकीचे टाकून दिले. मी गठ्ठ्यातून थोडा कापूस काढला. त्यात चार मोती ठेवले आणि ते माझ्या खिशात ठेवले. लिहायच्या पॅडमागे मी एक बोर्ड ठेवला. त्यात डोळयांसाठी दोन व नाकासाठी एक भोके पाडली. ती मी चिकटपट्टी लाऊन घट्ट केली. ते साधन मी मिनिटाभरात कधीही घालू शकत होतो. मग मी जिने चढून, सदनिका ३ अ शोधून काढली. तिथे आत उजेड होता. मला रेडीओचा आवाज ऐकू येत होता व दार फार जाड नव्हते. मी खिशातून बहुपयोगी साधन काढले आणि वाकून, भोक पाडले. त्याच्या कडेला जाड तेलकट पदार्थ लावला. मी कामाला निघून गेलो. उघडणाऱ्या दाराला भोक पाडायची सर्वात चांगली जागा उजव्या किंवा डाव्या खालच्या बाजूला होती. तिथे लाकूड अगदी पातळ होते आणि तिथून फार मोठे भोक न पाडता, सर्व खोलीचे दृष्य दिसू शके. अनादी काळापासून गुप्तहेरांनी ही युक्ती वापरली होती आणि अजूनही ती चांगली वापरता येत होती. भोक पाडल्यावर, थोडे च्युईंगम लावल्याने दाराच्या आतून येणारा उजेड कमी झाला व त्यामुळे, येणाऱ्याजाणाऱ्या लोकांचे लक्ष वेधले जाणार नव्हते. पॅसेजमध्ये कोणी नाही असे पाहून, मी एका गुडघ्यावर बसलो आणि मी पाडलेल्या भोकातून झटपट आत पाहिले. तिथे लाल डोक्याची मुलगी होती. ती रेडीओ ऐकत होती व वर्तमानपत्र वाचत होती. माझ्या भोकाने काही आवाज केल्यास ती हलणार नाही, याची खात्री

करून, मी अजून दोन भोके पाडली. त्यामुळे मला आतील सर्व काही जास्त चांगले दिसू लागले. मी च्युईंगमचा पातळसा थर त्या भोकांना लावला. खाली गेलो. क्षणभर थांबलो. जेव्हा फुटपाथवरुन कोणी जात नव्हते, तो रिकामा होता आणि रस्त्यावर आसपास गाड्याही दिसत नव्हत्या, तेव्हा मी पोलिसाची शिट्टी खिशातून काढून जोराने तीनदा वाजवली. अपार्टमेंटच्या खिडक्या उघडण्यापूर्वी, मी आत शिरून, जिना चढू लागलो. मी माझा बोर्ड माझ्या डाव्या हातात धरला होता. मला काय करावे लागले, तर माझा चेहरा वर करून, चिकटपट्टीने मला दृष्य नीट दिसेल, असा तो ठेवणे. मी सदनिका ३ अ च्या दाराला चिकटून उभा राहिलो आणि दारावर टकटक केले. जेव्हा मला दाराकडे येणारी पाऊले वाजल्याचे समजले, तेव्हा मी माझा डावा हात वर करून, बोर्ड नीट धरून, माझ्या खांद्यावरील आवरणातील बंदुकीला धक्का दिला. लाल केसांच्या बाईने दार उघडले आणि मी घरात शिरलो. एकदा आत शिरल्यावर, मी झटपट गोल फिरून दाराला लाथ मारुन, ते बंद केले आणि तिच्यावर बंदूक रोखली.

मी म्हणालो, "तोंडातून एकही शब्द नको."

तिने घातलेला गाउन तिने गळयाशी घट्ट धरून ठेवला होता. तिचा चेहरा पांढरा पडला होता.

मी तिला म्हटले, "अग बहिणी, ठीक आहे. याचा धसका घे. जर कोणी पोलीस फिरतफिरत इथे आला, तर तू दाराशी जा व त्याला काय हवे आहे, ते बघ. जर त्याने विचारले, की आत कुणी आहे का किंवा तू कुणाला पॅसेजमध्ये पाहिलेस का, तर त्याला तू नाही, असे सांग. असे सांगण्याचे कारण, म्हणजे मी दारामागे बंदूक घेऊन उभा असेन. ते मला कधीच जिवंत नेऊ शकणार नाहीत. मी बाहेर गेल्याबरोबर भांडत तेरा पायऱ्या चढेन आणि जमिनीतील विवरातून उडी मारेन. लक्षात आले?"

ती फारच घाबरली होती, पण तिने तिच्या मोठ्या डोळ्यातील भीतीसकट मान हलवली.

मी तिला म्हटले, “मी खालील सराफाचे दुकान लुटले आहे आणि माझ्याकडे एक महाग असे पडद्याचे कापड आहे. मला आता ते गुंडाळण्यासाठी कागद व दोरा हवा आहे. मी ते मला दिसणाऱ्या पहील्या पत्रपेटीत घालणार आहे आणि सॅमकाकाला ते पोचवायची जबाबदारी घेऊ दे. समजले?”

तिने बरेच वेळा थुकी गिळली व म्हणाली, “हं --- हो.”

मी तुला अजूनही काही सांगणार आहे. तो सिनेमातल्यासारखा गाउन तुझ्याभोवती धरून ठेऊ नकोस. मी काही तुला चावत नाही आहे. पण जर पोलीस दाराशी आला व तुला गळ्याशी गाउन गोळा केलेले पाहीले, तर त्याला काय झाले आहे, ते कळेल. जर दारावर टकटक झाली, तर मला तू दार थोडेसे उघडायला हवे आहेस आणि ती वस्तू उघडशील, तेव्हा समोर चांगली उघडायला हवी आहेस. मग तू दारात एक मनुष्य उभा असलेला बघशील, तेव्हा तू जोरात ओरड व म्हण, “ओहो, मला वाटले, की ममी आली आहे. समजले का?”

ती म्हणाली, “तू मला फार काही करायला सांगतो आहेस.”

मी बंदुकीची हालचाल केली व बोललो, “तुझा बांधा छान आहे. त्याचे दोन तुकडे करणे लाजीरवाणे आहे. या मऊ गोळ्या आहेत. मी जर गोळी मारली, चाप ओढला, तर गोळ्या तुझ्या पाठीच्या कण्यामध्ये व ढुंगणात जातील. दारातील पोलीसाला पुढची गोळी लागेल. मग मी आग लागल्यास पळायच्या वाटेने, धावत निघून जाईन.”

ती काही बोलली नाही आणि मी तिला बंदुकीने गोळी मारली. “चल, गुंडाळायच्या कागदाचे काय?”

तिने छोट्या स्वयंपाकघराचे दार उघडले. एक खण बाहेर ओढला. तिथे कागद व दोरा आहे.” मी बोललो, “तिथे खिडकीपासून लांब जा. तिथे कोपऱ्यात उभी रहा.”

मी लहानसे टेबल ओलांडले. तिथे चार पाच सिगरेटचे तुकडे व तुटक्या, जळक्या काड्या असलेला ॲश ट्रे होता. मी ॲश ट्रे एका बाजूला ढकलला. कागद बाहेर पसरला आणि माझ्या खिशातील कापूस बाहेर काढला. जेव्हा मी कापूस उघडला, तेव्हा तिने त्यातील चार मोठे मोती बघितले व ती अवाक झाली.

ती आठ ते दहा फूट लांब उभे राहून, कापसातील मोती बघत होती. तिला वाटत होते, की ती तयार पैशांकडे बघते आहे.

आपण मित्र होऊ शकत नाही का, असे विचारणाऱ्या नजरेने पहात, ती म्हणाली, “तू एवढेच घेतलेस?”

“मी एवढेच घेतले का?” असे बोलून मी राग दाखवत, चिडवल्यासारखे वाईट हसलो. मी तिला म्हटले, “तो सराफ, एका गिऱ्हाईकासाठी गेल्या दोन वर्षांपासून ते चार मोती घ्यायचा प्रयत्न करतो आहे. ते दक्षिणेकडील समुद्रातून आलेले खूप सुंदर खरे मोती आहेत आणि तुला माहिती करून घ्यायचे असेल, तर घे. मला माहिती आहे की नाक्यावर चोरी करण्यापूर्वी, त्यांनी काही कर भरलेला नाही.”

मी कापूस व मोती पुन्हा तिथे ठेवले. ते कागदात गुंडाळले. दोऱ्याने कागद बांधला व दिखावा करत, ढोंगीपणे टेबलाच्या कोपऱ्यात बंदुक रोखून ठेवली.

पुडक्यावर, पत्ता लिहिण्यासाठी, मी माझ्या खिशातील फाऊन्टन पेन काढले. जे माझ्या डोक्यात आले, ते पहीले नाव व लॉस एंजल्सचा पत्ता मी त्यावर लिहिला. मग माझा हात खिशाकडे गेला. मी माझे पाकीट बाहेर काढले व त्यातून पोस्टाचा एक स्टँप बाहेर काढला.

तिने विचारले, “किती? --- त्यांची किंमत किती आहे?

मी तिला सांगितले, “खरे तर त्यातील एका मोत्याची किंमत पाच हजारपेक्षा जास्त नाही. पण रंगसंगती साधणारे लखलखणारे ते चारही एकत्र घेतले, तर कुठल्याही माणसाच्या चाळीस हजार डॉलर किमतीच्या कणकेच्या गोळयाइतके आहेत. माझा किमतीचा अंदाज खोटा असल्याचे तिला वाटते आहे की काय, हे बघण्यासाठी मी तिच्याकडे एक नजर टाकली. तिला तसे काही वाटल्याचे दिसले नाही. तिच्या डोक्यात कल्पनांचा कल्लोळ उठल्याने, तिचे डोळे बारीक झाले होते.

तिने मला सांगितले, “मला वाटले, तू ते कुंपणात अडकवून ठेवशील आणि त्यांची फक्त एक दशांश किंमत घेशील.”

मी तिला बोललो, “चाळीस हजार डॉलरच्या एक दशांशमध्ये खूप मास व इतर पदार्थ भरलेले, भाजलेले हँबर्गर्स पाव येतील.”

ती लहान टेबलाकडे गेली. एक मांडी त्यावर टाकली व मऊ गाउन दुर्लक्ष करून, अर्धवट उघडा टाकला व मोत्यांमध्ये फार रुची घेऊन, ती रस्त्यावर आली आहे आणि तिथे साजेसे कपडे तिने घातलेले नाहीत, हे ती विसरली. त्या मुलीला बघायला खूप काही होते. ती खंत करत म्हणाली, “तू काम करणाऱ्या माझ्यासारख्या मुलीला अस्थिर केलेस. मला हजार डॉलर्स मिळवायला किती कष्ट करावे लागतील, याचा विचार कर.”

“तितके नाही.”

रागाने तिने तिच्याभोवती गाउन गुंडाळला. मग ती पुढे वाकली व बोटांमधून तो घरंगळू दिला व तो तिच्या कोमल पायांमधून खाली पडला.

ती बोलली, “मला वाटते, हा माझा दुष्टपणा आहे, पण मी असा विचार करू शकत नाही, की जे योग्य आहे, त्याच्या काही अंश किमतीला एखादी वस्तू विकणे म्हणजे लज्जास्पद आहे. मला वाटते, तुला एखादी चांगली दिसणारी, खरोखर कपडे घालू शकणारी, गुन्हा करायला मदत करणारी बाई मिळावी. तू तिला बाहुलीसारखी छान चिंध्यांनी नटवून सांटा बार्बारा, हॉलीवूड किंवा न्यू ऑर्लीन्समध्ये मिरवू शकशील. तिने मोठ्या भपकेबाज हॉटेलमध्ये रहावे, मित्र मिळवावेत आणि एखाद्या सभ्य मित्राला शेवटी मिठी मारून व त्याच्याजवळ काही मौल्यवान चीजवस्तू ठेऊन, पण नंतर सोडून देऊन त्याला आपले गुपित सांगावे. त्याच्याकडून चांगले कर्ज उपटावे. अरेच्च्या, तुला माहिती आहे, असे खेळ खेळायचे अनेक मार्ग आहेत.”

मी शांतपणे, गंभीर हसू हसलो व म्हणालो, “मुली, तिथे तुझ्याकडे काहीतरी आहे. पण ते फक्त कपडे घालणाऱ्या मुलीलाच मिळेल. जी मुलगी त्यांना पाडू शकेल, तिलाच ते नेतील. आणि ते करतांना, ती तिचे डोके शाबूत ठेवेल. ते भरभर विचार करणाऱ्याला आणि शंभर टक्के प्रामाणिक असणाऱ्याला नेतील. तुला असे भले मोठे दुकान कुठे मिळणार आहे?”

ती टेबलापासून दूर गेली. खांद्याने लहानसा धक्का दिला आणि मऊ कापडाचा गाउन खाली जमिनीवर घसरला. पिचच्या रंगांच्या अंतर्वस्त्रांची जाहिरात करत असल्यासारखी, ती गोल फिरली.

ती म्हणाली, “मी कपडे घालू शकते.”

मी माझ्या डोळ्यातून संशय दाखवला. मी तिला म्हणालो, “हो, तू ते शेवटपर्यंत ताणू शकतेस. पण जर मला कोणी बक्षिसाची लालूच दाखवली, तर तू मला उगीचच काही बिनमहत्त्वाचे सांगत बसणार नाहीस कशावरून?"

तिचे डोळे आता चकाकणारे झाले होते. ती माझ्याकडे आली व बोलली, “मला आवडणाऱ्या लोकांना मी छेडत नाही.”

“मला तर तू बघितल्यापासून आवडलीस --- तुझ्या आवाजात व दिसण्यात काही आहे. ते काय आहे, मला माहिती नाही. जेव्हा मी [प्रेमात] पडतो, तेव्हा झटपट व पूर्णपणे पडतो आणि मी सतत खेळ खेळतो. आपण दोघे मिळून खूप ठिकाणांना भेट देऊ शकतो. उद्दीपन होणे थांबेपर्यंत, मी तुला इथे ठेऊ शकतो. मग आपण फिरायला जाऊ आणि --- “

मी संशयाने बोललो, “तू मला झुलवते आहेस का?”

ती रागाने म्हणाली, “झुलवते आहे? जिला कोणाला झुलवावे लागावे, अशा प्रकारची मुलगी मी दिसते का? मी इतकी मुकी नाही. मला माहिती आहे, की माझा बांधा चांगला आहे. पण मला मोठ्या सदनिकेत कोणा माणसाबरोबर बिले भरतांना, तू बघत नाहीस का? मी फक्त एक काम करणारी सरळमार्गी मुलगी आहे आणि प्रगती करू इच्छित आहे. मी असे म्हणत नाही, की मला हे आवडते. पण मला त्याचा कंटाळा आला आहे, असेही नाही. पण मी तुला सांगते, की आपण एकत्र वेगवेगळ्या ठिकाणी जाऊ शकतो. तू माझा उपयोग करू शकतोस आणि मी तुला साथ देईन.”

मी निर्णय घेण्याचे टाळत म्हटले, “मुली, आता एक मिनिट थांब. मी या पार्सलला स्टँप लावतो आणि त्यावर मिनिटभर विचार कर. तू मला नक्कीच मी जात

आहे असे समजलीस. जळो! कित्येक महिन्यात मी नाजुक व अशक्त अशा कुणाला पाहीले नाही, त्यामुळे मी गोंधळून गेलो आहे आणि आता तू येऊन मला तुझ्या कमनीय आकृतीचा झगमगाट दाखवून भुलवते आहेस. मुली, ऐक --- “

मी स्टँप माझ्या जिभेला लावले, चाटले आणि ते पार्सलला लावायला लागलो. स्टँप चिकटले. पण माझ्या अंगठा ओला चिकट झाला. मी अंगठा झाडायला लागल्यावर स्टँप खाली पडला व वाऱ्यामुळे गरगर फिरू लागला. मी त्यामागे धाऊ लागलो. मला टेबलाच्या दुसऱ्या बाजूने हालचाल जाणवली. मी सरळ झालो व तिने पळवलेल्या बंदुकीच्या टोकाकडे बघू लागलो.

ती बोलली, “अरे फसव्या, आता धाऊन, ती घ्यायचा प्रयत्न कर.”

मी स्नायु ताणलेल्या अवस्थेत उभा राहिलो. माझे हात हळूहळू वर येऊ लागले. “मुली, आता जास्त गडबड करू नकोस. तू मला मारणार नाही आहेस.”

ती बोलली, “मारणार नाही आहे, असे समजू नकोस. मी तुला एका मिनिटात मारणार आहे. मी पोलिसांना सांगणार आहे, की तू इथे सराफाला गंडा

घातल्यावर घुसलास आणि मी खूप वेळ तुझे लक्ष बंदूक पकडण्यापासून वळवले. ती तू मला मारण्यासाठी पकडलीस. मी स्वसंरक्षण केले.”

मी हात वर ठेवत, तिला म्हणालो, “मुली, आता ऐक. आपण या बाबतीत जरा विचारपूर्वक वागू. मला वाटले, तू आणि मी लांब जाणार आहोत. मी तुला लंडन आणि पॅरीस दाखवेन. शिवाय --- “

ती रागाने हसून बोलली, “तुझ्यासारख्या मूर्खाबरोबर फिरायला, मी काही गोड पाणी नाही. सुंदर पायांची जोडी आणि तुझी बंदुक वगैरे सर्व काही तू विसरलास व जमिनीवर पडलेल्या पोस्टाच्या स्टँपच्या गडबडीत, ती टेबलावर ठेऊन दिलीस.”

मी विचारले, “तू पोलिसाला बोलावणार आहेस?”

ती हसली. “मी मुकी दिसते का? मी तुला निसटून जायची संधी देणार आहे.”

“का?”

“कारण तुझ्यासारखा देखणा माणूस तुरुंगात गेलेले मला पहावणार नाही. मी पोलिसांना बोलावून असे सांगणार आहे, की मी तुला पॅसेजमध्ये पाहीले. मी तुला दहा सेकंद इकडेतिकडे फिरायची परवानगी देते आणि पोलिसांना बोलावून, कोणी तुला पाहिले, तर मी त्यांना काय ते खरे सांगते.”

मी राग दिसेल अशा फसव्या पद्धतीने बोललो, “ओहो! असे आहे का, म्हणजे तुला असे म्हणायचे आहे, की तू मला फासात अडकवणार आहेस.”

तिने विचारले, “तुझ्या डोक्याच्या घुमटातून कल्पना भरभर बाहेर पडत नाहीत का?”

बांधलेल्या कागदाच्या पार्सलकडे मी हात पुढे करून वळलो. पण बंदूक माझ्या छातीच्या उंचीला रोखून ठेवलेली होती. तिचे डोळे चकाकले. ती म्हणाली, “अरे मूर्खा, मला घाईगर्दी करू नकोस. तुझ्या सर्व बिनडोक कृत्यांमधील हे सर्वात बेकार आहे. मी ते करेन आणि असे वाटून घेऊ नकोस, की मला बंदूक चालवता येत नाही. मला ती चालवता येते.”

मी हळूहळू लांब निघून गेलो.

ती म्हणाली, “दार तिथे आहे. चालता हो. ती फोनकडे निघाली व बोलली, “मी पोलिसांना बोलावणार आहे. तुझ्याकडे दहा सेकंद आहेत.”

नाटक चांगले वठावे, म्हणून मी खूप शिव्या दिल्या. मी हिसका देऊन, दार उघडले व पॅसेजमध्ये उडी मारली. आग लागल्यास निसटायच्या जिन्याच्या दिशेने मी पायाने जोरजोरात आवाज केले व गुपचूप हलक्या पाऊली परत आलो. मी धातूचा आवाज ऐकला. तिने सदनिकेच्या दारावर, गोळी मारली.

काही मिनिटे थांबल्यावर, मी एका गुडघ्यावर उभा राहीलो आणि दाराच्या भोकातून डोकावलो. ती टेबलाशी होती. पार्सलचे आवरण काढत होती. मी सरळ झालो व दारावर टकटक केले.

मी घोगऱ्या आवाजात म्हणालो, “पोलीसांशी बोलण्यासाठी फोन. दार उघड.” तिचा आवाज झोपेने घट्ट झाल्यासारखा वाटत होता.

“काय आहे?” मी बोललो, “पोलीस.” व पुन्हा दाराच्या भोकाला डोळा लाऊन बघायला लागलो. ती गालीचाच्या कोपऱ्यात धावली. तो उचलला व जमिनीला काहीतरी केले. मग किमोनो ताणला. मी परत नखांनी दारावर टकटक केले.

ती मरगळलेल्या अवस्थेत बोलली, “येते.”

तिने कडी काढली. वर्तमानपत्राच्या रुंदीइतके दार उघडले व विचारले, “तुला काय हवे आहे?”

तिला मी दिसू नये म्हणून मी कडेला उभा राहीलो.

“खालील सराफाच्या दुकानातून चोरी झाली आहे. त्या चोराला आम्ही शोधत आहोत.” मी माझा घसा खाखरला. “आम्हाला वाटते, तो इथे आला आहे.”

“नाही, इथे कोणी आले नाही."

“तुम्ही मला आत घ्याल का?”

तिने क्षणभर चलबिचल केली व मग म्हणाली, “ओहो, ठीक आहे. जर तुम्हाला आत यायचे असेल --- मला वाटते यायचे आहे, तर एक मिनिट. मी काहीतरी चालू करते --- ठीक आहे, या.”

तिने परत दार उघडले. मी खोलीत शिरलो व लाथेने दार लावले. ती माझ्याकडे मोठ्या भीतीदायक डोळ्यांनी बघू लागली. मग मागे उडी मारून म्हणाली, “ऐक, तू हे ओढू शकत नाहीस. इथे पोलीस येतील. मी --- “

मी सरळ गालीचाच्या कोपऱ्याशी चालत गेलो. ती माझ्यावर धाऊन आली. मी तिला ढकलले. मी गालीच्याचा कोपरा उचलला पण मला जमिनीशिवाय काहीच दिसले नाही. पण मला ते तिथे असल्याचे माहिती होते. मी बोटांनी चाचपडत, शोधत राहिलो. अचानक मला ते सापडले --- जराशा लबाडीने

जोडलेला कडक लाकडातील भाग. मी तो उघडला. माझे पार्सल तिथे कोंबलेले होते आणि खाली बरीच पत्रे होती.

मी काय करतो आहे, हे न दिसेल अशा तऱ्हेने अंग चोरून, मी मोती आणि पत्रे बाहेर काढली व माझ्या कोटाच्या आतल्या खिशात टाकली. मी सरळ झाल्यावर मला माझ्यावर बंदूक रोखलेली दिसली.

तिने धमकी दिली, “मी तुला सांगितले, की तू हे घेऊन बाहेर जाऊ शकत नाहीस. तू सराफाकडे चोरी केल्याचे मी सांगेन आणि मग इथल्या इथे तुला पकडले जाईल. तू त्याबद्दल काय करणार आहेस?”

मी हसत म्हणालो, “काही नाही. मी ज्यासाठी आलो होतो, ते सर्व काही माझ्याकडे आहे.”

ती बोलली, “मी तुला ठार करु शकते. पोलीस माझे आभार मानतील.”

मी म्हणालो, “तू ते करू शकतेस. पण चांगल्या मुली माणसांना मारत सुटत नाहीत.”

भावनातिरेकाने, तिचा चेहरा वाकडा झालेला मी पाहीला. ती बोलली, ”ते गेले खड्ड्यात!” व चाप ओढला.

रिकाम्या सिलिंडरवर हातोडा आपटला. तिने उजव्या हाताचे मधले बोट डाव्या हाताच्या मधल्या बोटाने दाबून धरले. तिचे डोळे आग ओकत होते. तिने सहा वेळा रिकाम्या सिलिंडरवर आवाज केला आणि मग माझ्यावर बंदूक रोखली. मी माझ्याजवळील पिपाने तिचा नेम रोकला व बाजूला होऊन, तिची झेप चुकवली. तिने खुर्चीवरून उडी मारल्याने, ती सोफ्यावर पडली.

मी बोललो, “अग मुली, हळू! हळू!”

तिने मग तिचा आवाज वाढवला व मला शिव्या देऊ लागली. पहिल्या वीस सेकंदांनंतर, मी अशा निष्कर्षाला पोचलो, की तिला माहिती नसलेल्या शिव्या मलाही माहिती नाहीत. मी दाराकडे निघालो. ते दार लावतांना व पॅसेजने शांतपणे बाहेर पडतांना, ती फोनकडे धावली व किंचाळू लागली. “पोलिसांचे मुख्यालय!”

हॉलच्या वाटेत मी बोर्ड व मास्क काढून टाकला. थोडा कापूस बेन्झीनमध्ये ओला करून, चिकटपट्टीच्या जागी चेहऱ्यावर व कपाळावर लावला. मी मास्क चेंडूसारखा गोळा केला. माझ्या गाडीकडे जाऊन, ती चालवत, निघून गेलो.

मी तीन चौक पलीकडे गेल्यावर, पोलिसांचा गाडीचा भोंगा ऐकला. मी ताशी साठ मैल वेगाने मशीनचा आवाज करत, जाऊ लागलो.

पेम्बरटन घराच्या पॅसेजने चालत, त्याच्या दारावरून जात मी खोकलो. मी माझ्या झोपायच्या खोलीत गेलो व थांबलो. काही झाले नाही. मी पत्रे बाहेर काढून त्यांच्याकडे पाहीले. ती गरम आणि कोरडी होती. काही लोकांना मनातले विचार लिहायला आवडतात. हार्वे पेम्बरटनने त्याचा कडेलोट केला होता.

मला दार खरवडल्याचा आवाज आला. मग ते हळूच उघडले. मिसेस पेम्बरटन चालायचा काळजीपूर्वक सराव केल्यासारखी, खोलीतील उजेडात आली व तिच्याभोवतीच्या लेससारख्या वस्तू तिच्याभोवती ओढल्या. ती बोलली, "माझा नवरा अजून आला नाही. पण आता कधीही येईल."

मी तिच्याकडे पाहीले. मी म्हणालो, "जरी मानले, की मी तुझा भाऊ आहे, तरी तुला असे वाटत नाही का, की तू जास्त आश्वासक/ चांगले असे काही केलेस, तर त्याला आवडेल?"

ती बोलली, "मी मला पाहिजे ते घालेन. शेवटी तू माझा भाऊ आहेस."

"मग जा आणि त्यावर अंघोळीचा टॉवेल घाल. म्हणजे मी इतक्या घाईने ते विसरणार नाही."

ती दाराच्या दिशेने एक दोन पाऊले हलली. मग थांबली व बोलली, "तुला इतके पारंपारिक रहाण्याची गरज नाही."

"असे तुला वाटते."

"तुला काय सापडले, ते मला जाणून घ्यायचे आहे."

मी तिला म्हणालो, “तू आता संकटातून बाहेर पडली आहेस. आता आपल्याला कसली गरज आहे, तर --- “ बाहेर मोटारीचा आवाज ऐकून, मी थांबलो. तिथे मोटारीजवळ जोरजोरात गुरगुरल्यासारखी, मला न आवडणारी, काही व्यायसायिक चर्चा चालली होती. मोटार थांबायला आल्यावर, कुणीतरी रबरी बूट घातले.

ती म्हणाली, “तो हार्वे आहे.”

मी विचारले, “हार्वे त्याची गाडी पुढील बाजूला दगडाशी लावणार नाही, लावेल का?”

तिने कबूल केले, “नाही.”

मी तिला सांगितले, “तुझ्या खोलीत परत जा.”

“पण मला कळत नाही, तू का एवढा --- “

मी बोललो, “चल, निघ.”

ती बोलली, “ठीक आहे, महाशय.”

ती पॅसेजच्या दिशेने तिच्या खोलीकडे चालू लागली. मागील दाराने घरात कुणी धावत गेल्याचा आवाज मी ऐकला. मग मी जिन्यावर पाऊले वाजलेली ऐकली. पोर्च ओलांडून, चार पाच वेळा खूप वेळ दाराची घंटी वाजली. मी माझ्या रिकाम्या बंदुकीत काही शिंपले भरले. दिवा मालवला. दार उघडले. माझी बॅग उचलून थांबलो.

मी मिसेस पेम्बरटनला जिन्याशी उभे असलेले ऐकले. क्षणभराने, ती खाली येऊ लागल्यावर, मी तिच्या कपड्यांची सळसळ ऐकली. मी हॉलच्या दाराशी येऊन शांतपणे थांबलो.

मी तिला बोलतांना ऐकले ."हे कोण आहे?" आणि बंद दाराआडून, उत्तर उमटले, "पोलीस. दार उघडा."

"पण मला --- कळत नाही."

"दार उघडा."

तिने दार उघडले. मी माणसांना आत येतांना ऐकले. मग एक माणूस बोलला, "मी लेफ्टनंट सिल्व्हेस्टर आहे. मला तुमच्याशी बोलायचे आहे. तुम्ही मिसेस पेम्बरटन का?"

"हो. पण मला समजत नाही, आता यावेळी तुम्ही इथे कसे काय आलात? लेफ्टनंट, शेवटी मी --- "

लेफ्टनंट मध्येच बोलला, "मला माफ करा. हे तुमच्या नवऱ्यासंबंधी आहे. तुम्ही त्याला शेवटचे केव्हा पाहीले?"

'क? आज संध्याकाळी."

"किती वाजता?"

"का?"

"मला नक्की आठवत नाही."

"तुम्ही त्याला कुठे पाहीले?"

"तुम्ही मला कृपया हे प्रश्न विचारण्याचे कारण सांगाल का?"

त्याने परत विचारले, "तुम्ही तुमच्या नवऱ्याला शेवटचे केव्हा पाहीले?"

"ठीक आहे, जर तुम्ही मला उत्तर देण्याचा आग्रह करत असाल, तर तो इथे रात्रीच्या जेवणासाठी होता व नंतर कार्यालयात जाण्यासाठी साडेसातला निघाला."

"आणि त्यानंतर तुम्ही त्याला पाहीले नाही?"

“नाही.”

ऑफिसर म्हणाला, “मला माफ करा, मिसेस पेम्बरटन. पण तुमच्या नवऱ्याचे प्रेत त्याच्या कार्यालयातील जमिनीवर पहारेकऱ्याला अर्ध्या तासापूर्वी सापडले आहे.”

ती किंचाळली, “माझ्या नवऱ्याचे प्रेत!”

लेफ्टनंट बोलला, “हो, बाईसाहेब. बत्तीस असा भोकाचा व्यास असलेल्या बंदुकीच्या दोन गोळ्यांनी त्याला ठार करण्यात आले आहे. सुटलेल्या गोळ्या तेथील जमिनीवर सापडल्या आहेत. कडेच्या कार्यालयात, एक खराब बाक, काही खुर्च्या व एक वायरने जोडलेले आवाज रेकॉर्ड करायचे मशीन सापडले आहे. त्या टेबलाच्या खणात, आम्हाला ज्याने खून केला गेला, ती बंदूक मिळाली. मिसेस पेम्बरटन, आता तुम्हाला यासंबंधी काय माहिती आहे?”

तिथे एक दोन क्षण शांतता पसरली. मग ती घाबरलेल्या आवाजात बोलली, “का? मला यासंबंधी काही माहिती नाही.”

“तुमच्या नवऱ्याच्या कार्यालयाशेजारील कार्यालयाबद्दल तुम्हाला काय माहिती आहे?”

“काही नाही.”

“तुम्ही कधीच तिथे गेला नव्हतात का?”

यावेळेस तिने मागेपुढे केले नाही. ती म्हणाली, “नाही. कधीच नाही. तुम्हाला असे का वाटते, की मी माझ्या नवऱ्यावर हेरगिरी करत होते? कदाचित कुणी गुप्तहेर भाड्याने आणले असतील. *मला* काही माहिती नाही.”

मी हळूच माझ्या खोलीत परत आलो. माझी बॅग उचलली व शांतपणे पॅसेजमधून मागील जिन्याकडे जाऊ लागलो. पुढील दाराने मला एका माणसाचा पुसट हलकासा आवाज येत होता. थोडया थोडया वेळाने मिसेस पेम्बरटनच्या किंचाळया व अर्धवट वेडीवाकडी उत्तरे ऐकू येत होती.

मी मागील जिन्याने खाली आलो. मागील दारात एक काचेची खिडकी होती. त्यावर कौले होती. मी कोपऱ्यातील कौल उचलले. मला मागील अंगणातून येणाऱ्या उजेडात माणसाची एक जाडजूड आकृती दिसली. त्याने त्याच्या हातात मोडलेली पोलिसांची बंदूक धरलेली होती. मी खिशातून विजेरी काढली व स्वयंपाकघर शोधू लागलो. मला भुयारात जायचा रस्ता सापडला व मी त्यातून खाली गेलो. वरील मजल्यावरून, खुर्च्यांचे मोडतोड झालेले तुकडे व भुस्सा वगैरे येत होते. घरात चालणाऱ्या पायांचा आवाजही येत होता. तळघरात एक लहानशी खिडकी होती. मी त्यातील कोळीष्टके झाडून, माझ्या हातावर चालणारे काही कोळी हाकलले. मी गणवेषाच्या लांब कापडाचा वरील भाग ओढून उघडा केला. तो बिजागऱ्यांवर ओघळला व आतून लोंबू लागला. मी माझी बॅग ओढून बाहेर काढली. त्या बाईच्या चांगल्या नशीबासाठी प्रार्थना केली व उडी मारली. माझ्या भुवयांवर सिमेंट पडले. मी वरखाली व गोलगोल फिरलो. स्वतःला वर खेचले. खिडकीच्या कडेपासून माझे गुडघे पकडले जाऊन, वर येण्यापासून मी स्वतःला वाचवत होतो. हात पाय वापरून, मी वर हिरवळीवर चढलो.

कोणीही घराच्या या बाजूकडे लक्ष देत नव्हते. मी माझी बॅग उचलून, हळूच हिरवळ ओलांडून, कुंपणातून वाट काढत, पुढील कुत्रा भुंकत असलेल्या अंगणात गेलो. मी फूटपाथकडे पाठ केली व भरभर चालायला सुरवात केली. मी खांद्यावरून मागे बघितले. मला पेम्बरटन घराच्या दुसऱ्या मजल्यावर उजेड दिसला.

मी जास्त भरभर चालू लागलो.

रस्त्यावरील एका फोन बूथवरून, मी वयस्क, जोनाथनसाठी लांब अंतराचा फोन लावला. त्याला झोपेतून जागे केल्याने, तो फारसा खूष नव्हता. पण मी त्याला कुरकुर करायला काही संधी दिली नाही.

मी सांगितले, “इथे तुझे गिऱ्हाईक त्रासात आहे.”

तो बोलला, “ठीक आहे. पण सकाळपर्यंत थांब.”

“नाही. मला नाही वाटत, की मी थांबू शकेन.”

“कारण काय?”

“तिला तुरुंगात घालवले जाते आहे.”

“कुठल्या कारणासाठी ती तुरुंगात जाते आहे?”

“तिच्या नवऱ्याच्या बत्तीस क्रमांकाच्या स्वयंचलित कॅमेऱ्यातून, त्याच्या परवानगीशिवाय त्याचे बरेच फोटो काढल्याबद्दल.”

“तिने त्याला मारले का?”

"ती संशयाच्या केंद्रस्थानी आहे."

“तू आता कुठे आहेस?”

मी त्याला सांगितले, “न्यायापासून दूर पळणारा मी, रस्त्यावरील एका फोन बूथवरून फोन करतो आहे. जिथे फोटो घेतले गेले, तिथे तिच्याबरोबर मी होतो, हे पहारेकरी सांगू शकेल. पहारेकरी तिच्या आज्ञेत आहे. ती तिची बोटे चालवते, तेव्हा तो खाली झोपतो. तिला असे वाटते, की ती मला पण तसे तिच्या ताटाखालचे मांजर बनवू शकेल."

“म्हणजे फोटो काढल्याचा आळ तुझ्यावर घेऊन?”

“तेच.”

“असे तुला का वाटते?”

“मी काही स्त्रियांवर तुझ्यापेक्षा जास्त विश्वास ठेवतो व काही स्त्रियांवर, त्या खड्ड्यात जावोत, असे म्हणून, खूप कमी विश्वास ठेवतो.”

“आता तू जे बोललास, त्यावर मी खूप कमी विश्वास ठेवतो.”

जोनाथन परीक्षा घेत बोलला, “ती गिऱ्हाईक आहे. ती असे करणार नाही.”

मी त्याला म्हटले, “ती गिऱ्हाईक आहे, हे मला माहिती आहे. तुझ्या बाबतीत ती घुतल्या तांदुळासारखी असेल, पण माझ्या बाबतीत तसे नाही. मी तिला बंदूक तिच्या हातातील बॅगेतून बाहेर काढू दिली नाही. जेणेकरुन तिला ती वापरायचा मोह होऊ नये. असे करतांना त्यावर माझी बोटे उमटली. जेव्हा काही विपरीत घडू लागले, तेव्हा ती त्याचा विचार करेल आणि ती जे सुचवेल, त्याला पहारेकरी हो हो करेल.”

त्याने वर घशाला जीभ लाऊन काही आवाज काढले. तो बोलला, “इथे खाली बॉनिफेसला मी उभे केले आहे. तो तुला कुठे शोधणार?”

“कुठेच नाही.” एवढे बोलून मी सटकलो.

डेपोशेजारी एक रात्रभर उघडे हॅंबर्गरचे दुकान होते. मी खूपशा कांद्याबरोबर सहा हॅंबर्गर मागवले आणि ते बाहेर नेण्यासाठी मला एक पिशवी मिळाली. डायना लॉक रहात होती, त्या सदनिकेच्या इमारतीपासून समोर एक लॉज होते. मी तिथे गेलो. त्या जागेची मालकीण उशीरा आल्याबद्दल कुरकुरली. पण मी दोन दिवसांचे भाडे आगाऊ भरले, तेव्हा तिने मला पुढील बाजूची एक खोली दाखवली. मी तिला म्हणालो, मी दिवसा झोपतो व रात्री काम करतो. कृपया मला कोणी त्रास देऊ नका.”

मी तिला माझे नाव सिएटलचा पीटर जे गिबन्स असे सांगितले. तिने झोपेत ते ऐकले व निघून गेली. मला खोलीत एक 'मला त्रास देऊ नका.' असा बोर्ड दिसला. तो दाराबाहेर टांगून ठेवला. मी दार कुलुपबंद करून झोपलो.

दुपारी तीन वाजता, कुण्या शत्रूची चाहूल घेऊन माझा बेत ठरवायला बाहेर पडलो. टेबलावर वर्तमानपत्रे होती. मी त्यातील एक उचलले. एक नाणे ठेवले आणि परत खोलीत गेलो.

वरच्या पानावरील माझे स्वतःचे चित्र माझ्याकडे बघत होते. 'शहरातील महत्वाच्या कायद्याच्या कंपनीशी संबंधित अशा पीटर वेनिक याला स्थनिक पोलीसंनी पेम्बरटन खुनाची चौकशी करण्यासाठी निवडले आहे.' हे मोठ्या काळ्या अक्षरात होते. ही मोठीच बातमी होती. मिसेस पेम्बरटन यांनी "सर्व काही सांगितले." असे छापले होते. तिने त्या काही ब्लॅकमेल करणाऱ्या पत्रांच्या संदर्भात कायद्याच्या कंपनीचा सल्ला घेतला होता. त्या कंपनीने ते तसे असल्याचे सांगितले होते. मी लेगमन व गुप्तहेर असल्याचे सांगितले होते. मला परिस्थिती शोधून काढायला व पुराव्याचा अहवाल द्यायला सांगण्यात आले होते. तिने मला कार्यालयात नेले. तिथे तिच्याबरोबर मित्रवत पहारेकरी होता व कॅसेट रेकॉर्डर तयार होता. केसमधील बाई व तिचा नवरा यांच्यातील संभाषण मी ऐकले.

बाथरुममध्ये जाण्यापूर्वी, मी रात्रीचे कुलूप कार्यालयाच्या दाराला अडकवले, जेणेकरून, मी कधीही परत येऊ शकेन. जेव्हा आम्ही निघालो, तेव्हा ती दाराला कुलूप लावायचे विसरली.

त्यामुळे, मी खोलीत परत येण्याची संधी घेतली. आम्ही तेथून निघालेले पहारेकऱ्याला आठवत होते. नंतर सुमारे तासाभरानी त्याने दबलेले दोन बंदुकीच्या फटक्यांसारखे आवाज ऐकले. त्याला वाटले, की ते एका ट्रकमधून आले. तो

तळघरात वाचत होता. मागील इमारतींकडे जाणाऱ्या अरुंद रस्त्यातून ते आवाज आले होते. पण एका जवळील इमारतींवर आपटून त्यांचा प्रतिध्वनी आला असावा. वैद्यकीय अधिकाऱ्याने मृत्यूची वेळ बहुधा आम्ही इमारत सोडल्यापासून, अर्धा ते दीड तास ठरवली.

मिसेस पेम्बरटन, घरी जाण्याविषयी आग्रही होती आणि मी लगेच बाहेर गेलो. मी कुठे गेलो, ते तिला माहिती नव्हते. मी तिला हे सांगण्यासाठी परतलो, की माझ्याकडे तिच्यासाठी एक चांगली बातमी आहे. पण मी काही सांगण्यापूर्वी, तिच्या नवऱ्याच्या मृत्युच्या बाबतीत चौकशी करण्यासाठी घरी पोलीस आले. पोलीस घरात तपास करत असतांना, मी तळघराच्या खिडकीतून माझी सुटका करून घेतली.

पेम्बरटनचा भागीदार, आर्थर बासने सांगितले होते, की गेले काही दिवस पेम्बरटन फार काळजीत होता व त्याने जाहीर केले होते, की त्याला लवकर पैसे जमवण्याची गरज होती. त्यामुळे त्याने बाजारभावापेक्षा कमी किमतीला त्याच्या वाट्याचा व्यवसाय विकायची तयारी दर्शवली होती. बासने शेवटी नाईलाजाने काही किंमत देण्याची तयारी दाखवली होती पण पेम्बरटनने ती मान्य करू नये, असेही बजावले होते. जेव्हा पेम्बरटनने इतकी कमी रक्कम घ्यायचे नाकारले, तेव्हा बासने विजयोत्सव साजरा केला. कारण त्याला पेम्बरटनसारख्या भागीदाराला सोडायचे नव्हते. यावर चर्चा करण्यासाठी, पेम्बरटनच्या विनंतीवरून तो त्याला भेटला.

त्या जिल्ह्याचा वकील जाहीर करत म्हणाला, की त्याने या केसमधील स्त्रीची मुलाखत घेतली आहे. पेम्बरटनने तिला जितका त्रास देता येईल, तितका दिला आहे व बाहेरील कुण्या टॉमने तिच्या सदनिकेचे दार उघडून आत घुसत, पेम्बरटन साधारण ज्या वेळेला मेला, त्यावेळी पोलिसांना फोन करायला लावले आहे. पोलिसांनी तिला दोषमुक्त केले आहे. असे दिसते आहे की हा तिच्या घरात घुसलेला टॉम

नक्कीच कारवाईत काही विघ्न आणतो आहे. त्याने तिला सांगितले आहे, की त्याने खालील सराफाचे दुकान लुटले आहे. तिने लगेच ते पोलिसांना कळवले आहे. पोलीस तिच्या सदनिकेत आले आहेत. त्याना ती फारच कमी कपडे घातलेली, फार उद्दीपित झालेली, आतून हललेली व वरवर तरी गंभीर दिसते आहे. पोलिसांनी रेकॉर्ड केलेल्या फोनमध्ये, पहारेकऱ्याने ऐकलेल्या व संशयातीतपणे मिस्टर पेम्बरटनचे प्राण घेणाऱ्या बंदुकीचा आवाज ऐकला, तीच वेळ होती.

तिच्या समक्ष पुराव्याला काही आधार मिळाला नाही, अशी बातमी दिली गेली. पण पोलीस तिला गुन्ह्यातून वगळण्याच्या मागे असल्याचे व पेटे वेनिकला, लेगमनला कायद्याच्या कार्यालयासाठी शोधत असल्याचे दिसते आहे.

कायद्याच्या कंपनीतील सभासद, सेड्रीक बोनिफेसला चालू घडामोडी ऐकून फार धक्का बसला. तो धावत त्या शहरी आला व पॅलेस हॉटेलमध्ये उतरला. त्याला आतापर्यंत अधिकाऱ्यांनी मिसेस पेम्बरटनला भेटू दिले नव्हते. पण दुपारी लवकर ते त्याला तसे करून देण्याची शक्यता होती. मिस्टर बोनिफेस म्हणाले, "मिस्टर वेनिक बहुधा निर्दोष सुटतील."

एवढेच झाले.

गंमत म्हणून, मी खासगी लोकांकडे वळलो. ती माझी सवय आहे. मी त्यांच्याबद्दल नेहमी कुठल्याही वर्तमानपत्रात अशा ठळक मजकुराखाली वाचतो, 'वर्गीकरण करण्यास कठीण' मी मला रुची वाटणाऱ्या मजकुराकडे आलो. तो असा होताः पी डब्ल्यू, मी तुला मदत करू शकतो का? मला कुठल्याही कारणाने फोन कर, एम. डी."

आता तिथे एक मुलगी होती! वयस्क इ बी जोनाथन त्याच्या गुंडाळलेल्या, विखुरलेल्या, कावीळ झालेल्या लैंगिकतेच्या कल्पनांविषयी त्याच्या अशील बायका सोडून सर्वांवर संशय घेत असे. त्या बायका त्याला घाबरून असत. मला सापडतील तशा बायका मी घेत असे. मे डीव्हर्स नेहमी माझ्या बाजूने राहिली.

मिसेस पेम्बरटन रेशमाची जाहिरात करणाऱ्या मिरवणुकीत होती आणि मी तिला अंघोळीचा गाउन घालून यायला सांगितल्यावर, मला महाशय म्हणाली होती. जर काही वेडेवाकडे झाले असते, तर तिने मला लांडग्यांच्या तोंडी दिले असते. प्रश्न असा होता, की एक तर मी बाथरुममध्ये असतांना, तिने तिच्या नवऱ्याला मारले होते किंवा नंतर जाऊन मारले होते आणि मुद्दाम होऊन मला पोलिसांच्या हाती दिले होते. जर तिने असे केले असेल, तर तिने खूप चांगले काम केले होते. रात्रीच्या जेवणात, बरेच हॅम्बर्गर होते. साधारण पाच वाजता, मी

खिडकीसमोर एक खुर्ची ओढली व निरीक्षण करू लागलो. लाल डोकेवालीने मला घरात घुसलेला टॉम असल्यावरून, शिव्या दिल्या होत्या आणि आता परत मी तसा होणार होतो.

मी डायना लॉकला जातांना किंवा येतांना पाहीले नाही. मला माहिती असलेल्या दुसऱ्या कुणाला पाहीले नाही. अंधार झाल्यावर, डायनाच्या सदनिकेत दिवा लागला. मी तिथे बसून वाट बघत राहिलो. साधारण नऊ आजता, मी दुसरा हॅम्बर्गर खाल्ला. मी वाट बघून कंटाळलो आणि मी नेट लावून खेळायचे ठरवले. मी बास आणि पेम्बरटनच्या कंपनीच्या कार्यालयाचा फोन क्रमांक बघून लक्षात ठेवला.

तो ४९१ होता. मी दाढी केली, केस विंचरले. माझ्या कुठल्याही मित्राने न बघितलेला सूट घातला. रस्ता ओलांडला. जिना चढून, सदनिका ३ अ चे दार वाजवले.

एकदम काही झाले नाही. मी एका गुडघ्यावर बसून, दाराच्या भोकातून बघत, वाळलेले च्युईंगगम खाल्ले. ती कपडे घातलेल्या अवस्थेत दाराकडे येत होती. ती दाराशी आल्यावर, मी सरळ झालो. तिने दार उघडून विचारले, “हे काय आहे?”

मी बारीक, उंच पट्टीतील, नाकातील आवाजात बोललो. “मी पोलिसांकडून आलो आहे. काल रात्री तुम्ही पोलिसांच्या मुख्यालयाला केलेल्या फोनची खात्री करायला, मी आलो आहे.”

तिने मला मास्कशिवाय कधी पाहिले नव्हते. तिने विचारले, “हो. तुम्हाला काय हवे आहे?”

मी म्हटले, “मला तुम्ही केलेला फोन तपासून बघायचा आहे. जर तुमची हरकत नसेल, तर मी आत येऊ का?”

तिने काही म्हणण्यापूर्वी मी आत आलो होतो. मी खुर्चीकडे चालत गेलो व बसलो. ती दुसऱ्या खुर्चीत बसली.

मी बसलेली खुर्ची कोमट होती. मी बोललो, “मला सांगा, ही तुमची खुर्ची होती का?”

तिने सांगितले, “नाही. मी या खुर्चीत बसले होते.”

ती माझ्याकडे बघून बोलली, “मी तुम्हाला यापूर्वी पाहीले आहे. मला तुमचा चेहरा पुसटपणे ओळखीचा वाटतो आहे. मी तुमचा आवाजही कुठतरी ऐकला आहे.”

मी तिच्याकडे बघून हसलो व म्हणालो, “मी कधीच एखाद्या बाईला खोटे ठरवत नाही. पण जर मी तुम्हाला भेटलो असेन, तर मला ते नक्की आठवते.”

यावर ती हसली व तिचे पाय फुलीसारखे करून बसली. मी ॲश ट्रेकडे बघितले. त्यात सिगरेटचे दोन तुकडे होते. दोन्हीही सावकाश जळत होते. तिथे फक्त एकच दोन तुकड्यात मोडलेली काडी होती.

ती माझ्या डोळ्यांची दिशा पाहून हसली आणि ते तुकडे बाहेर काढले. ती बोलली, “मी नेहमी सिगरेटचे जळणारे तुकडे टाकते. तुम्हाला काय हवे होते?”

मी माझ्या कोटाच्या कॉलरच्या दुमडीखाली हात घातला व बंदूक सैल केली. मी म्हणालो, “मिस लॉक, तुम्हाला माहिती आहे, की इथे वेळ महत्वाची आहे. तुम्ही पोलिसांना फोन कधी केला व पोलीस इथे कधी आले, हा प्रश्न आहे. आम्हाला ती वेळ अचूकपणे लिहायची आहे. आता हे करण्यासाठी, मी टेलिफोन कंपनीच्या वतीने तुम्ही केलेले फोन तपासतो आहे. असे दिसते आहे, की तुम्ही पोलिसांना फोन केल्यावर थोड्याच वेळात, 491ला फोन केला होता. त्या फोनबद्दल मला सांगू शकाल का?”

तिने मिनिटभर तिची रंगवलेली नखे पाहीली व मग डोळे उचलून, म्हणाली, “हो, नक्कीच मी सांगू शकते. मी मिस्टर पेम्बरटनना फोन केला होता.”

“तुम्ही त्यांना का फोन केला होता?”

ती बोलली, “तुम्हाला समजेल की अनेक बाबतीत, मी मिस्टर पेम्बरटन यांच्या खूप जवळ होते. त्याने --- मला फसवले पण --- तरीही --- मला त्याला त्रास देणे आवडत नव्हते. मी चुकले, असे सांगण्यासाठी मी त्याला फोन केला होता.”

“तुम्ही त्यांच्याशी बोललात का?” माझा आवाज उंच गेल्याने माझा घसा दुखू लागला होता.

परत एकदा तिने हो नाही केले व म्हणाली, “नाही, त्याने फोनला उत्तर दिले नाही.”

मी बोललो, “टेलीफोन कंपनीकडे तुमच्यासाठी ठराविक संख्येचेच फोन उपलब्ध आहेत. त्यानुसार तो फोन पूर्ण झाला होता.”

परत एकदा तिने तिची रंगवलेली नखे पाहीली.

ती बोलली, “फोनला कुणीतरी उत्तर दिले. पण तो कार्यालय साफ करणारा पहारेकरी होता. त्यामुळे, मी त्याच्याशीच बोलले.” मला पाहीजे, ते सगळे समजले, असे मी माझ्या नेहमीच्या आवाजात म्हणालो. “तुम्हाला माहिती आहे का डायना, ते तुमच्या बाबतीत घाणेरडी युक्ती वापरून खेळले. मला नाही वाटत, की तुम्हाला यातून काही मिळाले की नाही, याची बासला काही पर्वा होती. त्याला पेम्बरटनचा भागीदारीतील व्याजाचा वाटा तथाकथित हवा होता. खरे तर त्याला तो हवा होता, कारण तो पैसे जमा करत होता. तो तुमच्या मागील खोटा वकील होता. तुम्ही त्याची बाई होतात आणि भोळसट पेम्बरटनला जाळ्यात ओढायचे काम तो तुमच्याकडून करून घेत होता. तो तुम्हाला फसवत होता व पेम्बरटनलाही भागीदारीमध्ये फक्त दोन हजार डॉलर्स देऊन कटवायला बघत होता. जेव्हा पेम्बरटन म्हणाला, तो अर्ध्या वाट्याची रक्कम किती आहे, हे हिशेब करून तपासण्यासाठी ऑडीटरला आणणार आहे, तेव्हा बास काळजीत पडला.

तिचे ओठ पांढरे पडले, पण ती काही बोलली नाही.

मी पुढे बोललो, “जेव्हा तुमचा टॉम चोर गेला, तेव्हा तुम्हाला समजले, की तुमची पत्रे गेली आहेत. तुम्ही बासला बोलावून त्याला हे सांगितले. तो त्याच्या

खासगी कार्यालयात एका फोनची वाट बघत थांबला होता. तो पेम्बरटन परत येण्यासाठी व त्याने त्याची मागणी शेवटी मान्य करण्यासाठीही थांबला होता.

पण बास तसा सरळ माणूस होता. त्याला बहुधा माहिती होते, की मी ऑलिव्ह पेम्बरटनचा भाऊ नव्हतो. त्याने तर्क केला, की मी गुप्तहेर आहे. याचा अर्थ डायनाच्या व्यवसायासाठी ऑलिव्ह शहाणी होती आणि तिला आवाज येण्यासाठी पेम्बरटनच्या कार्यालयापासून वायरने जोडलेले काही टेलीफोनसारखे उपकरण बसवले असल्याची कुणकुण त्याला लागली असण्यासाठी, तो पुरेसा हुशार होता. त्याने थोडी शोधाशोध केली. शेजारील कार्यालयाचे दार कुलुपबंद नव्हते. तो तिथे गेला. तेथील कारभाराचे निरीक्षण केल्यावर त्याला बंदूक सापडली. नक्कीच मी किंवा ऑलिव्हने तिथे ती ठेवली असणार. ती आमच्यापैकी कुणाची तरी असणार, हे त्याने जाणले. हे जणू काही तयारी केल्यासारखेच झाले. बासने बंदूक घेतली व काम करून ती परत केली.

पेम्बरटनला मारणे, एवढेच त्याने केले. नाहीतर प्रेमपत्रांशिवाय त्याचा लहानसा ब्लॅकमेलींगचा बेत पार कोलमडला. हिशेब तपासायचे काम केले, तर त्यातील पैशांची त्रुटी भरून काढायला त्याच्याकडे पैसेच नव्हते.

त्याचा अर्थ तो तुरुंगात जाणार. ठीक आहे, तो काही झाले तरी जाणारच होता आणि तिथे इतका काळ राहीला असता व शेवटी मेलाच असता. या वेळेपर्यंत लाल डोकेवालीने मला अर्थातच ओळखले.

ती फसवे हसू हसत बोलली, “तू आणि तुझे मोती” पण ते हसू तिच्या डोळ्यातील भीतीचे फक्त प्रतिबिंब होते.

मी बोलत राहीलो, “तू बासच्या मार्गात आलीस. ब्लॅकमेलींगचा बेत बासचा असल्याचे पोलीसांना माहिती नव्हते. पण तू तो तसे असल्याचे दाखवू शकतेस. त्यासाठी त्याला आपल्या दोघांपासून सुटका करून घ्यायला पाहीजे.”

ती ओरडली, “आर्थर असे काही करणार नाही.”

माझ्यासमोर बंद दार होते. बाथरूमचे दार माझ्यामागे होते. पण कपाटासारख्या जागेतील आरसा मला बाथरूम बघायला भाग पाडत होता. मी माझे डोळे त्या दारावर ठेवले.

मी तिला म्हटले, “तुला माहिती आहे. तो एकदा आधीही ठार झालेला आहे. नाहीतर तो आज रात्री इथे तुला सांगण्यासाठी का आला असता, की कुठल्याही परिस्थितीत तू त्याच्याशी फोनवर बोललीस, हे कबूल करू नकोस?”

तिने तिचे ओठ जिभेने ओले केले व विचारले, “तुला या सर्व गोष्टी कशा काय माहीत?”

मी तिला म्हटले, “मला त्या माहिती आहेत, कारण कोरड्या देशात जंगलरक्षक म्हणून बरीच वर्षे काम केलेल्या लोकांना मी ओळखतो. त्यांची अशी नेहमीची सवय आहे, की काडेपेटीतील काड्या टाकून देण्यापूर्वी त्याचे दोन तुकडे करायचे. मला तो दुसऱ्या रात्री इथे असल्याचे समजले होते, कारण तुझ्या ॲश ट्रेमध्ये तुटक्या काड्या होत्या. तुला हार्वे पेम्बरटनने खूप मानसिक ताण आणला होता. बास आज रात्री इथे आहे, हे मला माहिती होते. काल रात्री तो कार्यालयात असल्याचेही मला माहीती होते. तू येण्याआधी थोडा वेळ तो हार्वे पेम्बरटनशी बोलत होता. तो लिफ्टने गेल्याचे मी ऐकले नाही, त्यामुळे मला समजले, की तो बोलून झाल्यावर,

त्याच्या खासगी कार्यालयात गेला. मी निघालो, तेव्हा अजूनही तो तिथे होता. मला तू असातसा समजू नकोस, मी वेनिक आहे,”

ती बोलली, “पण त्याने असे काहीच केलेले नाही. आर्थर असे करूच शकणार नाही.”

“पण ती पत्रे चोरली गेल्यावर तू फोन करून, त्याला त्याबद्दल सांगितलेस, नाही का?”

ती म्हणाली, “हो, मी --- “

माझ्यामागील दार अर्धा इंच उघडले. मी बंदुकीचा पुढे आलेला भाग हळूहळू बाहेर येतांना बघितला. पण माझ्या बंदुकीच्या मागील भागावर माझी बोटे ठेवेपर्यंतच हे झाले. मग मला समजले की तो नेम माझ्यावर नव्हे तर, तिच्यावर रोखलेला होता.

मी जोराने ओरडलो, “काय हे!” त्यामुळे ती फार घाबरली. पण ती जणू काही मी तिच्यावर वीट फेकल्यासारखी, माझ्यापासून लांब गेली. बंदुकीचा नेम चुकला.

गोळी हवेत सूं सूं आवाज करत तिच्या डोक्याच्यावरून जाऊन, भिंतीत घुसली. मी गोल फिरून दारातून सटकलो. मी बंदुकीची नळी हलतांना पाहीली. मी परत नेम साधला.

मग एक जमिनीवर पडणारा हात नजरेत आला. लुळ्या हातातून बंदूक पडली. आर्थर बास जोराने खोलीतील जमिनीवर सबंधच्या सबंध आदळला.

वयस्क जोनाथनने माझ्याकडे रागारागाने खाऊ की गिळू अशा नजरेने बघत म्हटले, “वेनिक, तू एखाद्या राक्षसासारखा दिसतो आहेस.”

मी म्हटले, “माझा नाईलाज आहे.”

“तू नाराज दिसतो आहेस.”

“मी अजून दाढी केली नाही आहे.”

तो बोलला, “सगळया अहवालांवरून, तू या पेम्बरटन खून केसवर उजेड पाडला आहेस आणि काल संध्याकाळी दहा वाजण्यापूर्वी कल्व्हरटन येथे पोलिसांनी आभार मानत, तुझी सुटका केली आहे.”

सेड्रिक बोनिफेस कायद्याच्या वाचनालयात होता. तो खुनाच्या संदर्भात आधी ध्यान करण्याविषयी काही सांगत होता. पोलीसांना बासची मरणपूर्व जबानी मिळाल्यावर व तू गेल्यावर काय झाले, हे त्याला माहिती नव्हते.”

मी मान डोलवली.

जोनाथन म्हणाला, “मग काय रे डुकरा, तू मला ते सांगितले का नाहीस?”

मी म्हणालो, “मला माफ कर. पण शेवटी, मला काही सामाजिक भेटीगाठी घ्यायच्या असतात.”

तो गुरगुरला, “सामाजिक भेटीगाठी? तू एका बाईबरोबर बाहेर होतास.”

मी मान डोलवली व कबूल केले, ”मी एका तरुण स्त्रीबरोबर तिचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, बाहेर होतो.”

तो त्याची बोटे वाजवू लागला. तो रागाने बोलला, “तरुण स्त्रीबरोबर बाहेर? तू परत आल्याक्षणी मला कळावे, म्हणून मी तुझी सदनिका तपासली. पण आज सकाळी सहा वाजेपर्यंत, तू आला नाहीस.”

मी त्याच्या बोटांचा बारीक आवाज ऐकत होतो. मग मी त्याच्याकडे बघून हसत बोललो, “ती तरुण स्त्री, पहाटे पाच वाजता जन्मली होती. त्यामुळे तोपर्यंत तिचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, मला थांबावे लागले. जर तुम्हाला खरे वाटत नसेल, तर मे डीव्हर्सला विचारा.”

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे पंचेचाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१९७४६२४५


वृषाली जोशी यांची
सेहेचाळीस पुस्तके

























ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट



वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू



वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov



कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी



वृषाली जोशी
मार्क ट्वेन


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह



वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह



वृषाली जोशी
लिकॉकबरोबर हसा
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा


वृषाली जोशी
HECTOR HUGH
MUNRO SAKI


द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


The SOUND OF MUSIC
संगीताचा नाद


THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक


कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षांचे होत आहे.

## डॉ. वृषाली जोशी यांचे हे सत्तेचाळीसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज

नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी

असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।